CMYK

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | शनिवार, २१ फेब्रुवारी २०२६ | वर्ष ३ रे अंक ३५२ | पाने १२ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



तपस्वी व्यक्तीच्या स्वभावाचे सर्वांत मोठे आणि दुर्लभ वैशिष्ट्य म्हणजे अहंकाराचा नाश. सामान्य व्यक्ती कार्य केल्यानंतर श्रेय मिळण्याची अपेक्षा करतो, परंतु एक तपस्वी 'नेति-नेति' अर्थात् मी काहीही नाही, सर्व काही तुझे आहे या भावनेने जगतो. त्याला ना सन्मानाचा आनंद होतो ना अपमानाचे दुःख.

**- सोहनसिंग**
पूर्व प्रचारक, उत्तर क्षेत्र

# 'काँग्रेसी बुद्धिमत्ते'चे प्रदर्शन

## ● एआय परिषदेत काँग्रेसचा गोंधळ ● देशाची प्रतिमा मलिन केल्याचा भाजपाचा आरोप

**नवी दिल्ली, २० फेब्रुवारी**

भारत मंडपम् येथे झालेल्या जागतिक एआय परिषदेच्या व्यासपीठावर युवा काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात निदर्शने करीत गोंधळ घातला. या घटनेवर भारतीय जनता पक्षाने जोरदार टीका केली असून देशाला बदनाम करण्याचा हा प्रकार राहुल गांधी यांच्या इशाऱ्यावरून झाल्याचे म्हटले आहे.

१६ फेब्रुवारीला एआय जागतिक परिषदेला सुरूवात झाली. शुक्रवारी परिषदेचा शेवटचा दिवस होता पण गर्दी आणि कार्यक्रमांमुळे उद्या, शनिवारी समारोप होणार आहे. दरम्यान, शुक्रवारी युवा काँग्रेसच्या १० ते १५ कार्यकर्त्यांनी परिषदेच्या व्यासपीठावर जात शर्ट काढत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात घोषणाबाजी केली. या टी शर्टवर पंतप्रधान मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे फोटो आहेत. याप्रकरणी आतापर्यंत चार ते पाच जणांना ताब्यात घेतले आहे. एवढी सुरक्षा व्यवस्था असताना हे कार्यकर्ते मंडपम्मध्ये घुसलेच कसे? असा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रवेशासाठी पास किंवा कोड अनिवार्य असतानाही काँग्रेस कार्यकर्ते आतमध्ये घुसल्याने सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहेत. या कार्यकर्त्यांविरोधात कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे दिल्ली पोलिसांनी म्हटले आहे.

दिल्लीचे अतिरिक्त आयुक्त देवेश कुमार महाला यांनी दिलेल्या माहितीनुसार ही घटना शुक्रवारी साडेबाराच्या सुमारास घडली. युवकांनी स्वेटर आणि जॅकेटच्या टी शर्ट घातले होते. पाच क्रमांकाच्या सभागृहाजवळ येताच युवकांनी टी शर्ट बाहेर काढून घोषणाबाजीला सुरूवात केली. याप्रकरणी कृष्णा हरी, कुंदन यादव, अजय कुमार आणि नरसिम्हा यादव या चौघांना ताब्यात घेण्यात आले आहे. हरी हा काँग्रेसचा राष्ट्रीय सचिव तर नरसिम्हा पक्षाचा राष्ट्रीय संयोजक आहे. हरी आणि कुंदन हे बिहारचे रहिवासी आहेत. उर्वरित कार्यकर्त्यांची शोध सुरू आहे. या सर्वांविरोधात प्राथमिक चौकशी अहवाल दाखल करण्यात येईल, असे महाला यांनी सांगितले.

(वृत्तसंस्था)



भारत मंडपम्मध्ये निदर्शने करतान युवक काँग्रेसचे कार्यकर्ते

### कार्यकर्ते राहुल गांधींचे सैनिक

**आंदोलन करणारे कार्यकर्ते हे राहुल गांधी यांचे सैनिक आहेत. आमचा भारत-अमेरिका व्यापार कराराला विरोध आहे. जेव्हा राहुल गांधी यांच्या विरोधात एफआयआर दाखल झाला नाही तेव्हा कार्यकर्ते तर नुसते आंदोलन करीत होते. देश आणि युवकांसाठी आम्ही आवाज उठवत राहू, अशी प्रतिक्रिया युवक काँग्रेसचे अध्यक्ष उदय भानू चिब यांनी दिली आहे.**

### काँग्रेसचे वागणे देशविरोधी

**काँग्रेसचे वागणे देशविरोधी प्रकार असल्याची परखड टीका भारतीय जनता पक्षाने केली आहे. काँग्रेससाठी एआय म्हणजे अँन्टी इंडिया आहे, अशी टीका भाजपा प्रवक्ते शहजाद पुनावाला यांनी केली आहे. काँग्रेसने केलेला हा निषेध भाजप किंवा पंतप्रधानांच्या विरोधात नव्हे तर देशाच्याविरोधात आहे, असेही पुनावाला म्हणाले.**

## विमान अपघाताचा अहवाल सार्वजनिक करणार

**नवी दिल्ली, २० फेब्रुवारी**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बारामती येथे झालेल्या विमान अपघाताच्या तपासाला गती आली आहे. लिअरजेट ४५ (व्हीटी एसएसके) विमान अपघाताचा प्राथमिक अहवाल ३० दिवसांच्या आत प्रसिद्ध केला जाईल, अशी माहिती केंद्र सरकारच्या नागरी उड्डाण मंत्रालयाने दिली आहे.

तपास तांत्रिक आणि पुराव्यांच्या आधारे केला जात असून, आंतरराष्ट्रीय मानकांनुसार अहवाल जाहीर केला जाईल. विमानात बसवलेल्या दोन फ्लाईट रेकॉर्डर्सपैकी डिजिटल फ्लाईट डेटा रेकॉर्डर (डीएफडीआर) मधील माहिती मिळवण्यात यश आले. मात्र कॉकपिट व्हॉईस रेकॉर्डरचे (सीव्हीआर) आगीमुळे मोठे नुकसान झाले, त्यामुळे डेटा मिळवण्यासाठी मूळ उत्पादक कंपनी आणि आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांची मदत घेतली जात आहे. विमानाच्या अवशेषांची प्रयोगशाळेत चाचणी सुरू आहे. व्हीएसआर व्हेंचर्स या ऑपरेटर कंपनीच्या कामकाजाच्या विशेष ऑडिटचे काम अंतिम टप्प्यात आहे. यात सुरक्षितता मानके, कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आणि देखभाल पद्धतींची कसून तपासणी केली जात आहे.

(वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे



### परिवहन सदस्यांची पुढील सभेत नियुक्ती; महापौर कोंड्याल

**सोलापूर :** महापालिका परिवहन उपक्रमाला उर्जित अवस्था आणावयाची आहे. यामुळे चांगल्या सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी वेळ लागणार आहे. या सदस्यांची नियुक्ती पुढील सभेत करणार आहोत, असे महापौर विनायक कोंड्याल यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. महापालिका सभेनंतर ते पत्रकारांशी बोलत होते. भाजप कोट्यातील एका स्वीकृत सदस्य पदाची नेमणूकदेखील पुढील सभेत करण्यात येईल असे त्यांनी सांगितले. महापालिकेतील भाजपचे बहुतांश नगरसेवक हे नवीन असल्याने त्यांना महापालिका सभेची माहिती व्हावी यासाठी लवकरच कार्यशाळा घेण्यात येणार आहे. भाजपमधील सर्व नगरसेवकांमध्ये समन्वय आहे, असे सांगत महापौरांनी पुढील सभा वेळेवर घेणार असल्याचे सांगितले.

### तहसीलदार व्यंकटेश मुंडे एसीबीच्या जाळ्यात

**बीड :** ऐपत प्रमाणपत्र देण्यासाठी ५० हजारांची लाच मागणारा तहसीलदार एसीबीच्या जाळ्यात अडकला. एसीबीच्या पथकाने बीड जिल्ह्यातील परळीतून चक्क तहसीलदारच अटक केली आहे. परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांनी तक्रारदारास ऐपत प्रमाणपत्र देण्यासाठी ५० हजार रुपयांच्या लाच मागितली होती. तडजोडीअंती २० हजार रुपये देण्याचे ठरले. मात्र, तक्रारदाराने एसीबीकडे धाव घेतली. एसीबीने रंगेहात पकडण्यासाठी सापळा रचला होता. मात्र, तक्रारदाराच्या हालचालीवर संशय आल्याने तहसीलदार मुंडे यांनी पैसे स्वीकारण्यास टाळाटाळ केली. मात्र, एसीबीने आवश्यक ते सर्व पुरावे संकलित करून व्यंकटेश मुंडेंना ताब्यात घेतले. पुढील कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू आहे. एसबीच्या कारवाईमुळे महसूल प्रशासनात खळबळ उडाली आहे.

# व्यापार शुल्क बेकायदेशीर



### सुप्रीम कोर्टाचा डोनाल्ड ट्रम्प यांना धक्का

**वॉशिंग्टन, २० फेब्रुवारी**

राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी १०० पेक्षा अधिक देशांवर लादलेले व्यापार शुल्क बेकायदेशीर असल्याचा निर्णय अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी दिला. हा निर्णय ट्रम्प यांच्यासाठी मोठा धक्का आहे. राष्ट्राध्यक्षांनी व्यापार शुल्क लादून अधिकारक्षेत्राच्या मर्यादांचे उल्लंघन केल्याचे न्यायालयाने आदेशात म्हटले आहे.

न्यायाधीशांनी ६-३ बहुमताने दिलेल्या निर्णयामुळे अमेरिकेची अर्थव्यवस्था, ग्राहक आणि व्यापार धोरणावर दूरगामी परिणाम होणार आहेत.

अमेरिकन सर्वोच्च न्यायालयाने निर्णयात म्हटले की, १९७० च्या आणीबाणीच्या कायद्यात व्यापार शुल्काचा उल्लेख नसताना संसदेच्या मान्यतेशिवाय एकतर्फी टॅरिफ लादणारे ट्रम्प हे पहिले राष्ट्राध्यक्ष आहेत. मुख्य न्यायाधीश जॉन जी. रॉबर्ट्स ज्युनियर यांनी म्हटले की, हा कायदा राष्ट्राध्यक्षांना अमर्यादित एकतर्फी शुल्क लादण्याचा अधिकार देत नसताना, राष्ट्राध्यक्ष अमर्यादित शुल्क लादण्याच्या अधिकारावर दावा करतात. मात्र त्यांनी घटनात्मक संदर्भ, संसदेची परवानगी मिळाल्याचे पुरावे सादर केलेले नाही.

सर्वोच्च न्यायालयाने शुल्काचा निर्णय बेकायदेशीर ठरवल्याने जगभरातील देशांकडून शुल्काच्या माध्यमातून वसूल केलेले १३४ अब्ज डॉलर्स परत करण्याचे आव्हान ट्रम्प यांच्यापुढे असणार आहे. तसेच जागतिक व्यापार, व्यवसाय, वित्तव्यवस्थेवर व्यापक परिणाम होण्याची शक्यता आहे.

(वृत्तसंस्था)

### आर्थिक शक्ती कायद्याचा गैरवापर

सर्वोच्च न्यायालयाने निर्णयात म्हटले की, राष्ट्राध्यक्षांनी शुल्क आकारून १९७७ च्या आंतरराष्ट्रीय आपत्कालीन आर्थिक शक्ती कायद्याचा गैरवापर केला. जगभरातून अमेरिकेत आयात केलेल्या उत्पादनांवर शुल्क लादण्याची पद्धत बेकायदेशीर आहे. शुल्क लादण्यासाठी त्यांनी अमेरिकन काँग्रेसची मान्यता घेतली असली, तरी काँग्रेसला बाजूला ठेवून आणीबाणीचे आदेश जारी करण्याचा अधिकार मिळत नाही.

# भारतीय नागरिकांसाठी सर्व व्हिसा सेवा पुन्हा सुरू

## ● बांगलादेश सरकारचा निर्णय ● द्विपक्षीय संबंध सुधारण्याचे संकेत

**ढाका, २० फेब्रुवारी**

दोन महिन्यांपासून निलंबित असलेली व्हिसा सेवा पुन्हा सुरू करण्याचा निर्णय बांगलादेशचे नवनिर्वाचित पंतप्रधान तारिक रहमान यांनी घेतला. राजधानी दिल्लीतील बांगलादेश उच्चायोगाने भारतीय नागरिकांसाठी सर्व व्हिसा सेवा सुरू करण्यात येत असल्याचे शुक्रवारी जाहीर केले. हा निर्णय भारत आणि बांगलादेशमधील संबंध सुधारण्याचे संकेत आहे.

भारतविरोधी विद्यार्थी नेता उस्मान हादी यांच्या हत्येनंतर झालेल्या देशव्यापी निदर्शनामुळे दोन्ही देशांमधील संबंध ताणले आणि यातूनच बांगलादेशमधील अंतरिम सरकारचे सल्लागार मोहम्मद युनूस यांनी भारतीय नागरिकांसाठी व्हिसा सेवा बंद करण्याचा निर्णय घेतला होता. त्यांनी कोलकात्ता, मुंबईतील व्हिसा प्रदान करणारी कार्यालये बंद करण्याचे निर्देश दिले होते. भारताने देखील ढाका येथील भारतीय व्हिसा अर्ज केंद्र बंद करण्याचा निर्णय घेतला होता. बांगलादेशात तारिक रहमान यांच्या नेतृत्वात नवीन सरकार स्थापन झाल्याच्या चार दिवसांतच भारतीय नागरिकांसाठी सर्व व्हिसा सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला. भारत-बांगलादेश संबंध सुधारण्याच्या दिशेने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. बांगलादेश उच्चायुक्तालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, भारतीय नागरिकांसाठी निलंबित केलेली व्हिसा सेवा पुन्हा सुरू करण्यात येत आहे. द्विपक्षीय संबंध सुधारण्यास सरकारचे प्राधान्य आहे. भारतानेही बांगलादेशी नागरिकांसाठी सर्व व्हिसा सेवा पूर्णपणे पुनर्संचयित करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे म्हटले आहे.

(वृत्तसंस्था)



### रहमान यांना भारत भेटीचे निमंत्रण

लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वतीने रहमान यांच्या शपथविधी समारंभाला उपस्थिती लावली आणि त्यांची भेट घेतली. बिर्ला यांनी मोदींचे पत्र सादर केले आणि रहमान यांना भारत भेटीचे आमंत्रण दिले. तारिक रहमान यांच्या नेतृत्वात दोन्ही देशांमधील संबंध सुधारण्याच्या दिशेने याकडे पाहिले जात आहे.

## भारत-अमेरिका करारावर मार्चमध्ये स्वाक्षरी

**नवी दिल्ली, २० फेब्रुवारी**

भारत-अमेरिका व्यापार करारावर मार्च महिन्यांत स्वाक्षरी होणार आहे, तत्पूर्वी सोमवार, २३ फेब्रुवारी रोजी दोन्ही देशांच्या शिष्टमंडळाची बैठक होणार असून, त्यावेळी स्वाक्षरीची तारीख निश्चित केली जाईल.

परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो भारत दौऱ्यावर येणार असून त्यांच्या उपस्थितीत करारावर स्वाक्षरी होईल ,अशी माहिती भारतातील अमेरिकेचे राजदूत सर्जियो गोर यांनी दिली. प्रस्तावित अंतरिम व्यापार करारावर स्वाक्षरी झाल्यानंतर एप्रिलपासून तो लागू होईल. भारत आणि अमेरिका यांच्यात सहकार्याच्या प्रचंड संधी आहेत आणि दोन्ही देश या संधींचा सक्रियपणे लाभ घेण्यास इच्छुक आहेत, असे गोर म्हणाले.

(वृत्तसंस्था)

## दहशतवादी हल्ल्याचा कट उधळला, शस्त्रसाठा जप्त

**राजौरी :** जम्मू आणि काश्मीरमधील राजौरी जिल्ह्यातील सुंदरबनी सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेजवळ शोध मोहिमेदरम्यान शुक्रवारी सुरक्षा दलांनी शस्त्राचा मोठा साठा जप्त केला. काश्मिरात हल्ला घडविण्यासाठी दहशतवाद्यांनी शस्त्रांची जमवाजमव केली होती. गोपनीय माहितीच्या आधारे या भागात राबविण्यात आलेल्या शोधमोहिमेत हल्ल्याचा कट उधळला.

# ठाकरेंच्या बंधुप्रेमाचा फुगा फुटणार?

## स्वीकृत नगरसेवकांच्या निवडीवरून ठिणगी



**मुंबई, २० फेब्रुवारी**

मुंबई महापालिकेत ठाकरेंच्या शिवसेनेची सत्ता उलथवून लावत महायुतीने स्पष्ट बहुमत मिळवले. मुंबई महापालिकेच्या महापौरपदी भजपाच्या रितू तावडे विराजमान झाल्या. त्यानंतर, आता स्वीकृत नगरसेवकपदासांठीही हालचाली सुरू झाल्या आहेत. 'स्वीकृत'वरून उबाठा आणि मनसे यांच्यात कलगीतुरा रंगला असून ठाकरे बंधूंमध्ये राजकीय वाद पेटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

ठाकरेंच्या शिवसेनेने मोठे मन करून आमचा एक स्वीकृत नगरसेवक करावा, अशी आग्रही मागणी मनसेने केली होती. दरम्यान, गुरूवारी सायंकाळी ठाकरेंच्या शिवसेनेकडून तीन स्वीकृत नगरसेवकांची नावे जाहीर करण्यात आली. अशातच, मनसे नेते संदीप देशपांडे यांनी 'कोत्या मनाच्या प्रवृत्तीकडून कधीही स्वीकृतीची अपेक्षा बाळगू नये,' असे व्हॉट्सअप स्टेटस ठेवत उद्धव ठाकरेंना टोला लगावला. त्यामुळे स्वीकृत नगरसेवकांवरुन ठाकरे बंधूंमध्ये ठिणगी पडल्याचे बोलले जात आहे.

(तभा वृत्तसेवा)

### २५ फेब्रुवारीला निवड

**स्वीकृत नगरसेवकांची निवड २५ फेब्रुवारीला होणार आहे. त्यामुळे युतीत लढलेल्या मनसेला सध्या तरी स्वीकृत नगरसेवक देण्यासंदर्भात कुठलाही विचार ठाकरेंच्या शिवसेनेने केला नसल्याचे चित्र आहे. याच मुद्यावरून मनसे नेते संदीप देशपांडे यांनी व्हॉट्सअप स्टेटस ठेऊन नाराजी व्यक्त केली आहे.**

### प्रत्येक भेटीत राजकारण शोधू नका : राज ठाकरे

शहरांच्या प्रश्नांवर चर्चा करायची असेल तर भेटणे चुकीचे कसे? असा प्रतीप्रश्न करीत, प्रत्येक भेटीत राजकारण शोधण्याची गरज नाही. उद्या मी मुख्यमंत्र्यांनाही भेटेन, अशा शब्दांत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी एकनाथ शिंदेंसोबतच्या भेटीचे कारण स्पष्ट केले. राज ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ठाण्यातील निवासस्थानी घेतलेली भेट राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरली होती. या भेटीमागे नवी राजकीय समीकरणे आहेत का, अशी कुजबुज सुरू असतानाच राज ठाकरेंनी भूमिका विशद केली. मुंबई, ठाणे, पुणे यासारख्या शहरांतील बिकट परिस्थितीवर आम्ही चर्चा केल्याचे त्यांनी सांगितले.

# घरात वडिलांचे पार्थिव, डोळ्यात आसवांची धार पण वडिलांच्या स्वप्नासाठी धनश्रीने दिला दहावीचा पेपर

तभा अँकर

### शिक्षकांनी निभावली वडिलांची भूमिका

**तभा वृत्तसेवा | अश्विनी तडवळकर**
**सोलापूर, दि.२० फेब्रुवारी-**



दहावीचा पहिलाच पेपर, आयुष्यातील महत्त्वाची वळणवाट... पण नियतीने असा काही घाला घातला की, परीक्षा केंद्रावर जाण्यापूर्वी वडिलांचे निधन झाले. घरात वडिलांचे पार्थिव पडलेले असताना, डोळ्यांतील आसवांना बांध घालून आणि वडिलांच्या स्वप्नांना जपण्यासाठी सोलापूरच्या धनश्री भिकाजी पवार या विद्यार्थिनीने पेपरला जाण्याचा धाडसी निर्णय घेतला.

**वडिलांच्या स्वप्नांची शिदोरी**

धनश्रीचे वडील भिकाजी पवार हे महानगरपालिकेत प्रामाणिक कर्मचारी होते. 'मी कष्ट करतो, तुम्ही फक्त शिका,' हा मंत्र त्यांनी मुलांना दिला होता. परीक्षेच्या काही तास आधीच त्यांचे निधन झाले. आई, भाऊ आणि नातेवाईकांचा आक्रोश सुरू असताना धनश्री पूर्णपणे खचली होती. मात्र, 'शिक्षण सोडू नकोस' हा वडिलांचा शब्द तिला स्वस्थ बसू देत नव्हता. अखेर, वडिलांच्या देहावर डोके ठेवून, त्यांचे आशीर्वाद घेत ती परीक्षा केंद्राकडे रवाना झाली.

**मुख्याध्यापकांनी दिली मायेची सावली**

धनश्रीचे मन तयार होत नसताना तिचे मुख्याध्यापक तानाजी माने (शरदचंद्र पवार प्रशाला) यांनी पितृतुल्य आधार दिला. 'काळ कठीण आहे, पण तुला परीक्षा द्यावीच लागेल,' असे सांगत त्यांनी स्वतःच्या गाडीवरून तिला भू.म. पुळी कन्या प्रशालेत सोडले. विशेष म्हणजे, धनश्रीचा पेपर संपेपर्यंत ते तिथेच थांबले आणि पेपर झाल्यानंतर तिला पुन्हा अंत्यविधीसाठी घरी घेऊन आले.

### 'त्या क्षणी मी केवळ शिक्षक नव्हतो...'

'एखाद्या कठीण प्रसंगात तिच्या वडिलांनी जी भूमिका पार पाडली असती, तीच मी बजावली. माझेही डोळे भरून आले होते, पण धनश्रीचे वर्ष वाया जाऊ नये हीच भावना होती. याकामी भू.म. पुळी प्रशालेच्या मुख्याध्यापिका गीता सादुल आणि शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांचेही सहकार्य लाभले.'

**- तानाजी माने, मुख्याध्यापक**

**समाजाकडून हळहळ व्यक्त**

भिकाजी पवार हे मनपाच्या सार्वजनिक विद्युत विभागात अत्यंत तत्पर कर्मचारी म्हणून ओळखले जात. आमदार देवेंद्र कोठे यांच्या प्रभागात त्यांनी निष्ठेने काम केले होते. धनश्रीने पेपर संपवून थेट वडिलांच्या अंत्ययात्रेत सहभाग घेतला. हे दृश्य पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले.


धनश्री व तिची मोठी बहीण यांचे वडिलांसमवेत काढलेले संग्रहित छायाचित्र.

मंगळवेढ्यात पहिल्याच पेपरला घोटाळा

# दहावीच्या डमी विद्यार्थ्यांचा पर्दाफाश

**तभा वृतसेवा**
**मंगळवेढा दि. २० फेब्रवारी-**

मंगळवेढा तालुक्यातील नंदेश्वर येथील श्री. बाळकृष्ण विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, परीक्षा केंद्र क्रमांक ३१/८४ येथे दि.२० फेब्रुवारी २०२६ रोजी मराठी विषयाच्या पहिल्याच पेपरदरम्यान धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.परीक्षा सुरू असताना केंद्र संचालक व उपकेंद्र संचालकांनी अचानक केलेल्या तपासणीत सुतार इंटरनॅशनल स्कूल लक्ष्मी दहिवडी येथील ९ विद्यार्थी व १ विद्यार्थिनी असे एकूण १० डम्मी परीक्षार्थी रंगेहाथ पकडले गेले. बनावट ओळखपत्रांच्या आधारे परीक्षा देण्याचा हा उघड प्रयत्न होता.

या प्रकरणाची गंभीरता लक्षात घेता बोर्डाच्या नियमांनुसार तात्काळ कारवाई करण्यात आली असून संबंधितांविरोधात मंगळवेढा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस करत आहेत.पहिल्याच पेपरला एवढ्या मोठ्या प्रमाणात डम्मी उमेदवार सापडल्याने संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली आहे. परीक्षा व्यवस्थेच्या सुरक्षिततेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले असले, तरी केंद्र प्रशासनाच्या तत्परतेमुळे मोठा घोटाळा उघडकीस आला आहे.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/




## शिवजयंती उत्साहात...

# ढोल-ताशांचा गजर; लेझीमच्या तालावर शिवरायांना अभिवादन

### विविध शाळा, महाविद्यालय, संस्थांमध्ये शिवजन्मोत्सवाचा जल्लोष; चिमुकल्या मावळ्यांचा शिवरायांना मानाचा मुजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

**शहरातील विविध शाळा, संस्था, कार्यालये, संघानांतर्फे महाराष्ट्राचे आराध्य दैवत जाणते राजे क्षत्रियकुलवंत सिंहासनाधीश्वर महाराजाधिराज राजे शिवछत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्सहात साजरी करण्यात आली. शिवजन्मोत्सवानिमित्त शहरातल विविध शाळा, महाविद्यालयांत लेझीम, ढोल, पारंपारिक खेळ, शिस्तबध्द मिरवणूका पार पडली. ठिकठिकाण शिवरायांची मूर्तीचे प्रतिमा पूजन करुन चिमुकल्या मावळ्यांनी शिवरायांना मानाचा मुजरा केला. तर विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांकडून शिवजन्म, स्वराज्य स्थापनेची शपथ, अफजलखानाचा वध अशा छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील प्रसंगाचे नाट्यमय सादरीकरण केले..**



## जिजामाता प्रशाला

जिजामाता प्रशाला (कोंडी ता. उत्तर सोलापूर) येथे कोंडी जिल्हा परिषद सदस्य पृथ्वीराज माने तसेच कोंडी पंचायत समित सदस्य सन्माननीय धनाजी भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवाजी महाराज जयंती उत्सव हा शिव छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची व प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी संस्थेचे विश्वस्त सत्वजय ठोकळ, ग्रामपंचायत सदस्या सुप्रिया भोसले, माजी ग्रामपंचायत सदस्य बबन वाघमारे उपस्थित होते. श्रूती भोसले हीने शिवगर्जना बोलून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यानंतर समृद्धी आबाजी भोसलेने शिवगीत व अफजलखानाचा वध हा पोवाडा सादर केला. कार्यक्रमात प्रांजली पवार, स्वाती शिंदे हिने मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक उदय जाधव यांनी केले कार्यक्रमाचे संयोजन सारंग पाटील यांनी केले. सूत्रसंचालन शितल सौदागर ढगे तर आभार कल्याणी शंकर वाघमारे हिने मानले




## शिवस्वराज्य आरोग्य तपासणी शिबीर

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवस्वराज्य आरोग्य तपासणी शिबिराचे प्रसिद्ध गॅस्ट्रोएंट्रॉलॉजिस्ट डॉ. सूर्यप्रकाश राजेश कोठे यांच्या वतीने डॉक्टर कोठेज् गॅस्ट्रो लिव्हर केअर अँड जी आय एडोंस्कोपी सेंटर चार पुतळ्याजवळ येथे आयोजित करण्यात आले होते. शिबिराची सुरुवात दीप ज्वलनाने झाली. शिबिरास प्रसिद्ध डॉ. सूर्यप्रकाश राजेश कोठे, नगरसेवक सिद्धेश्वर कमटम, वासुदेव इप्पलपल्ली, पद्मशाली ज्ञाती संस्था सचिव संतोष सोमा, संतोष चिवडशेट्टी, डॉ. महांतेशस्वामी वैद्य, डॉ. सुशील राठोड, डॉ. सिद्धार्थ मिश्रा, डॉ. रोहन चौगुले ,डॉ. शिवलीला उमराणी, गणेश बत्तुल मुख्याध्यापिका सौ.राजश्री नारायणकर,मुख्याध्यापिका श्रीमती तनुजा मारपल्ली, मुख्याध्यापक सचिन ढोपरे, मुख्याध्यापक सतीश मल्लाव यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन सदाशिव पवार यांनी केले. आभार डॉ.सूर्यप्रकाश राजेश कोठे यांनी मानले.




## महावितरण कार्यालय

महावितरण औद्योगिक वसाहत कार्यालय येथे महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्रीमंतयोगी श्री छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी शाखाधिकारी अजय चव्हाण, विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनचे प्रादेशिक संघटक सुनील काळे, दिनेशकुमार बळवंत, महेबुब बागवान, नीलकंठ कांबळे, अनिलकुमार बनसोडे, दादासाहेब सातपुते, गुंडप्पा बनसोडे, संभाजी रुपनर, मल्लिनाथ मुन्नोळी, स्वप्निल कोरे, नितीन कोळी, चंद्रकला शिंदे उपस्थित होते.




## सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय

सिंहगड पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज तसेच एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. सिंहगड पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे आयोजित कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळचे सहसचिव व सिंहगड इन्स्टिटयूट केगाव, सोलापूरचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी शाळेच्या प्राचार्या शाहीन शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले, शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांनी महाराजांच्या प्रतिमेस अभिवादन केले. कार्यक्रमास माजी कुलगुरू तथा सिंहगड सीआरटीडीचे संशोधन संचालक प्रा. एस. एच. पवार, सिंहगडचे प्राचार्य डॉ. शंकर नवले, प्रा. माणिक शिंदे, ग्रंथपाल जी. एस. गोघले, विद्यानंद बाबर उपस्थित होते.



## एसव्हीसीएस हायस्कूल

एसव्हीसीएस हायस्कूल एमआयडीसी येथे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे यांच्या हस्ते शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी उपमुख्याध्यापक धनंजय नकाते व पर्यवेक्षक केदार पटणे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यानंतर प्रशालेतील अक्षता नंदुरे, समर्थ कोरे, अन्नपूर्णा कलशेट्टी, माणिककरणिका टोणपे या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन श्रेया हुमनाबादे तर श्रेया बिजरगी हिने आभार मानले.

## मेहता प्राथमिक शाळा



कै. वि.मो. मेहता प्राथमिक शाळेत शिवजयंती निमित्त शिवजन्मोत्सव कार्यक्रम साजरा करण्यात आला. प्रमुख अतिथी पाखर संकुलचे उपाध्यक्ष सिद्धाराम बगले व मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले.

प्रमुख अतिथींचा परिचय भारती शिंदे यांनी करून दिला. इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी शिवजन्म, स्वराज्य स्थापनेची शपथ, अफजलखानाचा वध अशा छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील प्रसंगाचे नाट्यमय सादरीकरण केले. या विद्यार्थ्यांना गणेश माने, सुजाता यादव व स्वाती गडदे यांनी मार्गदर्शन केले. शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांनी या कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या.

सूत्रसंचालन शीतल जालीमिंचे यांनी केले तर आभार मयुरी दुरुगकर यांनी मानले.

## हरिभाई देवकरण प्रशाला व महाविद्यालय



ह.दे.प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय मधील कला निकेतन सभागृहातश्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

प्रारंभी प्रमुख वक्ते पर्यवेक्षक गणेश नेवरे, मुख्याध्यापिका दीपा फाटक, उपमुख्याध्यापक रविंद्र पानसरे, प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय चे सर्व पर्यवेक्षक यांच्या हस्ते श्री शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

प्राचार्या तथा मुख्याध्यापिका दीपा फाटक यांनी श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार कृतीतून दाखवावे, असे आवाहन केले.

प्रास्ताविक व सूत्रसंचालन मल्लिकार्जुन घवाळे तर आभार आसावरी देशमुख यांनी मानले.



## उमाबाई श्राविका विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय

श्राविका संकुलातील उमाबाई श्राविका विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे तर प्रमुख अतिथी म्हणून प्रशालेच्या वरिष्ठ दीप्ती शहा, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रशालेतील सहशिक्षिका सोनाली उंडे व पल्लवी खांडवे यांनी सुमधुर अशा शिववंदना गीताचे सादरीकरण केले.

प्रास्ताविक मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे यांनी केले. रामेश्वरी बंडगर, समृद्धी जाधव या विद्यार्थिनींने भाषण केले. प्रशालेचे पर्यवेक्षक व शिवव्याख्याते बाळासाहेब पौळ यांनी मनोगत व्यक्त केले. अनुष्का साळुंखे व तिच्या संचाने सादर पोवाड्याने वातावरण शिवमय झाले होते. इयत्ता सातवी क च्या वर्गशिक्षिका सोनाली उंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सातवी विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते. कलाशिक्षक प्रवीण कंदले यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे रेखाटलेले चित्र आकर्षण ठरले. सूत्रसंचालन शरयू भोसले व पूर्वी पूर्वी म्हमाणे या विद्यार्थिनींनी तर आभार सोनाली उंडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी माधवी खोत, सोनल आळंद, प्रीती वऱ्हाडे, सुहास छचुरे यांनी परिश्रम घेतले.



## मनपा प्राथमिक शिक्षण मंडळ

नवी पेठ येथील महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी मल्हारी माने यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक माहेजबीन शेख, लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, पर्यवेक्षक संतोष बुलबले, भगवान मुंढे, सुरेश कासार, रजनी राऊळ, तरंगिणी कोंडा, महेश वालावलकर, अबरार डोंगरी, तुकाराम भोसले, अमोल गायकवाड, नितीन अंकुश आनंद हिरेमठ, सतीश सरवदे, भालचंद्र साखरे, सायली ढोले, नाशिर खान, सचिन साखरे उपस्थित होते.

## वसंत विहार



छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती वसंत विहार येथील राजे गणपती सांस्कृतिक मंडळाच्या वतीने साजरी करण्यात आली. आर्मीमध्ये सध्या कार्यात असणारे मेजर सैनिक सौदागर ढेकळे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष सुरेश जगताप, सचिव राजेश पानकर, वैभव पाटील, राहुल परदेशी, संजय साळुंखे, मारुती खानापुरे, मंगेश शिरसागर, तानाजी पाटील, विशाल डांगेकर, सुनील इसड, दत्ता सुरवसे, प्रसन्न गुंड, मल्लू चौगुले, पवार मेजर, महेश गवळी, आशुतोष माने, नितीन पवार, मेजर वैष्णवी धनगेकर, हर्ष पाटील उपस्थित होते.

## तेलुगु ग्रंथालय



तेलुगु भाषा अभिवृद्धी सार्वजनिक ग्रंथालयम येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती व जागतिक मातृभाषा दिनानिमित्त शिवाजी महाराज व तेलुगु तल्ली यांच्या प्रतिमेचे पूजन व द्वीप प्रज्वलन पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲडव्होकेट श्रीनिवास क्यातम, ग्रंथालयांचे सचिव तिपण्णा गणेरी, सहसचिव प्रभाकर भिमनाथ, कवी प्रा. नरेंद्र गुंडेली, ग्रंथपाल विजयालक्ष्मी गुडूर, पुरुषोत्तम बुधारम व पुरोहित अरविंद बिटला यांच्या उपस्थितीत करण्यात आले. कवी प्रा. नरेंद्र गुंडेली यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रभाकर भिमनाथ यांनी केले तर आभार तिप्पण्णा गणेरी यांनी मानले.




## पी.बी. ग्रुप

प्रबुद्ध भारत चौक, बुधवार पेठ येथे प्रबुद्ध भारत विहारामध्ये सामुदायिक बुद्ध वंदना घेऊन ॲड. मलिक कांबळे व पी.बी. ग्रुपचे अध्यक्ष बाबा गायकवाड यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी मनोगत व्यक्त केले. दमानी विद्यामंदिर येथे इयत्ता २ री मध्ये शिकणाऱ्या आनंदी संजय इंगळे या लहान मुलीने मनोगत व्यक्त केले. पी.बी. ग्रुपचे कार्यकर्ते व पदाधिकारी यांच्या समवेत छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या आश्वारूढ पुतळ्यास अभिवादन केले. यावेळी भारत बाबरे, गौतम चंदनशिवे, चंद्रकांत सोनवणे, गौतम नागटिळक, धम्मपाल मैंदर्गीकर, धीरज वाघमोडे, बंटी माने, संजय इंगळे, भैया कापुरे, धन्ना कापुरे, अमित माने, पी.बी. ग्रुपचे अध्यक्ष बाबा गायकवाड, आदित्य चंदनशिवे, प्रतीक चंदनशिव, ॲड. मलिक कांबळे, अंबादास कापूरे, तात्या जाधव, राहुल बागले, सिकंदर कांबळे, प्रथमेश सुरवसे, मनोज थोरात, लखन चंदनशिवे, देविदास चिंचोळकर, मुन्ना आकाडे, अजय इंगळे, नागेश कुंभार, अमोल बनसोडे, विजय शिवशरण, राजाराम लोखंडे, प्रतीक चंदनशिवे, मनीष साळवे, रजाक शेख, सुरज वाघमोडे, विजय इंगळे, इंद्रजित बागले, भीमा मस्के, लखन बागले, सचिन बागले, देविदास भडकुंबे, सुरज साबळे, संकेत कणके, जयराज सांगे उपस्थित होते.




## महिला पोलिसांच्या हस्ते प्रतिष्ठापना

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त संभाजी ब्रिगेडच्या वतीने नवी वेस पोलिस चौकीजवळ बंदोबस्तावरील महिला पोलिस कर्मचारी यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेची प्रतिष्ठापना करण्यात आली.

यावेळी एएसआय काळे, संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष शाम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा मीनल दास, शहराध्यक्ष शिरीष जगदाळे, छत्रगुण माने, सुनीता घंटे, सिताराम बाबर, संतोष सुरवसे, शेखर भोसले, दत्तात्रय डिंगणे, मनीषा कोळी, सोनाली सगर, मंगल बनसोडे, मोनाली धुमाळ उपस्थित होते.



## आस्था रोटी बँक

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आस्था फाउंडेशन संचलित आस्था रोटी बँक यांच्या वतीने शहरातील गरीब कुटुंबातील मयुरी मेरगु याच्या विवाहप्रसंगी लग्नानिमित्त भांडे व धान्य वाटप करण्यात आले. प्रारंभी नगरसेविका गीता गवई, बबिता धुम्मा, अनंतकुमार धुमा, रामराव रहाणे, सुलभा राहणे लक्ष्मीकांत भूमकर यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी स्नेहा वनकुद्रे, अनिता तालीकोटी, पुष्कर पुकाळे, संगीता छंचुरे, अविनाश माचर्ला, सुरेखा पाटील, प्रकाश डोंगरे विजय छंचुरे, वैशाली काळे, वनश्री कंदले, शशिकला पांढरे, अर्चना कटमले उपस्थित होते.



## रामलिंगेश्वर सार्वजनिक वाचनालय

श्रीक्षेत्र तीर्थ (ता.दक्षिण सोलापूर) येथे श्री रामलिंगेश्वर सार्वजनिक वाचनालयात शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. संत साहित्याचे अभ्यासक प्रा.डॉ. भीमाशंकर बिराजदार यांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी किर्ती ऐवळे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन व आभार सिध्देश्वर घोंगडे यांनी मानले. कार्यक्रमास शिवराज बिराजदार, राजकुमार बाळीकायी, संगीता चितळे, अनिता चितळे, मिराबाई गायकवाड, किर्ती ऐवळे उपस्थित होते.



गरज नसलेला शक्तिपीठ महामार्ग रेटण्यासाठी महायुती सरकारने दडपशाहीची परिसीमा गाठली आहे. परभणी जिल्ह्यात सहजापूर (जवळा) या गावामध्ये रात्रीपासून शेतकऱ्यांना अटक, घरांवर नोटिसा, आंदोलकांना ताब्यात घेण्याचे प्रकार पोलिसांमार्फत सरकार करत आहे.
**-सतेज पाटील**, आमदार, काँग्रेस


# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

शनिवार, २१ फेब्रुवारी २०२६ ३


भिवगन येथील प्रकरण गंभीर आहे. ज्या मुलींना वडील नाहीत अशा मुलींना टार्गेट केलं जात आहे, २५ मुलींची प्रकरणे इंदापूर तालुक्यात घडली आहेत. मुलीवर दबाव टाकणं सुरू आहे. आरोपींना अटक करून योग्य तपास केला पाहिजे.
**गोपिचंद पडळकर**, भाजपा आमदार



# दहा दिवसांत निर्णय घ्या अन्यथा अद्दल घडवू

## अणू कार्यक्रम कायमचा मोडीत काढण्यास सैन्यदल सज्ज

### अमेरिकेचा इराणला इशारा

◆ **वॉशिंग्टन, २० फेब्रुवारी**

अमेरिका कोणत्याही परिस्थितीत इराणला अण्वस्त्रे बनवू देणार नाही. जीनेव्हा येथे झालेल्या बैठकीत आम्ही त्यांना करार आणि अटी मान्य करण्यासाठी दहा दिवसांचा वेळ दिला आहे. या काळात त्यांनी निर्णय न घेतल्यास जग पाहत राहील अशी अद्दल घडवू, असा इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या सत्ताधाऱ्यांना दिला.

गाझा शांतता मंडळाचा उद्घाटन समारंभ अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टनमध्ये येथे झाला. मंडळातील देशांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. या व्यासपीठावर बोलताना ट्रम्प म्हणाले, इराणचा अणू कार्यक्रम कायमचा मोडीत काढण्यासाठी योजना आखली आहे. आम्ही अपेक्षा व्यक्त करतो, की याची आवश्यकता पडू नये. इराणने अणू कराराच्या अटी मान्य न केल्यास केवळ लष्करी कारवाईच होणार नाही, तर तेथील सत्ताधाऱ्यांना मोठी किंमत चुकवावी लागेल. इराणचा प्रश्न वाटाघाटीतून मार्गी लागावा यासाठी दोनदा बैठका झाल्या, मात्र त्यातून काहीही निष्पन्न झाले नाही. इराणला अण्वस्त्रे बाळगण्याची परवानगी देता येणार नाही. अण्वस्त्रांच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी इराणने आवश्यक पावले उचलली पाहिजे. अमेरिका आणि इराणमधील राजनैतिक चर्चेचा पुढील टप्पा महत्त्वाचा आहे. दहा दिवसांत त्यांनी अमेरिकेच्या अटींवर निर्णय न घेतल्यास इराणला मोठी किंमत चुकवावी लागेल. ◂*(वृत्तसंस्था)*



### हवाई आणि जमिनीवरून हल्ल्याची योजना

» अमेरिका इराणच्या निवडक लष्करी तळांवर आणि सरकारी केंद्रांवर हवाई हल्ले करू शकते. येत्या काही दिवसांतच हल्ले होण्याची शक्यता आहे. हवाई आणि जमिनी मार्गाने हल्ले करण्याची अमेरिकेची योजना आहे. हल्ल्यानंतरही इराणचे सर्वोच्च नेते अली खामेनी आणि तेथील प्रशासन झुकले नाही, तर इराणची संपूर्ण लष्करी यंत्रणा आणि शासन केंद्रांना लक्ष्य केले जाईल. इराणच्या सीमेवर १०० हून अधिक लढाऊ विमाने, डझनभर युद्धनौका, यूएसएस गेराल्ड फोर्ड आणि यूएसएस अब्राहम लिंकन या दोन महाकाय विमानवाहू युद्धनौका तैनात आहेत. ■

### हल्ला झाल्यास अमेरिकन तळांना लक्ष्य

» ट्रम्प यांच्या धमकीनंतर इराणने संयुक्त राष्ट्रांला पाठविलेल्या निवेदनात म्हटले की, हल्ला झाल्यास अमेरिकन तळांना लक्ष्य केले जाईल. मध्य पूर्वेतील सर्व अमेरिकन लष्करी तळ, शस्त्र साठा असेलेली केंद्र उद्ध्वस्त केली जाईल. तणाव आणखी वाढू नये यासाठी परिषदेने त्वरित हस्तक्षेप करावा. संयुक्त राष्ट्रांच्या चार्टरच्या कलम ५१ अंतर्गत इराणला स्वतःचा बचाव करण्याचा अधिकार आहे. ■

### अमेरिकेला हवाई तळ देण्यास ब्रिटनचा नकार

» इराणवर हल्ला करण्यासाठी अमेरिकेने आरएएफ फेअरफोर्ड हवाई तळ वापरण्याची परवानगी ब्रिटनने धुडकावून लावली. ब्रिटनचे पंतप्रधान केयर स्टारमर यांनी सांगितले की, आम्ही कोणत्याही देशाच्या विरोधात कारवाई करण्यासाठी आमचा हवाई तळ वापरू देणार नाही. इराणवर कारवाईसाठी अमेरिकेला डिएगो गार्सिया आणि ब्रिटनचा आरएएफ फेअरफोर्ड तळ हवा आहे. ■

# भिवंडीत भाजपाचा बंडखोर महापौरपदी

## उपमहापौरपदी काँग्रेसचे तारिक मोमीन

◆ **भिवंडी, २० फेब्रुवारी**

भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेच्या महापौरपदासाठी शुक्रवारी झालेल्या निवडणुकीत भाजपाचे बंडखोर आणि 'सेक्युलर फ्रंट'चे उमेदवार नारायण चौधरी यांनी विजय मिळविला. तर उपमहापौरपदी काँग्रेसचे तारिक मोमीन विजयी झाले. शिवसेनेचे उमेदवार विलास पाटील यांना २५ तर भाजपाच्या स्नेहा पाटील यांना १६ मते मिळाली.

पक्षांतर्गत मतभेदाचा काँग्रेसला चंद्रपूर येथे जसा फटका बसला तसाच फटका भाजपाला भिवंडी-निजामपूर येथे शुक्रवारी बसला. बंडखोरांना हाताशी धरून काँग्रेसने सत्ता काबीज केली आहे. भाजपाचे बंडखोर नगरसेवक नारायण चौधरी यांच्या गळ्यात महापौरपदाची माळ पडली. भाजपा आणि शिवसेना यांनी वेगवेगळे उमेदवार उभे केले होते. भाजपाने सुरुवातीला भिवंडीच्या महापौरपदासाठी



नारायण चौधरी



तारिक मोमीन

नारायण चौधरी यांचे नाव निश्चित केले होते. पण त्यानंतर अचानक स्नेहा पाटील यांना उमेदवारी जाहीर केली. या निर्णयामुळे नारायण चौधरी व त्यांचे समर्थक नगरसेवक नाराज झाले होते. चौधरी यांनी या प्रकरणी उघड नाराजी व्यक्त करत आपल्या ८ समर्थक नगरसेवकांसह काँग्रेसशी हात मिळवणी केली. शुक्रवारी झालेल्या निवडणुकीत महापौरपदाच्या निवडणुकीत काँग्रेसने आपल्या नगरसेवकांना नारायण चौधरींच्या बाजूने मतदान करण्याचे आदेश दिले. चौधरी यांना तब्बल ४८ मते मिळाली. तर भाजपा उमेदवार स्नेहा पाटील यांना केवळ १६ मते पडली. शिवसेनेचे विलास पाटील यांना २५ मते मिळाली.

भिवंडीच्या उपमहापौरपदासाठीही तिरंगी लढत झाली. त्यात काँग्रेसच्या तारिक मोमीन यांना सर्वाधिक ४३ मते मिळाली. शिंदे गटाच्या जावेद दळवी यांना २५ तर भाजपाच्या सुहास नकातेंना २१ मतांवर समाधान मानावे लागले ◂*(तभा वृत्तसेवा)*

### काँग्रेस-शरद पवार गट एकत्र

भिवंडी महापालिकेत काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार )ने एकत्र येत भाजपाचे बंडखोर नारायण चौधरी यांना पाठिंबा दिला. या निवडणुकीत चौधरी यांना ४८ मते मिळाली. यात काँग्रेसच्या ३० आणि शरद पवार गटाच्या १२ आणि भाजपा बंडखोरांच्या सहा नगरसेवकांचा समावेश आहे. ■

## बंडखोरांविरुद्ध कडक कारवाई

### भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची घोषणा

◆ **मुंबई, २० फेब्रुवारी**



भिवंडी-निजामपूर महापौर निवडणुकीत पक्षादेशाच्या विरोधात गेलेल्या नगरसेवकांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची घोषणा भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केली.

भाजपाच्या राज्यस्तरीय कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटनानंतर झालेल्या पत्रपरिषदेत रवींद्र चव्हाण बोलत होते. ते म्हणाले, आम्ही पक्षशिस्त आणि संघटनात्मक एकात्मतेवर भर दिला. पक्षाच्या निर्णयाचा सन्मान राखणे प्रत्येक कार्यकर्त्याची जबाबदारी आहे, शिस्तभंग सहन केला जाणार नाही.

चव्हाण यांनी सांगितले की, महापौरपदासाठी भिवंडीच्या स्थानिक समितीने बहुमताने नारायण चौधरी यांचे नाव सुचवले होते. त्यानुसार त्यांना उमेदवारी अर्ज भरण्यास सांगण्यात आले. मात्र, स्थानिक पातळीवरील मतभेद आणि संभाव्य वाद टाळण्यासाठी प्रदेश नेतृत्वाने परिस्थितीचा आढावा घेत स्नेहा पाटील यांना पक्षाचा अधिकृत उमेदवार घोषित केले.

**अखेरपर्यंत समन्वयाचे प्रयत्न**

उमेदवारीत बदल झाल्यानंतर नाराजी वाढू नये आणि बंडखोरी होऊ नये म्हणून पक्षाने अखेरपर्यंत समन्वयाचे प्रयत्न केले. मात्र, ते यशस्वी ठरले नाहीत, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली. पक्षाच्या व्हीपविरोधात मतदान करणाऱ्या नारायण चौधरी आणि त्यांच्या समर्थक नगरसेवकांवर संघटनात्मक शिस्तभंगाची कारवाई केली जाईल, असे चव्हाण यांनी सांगितले. ◂*(तभा वृत्तसेवा)*

# विवाह नोंदणी नियमांमध्ये गुजरात करणार सुधारणा



◆ **गांधीनगर, २० फेब्रुवारी**

गुजरात सरकारने शुक्रवारी गुजरात विवाह नोंदणी कायद्याअंतर्गत तयार केलेल्या नियमांमध्ये सुधारणा करण्याची योजना जाहीर केली आहे. हे पाऊल विद्यमान व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्यासाठी आहे, असे उपमुख्यमंत्री हर्ष संघवी यांनी विधानसभेत म्हटले आहे.

यावेळी त्यांनी नवीन नियमांची आवश्यकता स्पष्ट केली. निरपराध मुलींना अडकवले जात आहे व अशा प्रथा समाजात कीड लागल्यासारख्या पसरत आहेत, असेही ते म्हणाले. अनेक लोक व सामाजिक संघटनांनी विवाह नोंदणीच्या विद्यमान नियमांचा दुरुपयोग टाळण्यासाठी किंवा गैरवापर रोखण्यासाठी विवाह नोंदणी नियमांमध्ये सुधारणा करण्यात यावी, अशी विनंती सरकारला केली आहे.

त्यांनी 'लव्ह जिहाद' म्हणून संबोधलेल्या गोष्टींचा संदर्भ देत, संघवी म्हणाले की हे 'सांस्कृतिक आक्रमण' आहे व भाजपा सरकार आता या मुद्द्याकडे दुर्लक्ष करू शकत नाही. या सुधारणा नोंदणी प्रक्रियेतील सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्याच्या उद्देशाने आहेत. प्रस्तावित सुधारणांवर आता ३० दिवसांसाठी जनतेकडून आक्षेप आणि सूचना मागवण्यात येत आहेत. लोक व संस्था आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागाच्या संकेतस्थळावर आपल्या सूचना व हरकती नोंदवू शकतात. विभागाला मिळालेल्या या सूचना आणि हरकतींचा विचार केल्यानंतर नवीन नियम लागू केले जातील, असे ते म्हणाले.

प्रस्तावित नियमांनुसार, प्रत्येक विवाह नोंदणी अर्ज सहाय्यक निबंधकांसमोर सादर करणे आवश्यक आहे, तर अर्जदारांनी वधू-वरांनी त्यांच्या पालकांना लग्नाबद्दल माहिती दिली आहे की नाही हे सांगणारा एक घोषणापत्र जोडणे आवश्यक आहे. शिवाय, वधू-वरांना अर्जात त्यांच्या पालकांची नावे, पत्ते, आधार आणि संपर्क तपशील प्रदान करावे लागतील. गुरुवारी या संदर्भात खाजगी सदस्य विधेयक सादर करणारे आपचे आमदार हेमंत अहिर आणि भाजपाचे आमदार लविंगजी ठाकोर यांनी उपमुख्यमंत्र्यांचे सभागृहात अभिनंदन केले आणि प्रस्तावित बदल ही काळाची गरज असल्याचे सांगितले. समाजकंटक निष्पाप मुलींना आमिष दाखवून विवाह सोहळा व नोंदणी करण्यासाठी विद्यमान व्यवस्थेतील त्रुटींचा फायदा घेतात, असे त्यांनी सांगितले. ◂*(वृत्तसंस्था)*

### खात्री केल्यानंतरच होईल नोंदणी

» प्रस्तावित नियमांनुसार, सहाय्यक निबंधक समाधानी होताच वधू-वरांच्या पालकांना दहा कामकाजाच्या दिवसांत कळवले जाईल. सहायक निबंधक संबंधित जिल्ह्याच्या किंवा तालुक्याच्या निबंधकांना अर्ज पाठवतील. उप-नियमांमध्ये निर्दिष्ट केलेल्या आवश्यकता पूर्ण झाल्या आहेत याची निबंधक खात्री केल्यानंतर ३० दिवसांनी विवाह नोंदणी केली जाईल. प्रस्तावित नियमांनुसार, निबंधक हे सर्व तपशील सरकारने तयार केलेल्या ऑनलाइन पोर्टलवर अपलोड करतील. ■

# कन्नूरमध्ये दोन ठिकाणी बॉम्बस्फोट, एक जखमी

◆ **कन्नूर, २० फेब्रुवारी**

केरळच्या कन्नूर जिल्ह्यात शुक्रवारी दोन वेगवेगळ्या ठिकाणी बॉम्बस्फोट झाले. यामध्ये एक जण जखमी झाला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पहिला स्फोट सकाळी ९ वाजताच्या सुमारास पनूरजवळील सेंट्रल पोयिलूर भागात झाला. तेथे बांधकाम कामासाठी वाळू उत्खननाचे काम सुरू होते. या घटनेत ट्रकचालक शमिथ लाल जखमी झाला. पोलिसांनी घटनास्थळी येऊन तपास सुरू केला. घटनास्थळावरून पोलिसांनी स्फोटकांचे अवशेषही जप्त केले आहेत. दुसरी घटना पहाटे ४ वाजताच्या सुमारास मनोलिक्कावू परिसरातील मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका अज्ञाताने रस्त्यावर बॉम्ब फेकला. यामुळे एक मोठा स्फोट झाला. पोलिसांचे वाहन असलेल्या जागेजवळ हा स्फोट झाला. तथापि, या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मंदिरातील उत्सवादरम्यान सीपीआय(एम) आणि आरएसएस कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या जोरदार वादानंतर ही घटना घडल्याचे पोलिसांनी सांगितले. ◂*(वृत्तसंस्था)*



२० फेब्रुवारीला जगभरात सामाजिक न्याय दिन साजरा करण्यात आला. शांततापूर्ण आणि सर्वसमावेशक समाजाची निर्मिती व्हावी, यासाठी 'युनो' कार्यरत आहे. समाजाचा एक घटक असलेल्या रिक्षाचालकाला गुलाबाचे फुल देऊन तो करीत असलेल्या परिश्रमाबद्दल त्याचे आभार मानताना कोलकाता येथील काँग्रेसच्या कार्यकर्त्या

# झारखंडमध्ये दोन मुलींवर सामूहिक अत्याचार

◆ **गुमला, २० फेब्रुवारी**

झारखंडच्या गुमला जिल्ह्यात दोन मुलींचे अपहरण करून त्यांच्यावर बलात्कार केल्याच्या आरोपाखाली चार जणांना अटक करण्यात आली आहे, असे पोलिसांनी शुक्रवारी सांगितले.

बुधवारी दोन्ही मुली आपल्या दोन मैत्रिणींसह दुचाकीवरून लग्न समारंभातून घरी परतत असताना कामदरा पोलिस स्टेशन परिसरात ही घटना घडली. दोन्ही पीडित अल्पवयीन आहेत व त्यांच्यावर चार जणांनी सामूहिक बलात्कार केला. गुरुवारी आरोपींना अटक करून न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले आहे. चारही आरोपी झारखंडच्या सिमडेगा जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागातील आहेत, असे कामदरा पोलिस ठाण्याचे प्रभारी मुकेश कुमार म्हणाले.

चारचाकी वाहनातून प्रवास करणाऱ्या आरोपींनी दोन्ही मुली व त्यांच्या मैत्रिणींना अरहरा गावाजवळ थांबवले व त्यापैकी दोघींना जबरदस्तीने आपल्या कारमध्ये बसवले. चार जणांनी त्यांना बालागहट कोयल नदीकाठाजवळील एका निर्जन ठिकाणी नेले व दोन्ही मुलींवर लैंगिक अत्याचार केला. आरोपींवर बीएनएस व पॉक्सो कायद्याच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ◂*(वृत्तसंस्था)*

## चित्रपट वार्ता

### 'टॉक्सिक' चित्रपटाचा टीझर प्रदर्शित




**मुंबई :** चित्रपट 'टॉक्सिक'चा टीझर प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटात यश मुख्य भूमिकेत आहे. निर्मात्यांनी हा हिंदी टीझर जारी केला. टीझरमध्ये अनेक हिंसक दृश्ये आणि रक्तपात दाखवण्यात आला आहे. बहुतेक ॲक्शन आणि संवाद आहेत, पण चित्रपटाची खरी कथा काय आहे, हे स्पष्टपणे समजत नाही. चित्रपट १९ मार्च रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होईल. यात कियारा अडवाणी, नयनतारा, हुमा कुरेशी, तारा सुतारिया आणि रुक्मिणी वसंत देखील दिसणार आहेत. हा चित्रपट रणवीर सिंगच्या 'धुरंधर २' सोबत बॉक्स ऑफिसवर टक्कर देणार आहे. यामुळे 'टॉक्सिक'साठी बॉक्स ऑफिसवर यश मिळवणे इतके सोपे नाही. ■

### 'राजा शिवाजी' चित्रपटाचे पोस्टर प्रदर्शित




**मुंबई :** 'राजा शिवाजी' या चित्रपटाचे अधिकृत पोस्टर प्रदर्शित करण्यात आले आहे. जिओ स्टुडिओज प्रस्तुत आणि मुंबई फिल्म कंपनी निर्मित हा चित्रपट मराठी आणि हिंदी अशा दोन्ही भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे. अभिनेता-दिग्दर्शक रितेश देशमुख या चित्रपटात छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका साकारत आहे. नुकत्याच समोर आलेल्या पोस्टरमध्ये रितेश देशमुख भगवा ध्वज हातात घेत करारी मुद्रेत दिसत आहेत. 'एक वचन, एक स्वराज्य, एक राष्ट्राचा अभिमान' अशी टॅगलाईनही पोस्टरवर लक्ष वेधून घेत आहे. या चित्रपटाला अजय-अतुल यांचे संगीत आहे. ज्योती देशपांडे आणि जेनेलिया डिसूझा निर्मित, रितेश देशमुख दिग्दर्शित 'राजा शिवाजी' हा चित्रपट १ मे २०२६ रोजी, म्हणजेच महाराष्ट्र दिनी, जगभर प्रदर्शित होणार आहे. ■

# प्रवासापूर्वी १५ मिनिटांआधी बदलवू शकता स्टेशन

### प्रवाशांच्या सोयीसाठी तरतूद

◆ **नवी दिल्ली, २० फेब्रुवारी**

भारतीय रेल्वेने प्रवास करणाऱ्यांच्या सोयीसाठी रेल्वे बोर्डिंग स्टेशन बदलण्याच्या नियमांमध्ये सुधारणा करण्याची तयारी करत आहे. नवीन प्रस्तावानुसार, रेल्वे चार्ट तयार होण्यापूर्वी प्रवाशांना बोर्डिंग स्टेशन बदलण्यासाठी अर्ज करता येईल.

या संदर्भात, रेल्वे बोर्डाचे संचालकांनी सेंटर फॉर रेल्वे इन्फॉर्मेशन सिस्टम्सला आवश्यक मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. कन्फर्म तिकीट बुक केल्यानंतर प्रवासी अनेकदा त्यांच्या प्रवासाच्या योजना बदलतात. सध्याच्या नियमांमुळे त्यांना त्यांचे बोर्डिंग स्टेशन बदलणे कठीण होते. ही प्रक्रिया सोपी करण्याचा एक नवीन



प्रस्ताव आहे. जर एखाद्या प्रवाशाने एका स्थानकावरून तिकीट बुक केले असेल परंतु त्याच मार्गावरील दुसऱ्या स्थानकावरून रेल्वेमध्ये चढू इच्छित असेल, तर ते आरक्षण चार्ट तयार होण्यापूर्वी त्यांचे बोर्डिंग स्टेशन बदलण्यासाठी अर्ज करू शकतील. सध्याच्या प्रक्रियेनुसार, गाड्या सुटण्याच्या वेळापत्रकाच्या अंदाजे १० ते २० तास आधी आरक्षण चार्ट तयार करणे सुरू होते. प्रवाशांना अधिक सुविधा देण्यासाठी, रेल्वे बोर्डाने सेंटर फॉर रेल्वे इन्फॉर्मेशन सिस्टीम्सला या प्रस्तावाची व्यवहार्यता तपासण्यास सांगितले आहे. जर ही नवीन प्रणाली लागू झाली तर प्रवाशांना मोठा दिलासा मिळू शकेल.

या अंतर्गत, नियमित गाड्यांमधील प्रवाशांना चार्ट तयार होण्यापूर्वी सुमारे ३० मिनिटांपर्यंत त्यांचे बोर्डिंग स्टेशन बदलता येईल. तर, वंदे भारत एक्सप्रेससारख्या प्रीमियम गाड्यांमध्ये, ही सुविधा ट्रेन सुटण्याच्या किंवा चार्ट तयार होण्याच्या १५ मिनिटांपूर्वीच उपलब्ध असू शकते. ◂*(वृत्तसंस्था)*

# शांतता मंडळाचे 'युनो'वर नियंत्रण : ट्रम्प

● बैठकीत भारतीय राजदूत उपस्थित ● गाझाच्या पुनर्विकासासाठी १.५ लाख कोटींची मदत जाहीर




◆ **वॉशिंग्टन, २० फेब्रुवारी**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नेतृत्वात स्थापन करण्यात आलेल्या बोर्ड ऑफ पीस अर्थात् शांतता मंडळाच्या गुरुवारी पार पडलेल्या पहिल्या बैठकीत भारताने औपचारिक सहभाग घेतला. वॉशिंग्टन येथील भारतीय दूतावासात तैनात असलेले वरिष्ठ अधिकारी नमग्या सी खम्पा यांची बैठकीला उपस्थिती होती. बैठकीत भारताने निरीक्षक म्हणून भाग घेतल्याचे परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे. यावेळी ट्रम्प म्हणाले, शांतता मंडळाचे नियंत्रण आता संयुक्त राष्ट्रांवरही राहणार आहे.

मंडळाचा पूर्णवेळ सदस्य राहणार असल्याचे भारताने अद्याप स्पष्ट केलेले नाही. या बैठकीत गाझाच्या पुनर्बांधणीसाठी १.५ लाख कोटी रुपयांच्या मदत निधीची घोषणा करण्यात आली . ट्रम्प म्हणाले की, ९ सदस्य देश गाझा मदत निधीसाठी ६३ हजार कोटी रुपये (७ अब्ज डॉलर्स) देतील. तर, अमेरिका स्वतः ९० हजार कोटी रुपये (१० अब्ज डॉलर्स) देणार आहे. ५ देशांनी युद्धग्रस्त पॅलेस्टिनी प्रदेशात सैनिक तैनात करण्यास सहमती दर्शवली आहे. या बैठकीत सुमारे ५० देशांचे प्रतिनिधी सहभागी होते. ज्यामध्ये अझरबैजान, बेलारूस, इजिप्त, हंगेरी, इंडोनेशिया, इस्रायल, जॉर्डन, मोरोक्को, पाकिस्तान, कतार, सौदी अरेबिया, तुर्की, यूएई, उझबेकिस्तान आणि व्हिएतनाम यांचा समावेश आहे. भारत आणि युरोपियन युनियनसह उर्वरित देश निरीक्षक म्हणून सहभागी झाले. दरम्यान शांतता मंडळाच्या पहिल्या बैठकीपूर्वी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची बैठक झाली. यात वेस्ट बँक मध्ये इस्रायलच्या नियंत्रण वाढविण्याच्या प्रयत्नांवर टीका करण्यात आली. यामध्ये भारताचादेखील समावेश होता. ◂*(वृत्तसंस्था)*

### कायमस्वरूपी शांततेला प्राधान्य

» ट्रम्प म्हणाले, गाझा पुनर्विकासासाठी ७० अब्ज डॉलर्सचा निधी लागणार आहे, परंतु सध्या उपलब्ध झालेला निधी तुलनेत खूपच कमी आहे. सर्व देश एकत्र आल्यास या भागात कायमस्वरूपी शांतता प्रस्थापित केली जाऊ शकते. गाझावर खर्च करण्यात येणारा निधी या भागात स्थिरता आणण्यासाठी आणि चांगले भविष्य घडवण्यासाठी केलेली गुंतवणूक आहे. मंडळ आता जगभरातील संघर्ष सोडवण्यातही भूमिका बजावेल. ■

### काय आहे शांतता मंडळ

**१** ट्रम्प यांनी गेल्यावर्षी सप्टेंबर २०२५ मध्ये गाझा युद्ध संपवण्याची योजना सादर करताना पहिल्यांदा या मंडळाचा प्रस्ताव ठेवला होता. अमेरिकेने सुमारे ६० देशांना या मंडळात सामील होण्यासाठी निमंत्रण पाठवले.

**२** जगातील नेत्यांना पाठवलेल्या निमंत्रणात सांगितले होते की, या मंडळाची भूमिका केवळ गाझापुरती मर्यादित राहणार नाही, तर ते जागतिक स्तरावर संघर्ष सोडवण्यासाठीही काम करेल.

**३** जे देश तीन वर्षांपेक्षा जास्त काळ या मंडळाचे सदस्य होऊ इच्छितात, त्यांना १ अब्ज डॉलरचे योगदान द्यावे लागणार आहे. ■

### १९ वर्षांनी शकीरा करणार भारतात कार्यक्रम

**मुंबई :** ग्लोबल स्टार शकीरा या वर्षी भारतात एक शानदार कार्यक्रम करणार आहे. तिने २००७ मध्ये भारतात शेवटचा कार्यक्रम केला होता. आता, १९ वर्षांनंतर, शकीरा कार्यक्रम करण्यासाठी भारतात परतत आहे. जागतिक लॅटिन पॉप स्टार शकीरा जवळजवळ १९ वर्षांनंतर या एप्रिलमध्ये भारतात भव्य कार्यक्रम करत आहे. ती १० एप्रिलला मुंबईच्या महालक्ष्मी रेसकोर्स येथे आणि १५ एप्रिल २०२६ रोजी दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू स्टेडियममध्ये सादरीकरण करेल. २००७ मध्ये मुंबईत झालेल्या तिच्या 'ऑरल फिक्सेशन टूर' दरम्यानच्या संस्मरणीय कार्यक्रमानंतर हा तिचा पहिला मोठा संगीत कार्यक्रम असेल. ■



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# खिरापतींना 'सर्वोच्च' चपराक

लोकशाही शासन व्यवस्था म्हणजे लोकांनी लोकांसाठी चालविलेली व्यवस्था असते. ती समाजाच्या तळागाळातील, गोरगरीब वर्गाच्या कल्याणासाठी असते. शासनाने समाजातील वंचित, पीडित, दलित, शोषित आणि उपेक्षित वर्गाच्या सर्वांगीण उत्थानासाठी आवश्यक निर्णय घेतले पाहिजेत, उपाययोजना केली पाहिजे, याबद्दल कोणाचे दुमत असण्याचे कारण नाही. कल्याणकारी शासन व्यवस्थेची ती नैतिक आणि मूलभूत जबाबदारी म्हटली पाहिजे. एकात्म मानववादाचे प्रणेते पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या अन्त्योदयाची संकल्पनाही हीच आहे. अन्त्योदय म्हणजे समाजातील शेवटच्या माणसाचे कल्याण. समाजातील शेवटचा माणूस म्हणजे जो अन्न, वस्त्र आणि निवारा या जीवनातील मूलभूत गरजांपासून वंचित आहे तो माणूस. मात्र, गेल्या काही वर्षांत कल्याणकारी योजना आणि खिरापत किंवा रेवडी संस्कृती यांची सरमिसळ केली जात आहे, असे नाईलाजाने म्हणावेसे वाटते. खरे म्हणजे रेवडी संस्कृती आणि कल्याणकारी योजना यांत खूप फरक आहे. मात्र, खिरापत संस्कृतीत समाजातील गोरगरीब वर्गाच्या असहायतेचा एकप्रकारे गैरफायदा घेतला जातो. कल्याणकारी योजनेत त्याला स्वाभिमानाने जगण्याची संधी दिली जाते. त्याला स्वबळावर उभे होण्याची संधी दिली जाते.

सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भात दिलेला निर्णय सगळ्यांच्याच डोळ्यात अंजन आहे. मोफत योजनांसोबत आणखी एक प्रकार सध्या जोरात आहे. तो म्हणजे थेट बँक खात्यात कोणत्याही सबसिडीचे पैसे जमा करणे. या प्रकारात भ्रष्टाचार कमी होत असला, तरी या योजनेचा मोठ्या प्रमाणात गैरफायदाही घेतला जातो. सर्वोच्च न्यायालयाचा ताजा निर्णय तामिळनाडूसंदर्भात असला, तरी देशातील सर्व राज्य सरकारांना तो लागू होणारा आहे. द्रमुक सरकारने निवडणुकीवर डोळा ठेवून राज्यातील जनतेला मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला; त्याला तेथील वीज मंडळाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. राज्यात सध्या दरमहा १०० युनिट वीज मोफत आहे. नवी योजना लागू झाली तर संपूर्ण वीज मोफत मिळेल. याचा फायदा जसा गरीब वर्गाला मिळेल, तसाच तो श्रीमंतांनाही मिळेल. हरकतीचा मुद्दा हाच आहे. ज्याला गरज आहे, त्याला देण्यात काही हरकत नाही. पण ज्याला गरज नाही, त्याला कोणत्याही मोफत योजनेचा लाभ देणे चुकीचेच. सारे काही मोफत देण्याच्या योजनांमुळे देशाच्या आर्थिक विकासात अडथळा निर्माण होत आहे, या शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने सरकारला फटकारत अशा योजनांचा फेरविचार करण्याची सूचना केली आहे. सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय देशाच्या व्यापक हिताचा म्हटला पाहिजे. तामिळनाडूत येत्या काही महिन्यात विधानसभेच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. त्या पृष्ठभूमीवर वीज वितरण कंपनीच्या याचिकेची दखल घेताना सरन्यायाधीश सूर्यकांत, न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. विपुल पंचोली यांच्या खंडपीठाचे हे निर्देश तामिळनाडू सरकारला दिले आहेत. त्यावर तामिळनाडू सरकार कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष आहे. निवडणुका असलेल्या राज्यात त्या जिंकण्यासाठी मतांवर डोळा ठेवत लोकांना आकर्षित करणारे लोकप्रिय निर्णय घेण्याची प्रथा पडली आहे, असे म्हटले तर ते चूक ठरू नये.

मोफत योजना म्हणजे एकप्रकारे मतदारांना दिलेली लाच! दुसऱ्या शब्दात सांगायचे तर पैसे देऊन मत विकत घेण्याचा लोकशाहीविरोधी प्रकार म्हटला पाहिजे. त्यातूनच अमकी बहीण, तमका भाऊ, आवडता काका- मामा- भाचा- पुतण्या अशा लाडक्यांच्या मालिकांच्या योजनांची रांग लागली. सहज मार्गाने मते मिळविण्यासाठी राजकीय पक्षांना किंवा सरकारांना अशा योजनांचा अवलंब करावा लागतो. रेवडी योजनांचा राज्याच्या तसेच देशाच्याही अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होतो. त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे यातून आपण समाजाला ऐतखाऊ बनवितो, याचे भान ठेवण्याची गरज न्यायालयाने प्रतिपादिली आहे. सगळ्यांना सगळेच मोफत मिळाल्यास लोक काम तरी का करतील; यातून आम्ही कोणती संस्कृती विकसित करीत आहोत, असा जो प्रश्न न्यायालयाने विचारला, तो अतिशय मार्मिक म्हणावा लागेल. मोफत धान्य, मोफत वीज आणि अन्य मोफत योजनांची देशात लाट आली आहे. याचा अर्थ सरकारने समाजातील तळागाळातील लोकांच्या कल्याणासाठी काही करू नये, असा नव्हे. सरकार, मग ते कोणत्याही राजकीय पक्षाचे असो, त्याने समाजातील तळागाळातील लोकांच्या व्यापक कल्याणासाठी तात्पुरत्या स्वरूपाच्या उपाययोजना करण्याऐवजी स्थायी स्वरूपाच्या उपाययोजना करण्याची गरज आहे. मोफत योजनांचा भडीमार करण्याऐवजी त्यांना स्वावलंबी आणि आत्मनिर्भर केले पाहिजे. आपल्या पायावर उभे राहता यावे यासाठी त्यांना शिक्षणाची संधी तसेच व्यावसायिक प्रशिक्षण उपलब्ध करून दिले पाहिजे. सर्वांना रोजगार मिळेल, याची काळजी घेतली पाहिजे. रोजगार उपलब्ध करून दिले तर लाचारीचे जीणे जगण्याची आणि मोफत योजनांची भीक घेण्याची वेळ कोणावर येणार नाही. सर्वांना ताठ मानेने आणि स्वाभिमानाने जगता येईल.

योजनेच्या नावात 'मोफत' हा शब्द असला, तरी त्यासाठी सरकारला खर्च करावा लागतोच. ही राशी थोडीथोडकी नाही; ती काही हजार कोटींच्या घरात असते. सरकारला मिळणारा महसूल हा निश्चित आहे; त्यात एका मर्यादेपेक्षा जास्त वाढ होऊ शकत नाही. त्यामुळे विकास कामांवरच्या खर्चाला कात्री लावली जाते. त्यामुळे त्याचा फटकाही समाजालाच बसत असतो. आवश्यक योजनांवरील खर्च कमी करीत सरकारला अनावश्यक योजनांसाठी आर्थिक तरतूद करावी लागते. सर्व काही मोफत मिळू लागल्यामुळे कष्ट करण्याची सवय हळूहळू लोप पावत आहे. श्रमाला जी प्रतिष्ठा होती, ती कमी होत चालली आहे. ग्रामीण भागात शेतात काम करायला आज शेतमजूर मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची कोंडी होत आहे. शहरी भागात घरांत काम करणाऱ्या बायकांची संख्याही कमी होत चालली आहे. यातून नवीन सामाजिक प्रश्न उद्भवत आहेत. मुळात काम करण्याची सवयच समाजातून कमी होत चालली आहे, हा चिंतेचा विषय म्हटला पाहिजे. आज रोजगार मिळत नाही, बेरोजगारी वाढली असल्याचे रडगाणे सगळेच गात असतात; पण काम करण्याची, त्यातही कष्टाचे काम करण्याची कोणाची तयारी नाही, ही विसंगती म्हटली पाहिजे. सर्वांना दहा ते पाचची सुखाची नोकरी हवी आहे. मोफतच्या योजनांचा मारा करीत आम्ही समाजाला ऐदी, आळशी आणि ऐतखाऊ तर बनवले नाही ना, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे एकप्रकारे सर्वोच्च न्यायालयाने सगळ्याच सरकारांचे कान नुसते पकडले नाही तर पिळलेही.

राजकीय पक्ष आपल्या तात्कालिक लाभासाठी काही निर्णय घेत असतात. मोफत योजना हा असाच एक निर्णय आहे. यातून समाजाचे, देशाचे आणि देशाच्या अर्थव्यवस्थेचे किती नुकसान होते, याचा विचार ते करत नाहीत वा करू शकत नाहीत. एकीकडे आम्ही देशाला आत्मनिर्भर करण्याच्या गोष्टी करतो आणि दुसरीकडे देशातील जनतेवर मोफत योजनांचा मारा करीत त्यांना ऐदी किंवा आळशी बनवू पाहतो. याचा फटका देशातील विकास कामांना बसतो. सरकारला समाजातील तळागाळातील व्यक्तींसाठी काही करायचे असेल तर त्यांच्या मुलांना केजीपासून पीजीपर्यंतचे शिक्षण मोफत दिले पाहिजे. त्यांच्या मोफत वैद्यकीय उपचाराची व्यवस्था केली पाहिजे. अशा फुकटखाऊ योजना राबविण्यासाठी सरकारने एकतर आपल्या महसुलात वाढ केली पाहिजे, ते शक्य नसेल तर अशा योजना त्याचा आढावा घेत बंद केल्या पाहिजे. कारण अशा योजनांवर खर्च होणारा पैसा हा करदात्यांचा कष्टाचा आणि घामाचा असतो. त्याची उधळपट्टी करण्याचा अधिकार कोणत्याही सरकारला नाही. मतांसाठी सार्वजनिक पैशांचा असा खिरापतीसारखा केल्याने ज्याच्या खिशातून हा पैसा जातो, त्याचे नुकसान होते. ज्याला पात्रता नसताना तो पैसा मिळतो, त्याचेही नुकसान होते. अंतिमतः देशाचेही नुकसान होतेच.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# या चिमण्यांनो, परत फिरा रे!

गोव्याची गोव्याची भूमी ही केवळ निसर्गसौंदर्यासाठीच नाही, तर पराक्रमाच्या आणि संघर्षाच्या इतिहासासाठीही ओळखली जाते. याच पृष्ठभूमीवर महाशिवरात्रीच्या शुभमुहूर्तावर गोव्यातील पणजी येथील ३० वाडी परिसरात देव गोवेश्वर महाशिव मंदिरात भव्य धार्मिक सोहळा पार पडला; ज्याने केवळ गोव्याचेच नव्हे, तर संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले. या सोहळ्यात सुमारे ५०० बांधवांनी हिंदू धर्मात पुनर्प्रवेश केला आहे. यावेळी जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी महाराज यांचे मार्गदर्शन लाभले आहे. आखाडा परिषदेतील प्रमुख साधुसंत-महंतांच्या साक्षीने वेदपठन, हवन आणि पारंपरिक हिंदू विधी पार पडले. सुमारे ३०० बांधवांनी औपचारिकरीत्या 'घरवापसी' केली, तर इतर २०० जणांनीही हिंदू धर्म स्वीकारत एकूण संख्या ५०० वर पोहोचली. हा केवळ एक धार्मिक विधी नव्हता, तर तो होता आपल्या विखुरलेल्या बांधवांना पुन्हा एकदा मायेच्या सावलीत घेण्याचा एक भावनिक आणि आध्यात्मिक प्रयत्न.

हिंदू धर्माचा इतिहास हा सहिष्णुतेचा इतिहास आहे. मात्र, याच सहिष्णुतेचा फायदा घेत अनेक आक्रमकांनी आणि परकीय शक्तींनी या धर्मावर आघात केले. पण आपण सहिष्णू असलो, तरी पराक्रमात कधीही मागे नव्हतो. आपण या परकीय आक्रमकांचा सामना केला. गोव्याचा इतिहास तर अशा अनेक जखमांनी भरलेला आहे. पोर्तुगीज राजवटीत झालेल्या छळाच्या कथा ऐकल्या तर आजही अंगावर काटा येतो. आजही अनेक ठिकाणी कपटाने, प्रलोभने दाखवून किंवा गरिबी आणि अज्ञानाचा फायदा घेऊन हिंदू बांधवांचे धर्मांतर केले जाते. मिशनऱ्यांच्या जाळ्यात अडकून, आपल्या पूर्वजांच्या संस्कृतीपासून दूर गेलेली ही माणसे प्रत्यक्षात आपल्या मुळांपासून तुटलेली असतात. नरेंद्र महाराजांनी या वास्तवावर नेमके बोट ठेवले आहे. जे बांधव बळजबरीने, कपटाने, लालूच देऊन किंवा काही कारणास्तव त्रस्त होऊन आपला धर्म सोडून गेले, त्यांना पुन्हा सन्मानाने आपल्या धर्मात स्थान देणे, हे आपले कर्तव्य आहे. घरवापसी म्हणजे केवळ धर्मांतर नव्हे, तर ती आहे आपल्या रक्ताच्या नात्याची पुनर्भेट. ज्याप्रमाणे एखादे पाखरू संध्याकाळी आपल्या घरट्याकडे परतते, तशीच ही माणसे आज आपल्या मूळ संस्कृतीकडे परतत आहेत.

हिंदू धर्म हा केवळ एक उपासना पद्धती नसून ती एक व्यापक जीवन पद्धती आहे. हा धर्म म्हणजे फळे आणि फुलांनी बहरलेला एक विशाल वृक्ष आहे. या वृक्षाची मुळे हजारो वर्षे खोलवर रुजलेली आहेत. या वृक्षाच्या शीतल सावलीत बसण्याचा अधिकार जगातील प्रत्येक मानवाला आहे. या वृक्षाची फळे चाखण्याचा आणि त्याच्या फुलांचा सुवास घेण्याचा अधिकार कोणा एका विशिष्ट वर्गाचा किंवा जातीचा नाही, तर तो संपूर्ण मानवजातीचा आहे. अनेक आक्रमक आले, त्यांनी या वृक्षाच्या फांद्या तोडण्याचा प्रयत्न केला, त्याच्या मुळावर घाव घातले, पण हा वृक्ष आजही ताठ मानेने उभा आहे. जगातील अनेक प्राचीन संस्कृती काळाच्या ओघात नष्ट झाल्या. मेसोपोटेमिया, इजिप्त, ग्रीस यांसारख्या महान संस्कृती आज केवळ इतिहासाच्या पुस्तकात उरल्या आहेत. मात्र, हिंदू धर्म आणि त्याची संस्कृती आजही जिवंत आहे, प्रवाही आहे. हेच आमचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे. हा धर्म 'सनातन' आहे. कारण तो शाश्वत सत्यावर आधारित आहे. त्याचबरोबर इथे सुधारणाही सहज होत आहेत. आजच्या आधुनिक जगात केवळ अध्यात्म सांगून चालणार नाही, तर आपल्याला वास्तवाचे भानही ठेवावे लागणार आहे. इथे एक अत्यंत महत्त्वाचा मुद्दा उपस्थित राहतो, तो म्हणजे 'संख्याशास्त्र.' लोकशाहीच्या युगात संख्याबळाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. जर हिंदूंची संख्या घटत गेली, तर आपली संस्कृती, आपली मंदिरे आणि आपली जीवन पद्धती धोक्यात येऊ शकते. त्यामुळेच धर्मांतर रोखणे आणि गेलेल्यांना परत आणणे ही आजच्या काळाची गरज बनली आहे. आपण आपली पाळेमुळे जपली असली, तरी आपल्याला यापुढे अत्यंत सावध राहावे लागणार आहे. शत्रू केवळ तलवारी घेऊन धावत येत नाही, तर तो कधी विचारांच्या रूपात, कधी मदतीच्या रूपात तर कधी प्रलोभनांच्या रूपात आपल्या घरात शिरतो. आपल्या बांधवांना आपल्या धर्माचे महत्त्व पटवून देणे, त्यांच्या अडचणीत त्यांच्या पाठीशी उभे राहणे, हे प्रत्येक हिंदूचे कर्तव्य आहे. जर आपण आपल्या बांधवांची काळजी घेतली, तर त्यांना बाहेर मदतीसाठी हात पसरण्याची गरज पडणार नाही.

जगात आज सर्वत्र अशांतता पसरलेली आहे. युद्धे, दहशतवाद आणि द्वेषाच्या वातावरणात जग होरपळून निघत आहे. अशा वेळी जगाला शांततेचा मार्ग केवळ हिंदू धर्मच दाखवू शकतो. याचे कारण म्हणजे हिंदू धर्माची मूळ वृत्ती. 'वसुधैव कुटुंबकम्' म्हणजे संपूर्ण जग हेच एक कुटुंब आहे, ही भावना केवळ हिंदू धर्मातच आढळते. आपण केवळ स्वतःच्या कल्याणाचा विचार करत नाही, तर आपण 'पसायदान' मागतो. संत ज्ञानेश्वरांनी पसायदानात म्हटले आहे, 'जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मी रती वाढो। भूतां परस्परें पडो। मैत्र जीवाचें ॥' म्हणजे दुष्टांची बुद्धी पालटो आणि सर्व प्राणिमात्रांमध्ये मैत्रीची भावना निर्माण होवो. ही उदात्त भावना, ही विश्वकल्याणाची प्रार्थना केवळ एका हिंदूच्याच अंतःकरणातून येऊ शकते. त्यामुळेच जगात शांतता प्रस्थापित करायची असेल, तर हिंदू धर्माचे विचार प्रबळ होणे आवश्यक आहे. जे बांधव काही कारणास्तव अहिंदू झाले आहेत, ज्यांचे पूर्वज हिंदू होते, पण आज ते आपल्या संस्कृतीपासून दुरावले आहेत, त्यांना आमचे कळकळीचे आवाहन आहे- आपल्या घरी परत या. हिंदू धर्म हा कोणावरही सक्ती करत नाही, तो कोणाचा द्वेष करत नाही. हा धर्म तुम्हाला स्वीकारण्यासाठी, तुम्हाला प्रेम देण्यासाठी सदैव सज्ज आहे. नरेंद्र महाराजांनी आतापर्यंत अनेकांना पुन्हा हिंदू धर्मात आणले आहे. हा आकडा केवळ संख्या दर्शवत नाही, तर तो दर्शवतो त्या लोकांचा आपल्या मूळ संस्कृतीवर असलेला विश्वास. गोव्यातील त्या ५०० लोकांच्या डोळ्यांतील समाधान हे सांगत होते की, त्यांना त्यांचे हरवलेले घर सापडले आहे. वैदिक मंत्रांच्या घोषात, अग्नीच्या साक्षीने जेव्हा त्यांनी पुन्हा हिंदू धर्माची दीक्षा घेतली, तेव्हा तो क्षण केवळ त्यांच्यासाठीच नाही, तर संपूर्ण हिंदू समाजासाठी अभिमानाचा होता.

धर्मांतराचे संकट हे केवळ धार्मिक संकट नाही, तर ते सामाजिक आणि राष्ट्रीय संकटही आहे. जेव्हा एखादा हिंदू बांधव आपला धर्म सोडतो, तो आपल्या हजारो वर्षांच्या संस्कृतीपासून, आपल्या पूर्वजांच्या परंपरांपासून आणि आपल्या राष्ट्राच्या अस्मितेपासून दुरावतो. आपल्याला हे समजून घ्यावे लागेल की, धर्मांतर हे बहुधा अज्ञानातून किंवा गरजेपोटी केले जाते. जर आपण आपल्या बांधवांना योग्य शिक्षण दिले, त्यांना आपल्या धर्माचे श्रेष्ठत्व पटवून दिले तर कोणीही त्यांना आपल्यापासून तोडू शकणार नाही. या सोहळ्याने हे सिद्ध केले आहे की, जर आपण प्रेमाने आणि सन्मानाने साद घातली, तर गेलेले बांधव नक्कीच परत येतात. हिंदू धर्म हा कधीही संकुचित नव्हता. 'आ नो भद्राः क्रतवो यन्तु विश्वतः' म्हणजे सर्व दिशांनी आम्हाला शुभ विचार प्राप्त होवोत, ही आमची प्रार्थना आहे. आपण जगाला 'योग' दिला, 'आयुर्वेद' दिला आणि 'अध्यात्म' दिले. जगाला शांतीचा संदेश देणारा हा धर्म आज स्वतःच्या अस्तित्वासाठी संघर्ष करीत आहे. गोव्यातील त्या ५०० लोकांनी जेव्हा पुन्हा एकदा कपाळावर टिळा लावला आणि 'हर हर महादेव'चा जयघोष केला, तेव्हा तो केवळ एक आवाज नव्हता, तर तो होता आपल्या स्वाभिमानाचा हुंकार. हा हुंकार साऱ्या जगाला सांगत आहे की, हिंदू धर्म हा कधीही संपणारा नाही. तो त्या अक्षय वटासारखा आहे, जो प्रत्येक संकटातून अधिक जोमाने उभा राहतो. घरवापसीचा हा सोहळा एका नवीन पहाटेची सुरुवात आहे. जर आपण संघटित झालो आणि आपल्या बांधवांना प्रेमाने जवळ केले, तर कोणतीही शक्ती आपल्याला आपल्या मुळांपासून तोडू शकणार नाही. हिंदू धर्म हा त्या विशाल महासागरासारखा आहे, ज्यात अनेक नद्या येऊन मिळतात. या महासागराची खोली आणि त्याचे गांभीर्य समजून घेण्याची आज गरज आहे. या हिंदू धर्मावर तुमचाही अधिकार आहे बंधू आणि भगिनींनो... हा रुसवा सोडा आणि या विशाल वृक्षाच्या आश्रयाला या... या चिमण्यांनो, परत फिरा रे...

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**नीलेश जोशी**

# विद्यार्थ्यांमधील वाढते व्यसन चिंताजनक

एकीकडे जगात सर्वाधिक तरुणाई आपल्या देशात असल्याचा अभिमान बाळगत असतानाच दुसरीकडे उद्याचे भविष्य म्हणविल्या जाणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाढती व्यसनाधीनतेची समस्या चिंताजनक आहे. यासंदर्भात प्रचार माध्यमातून समोर येणारे काही वृत्त हे मतिगुंग करणारे आहेत. छत्तीसगढ राज्यातील धमतरी जिल्ह्यातील एका सरकारी शाळेत तब्बल ३५ मुलांनी मनगटावर ब्लेड मारून स्वतःला जखमी करून घेतले. या घटनेने तेथे एकच खळबळ उडाली. शासकीय यंत्रणा या संदर्भात तपास करीत आहे. याबाबत येथील गटशिक्षणाधिकाऱ्यांनी मुलांनी हा प्रकार ड्रग्ज सेवनाच्या प्रभावाखाली येऊन केला असावा, असा संशय व्यक्त केला आणि पुन्हा शालेय विद्यार्थ्यामधील व्यसनाधीतनेची चर्चा सुरू झाली. ही घटना छत्तीसगढ राज्यातील असली, तरी देशात सर्वदूर ही समस्या आहे. गत ऑगस्ट महिन्यात पुण्यातील हडपसर परिसरात असलेल्या शाळेत असाच प'कार उघडकीस आला होता. चौथी ते सातव्या इयत्तेत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये चॉकलेटच्या माध्यमातून अमली पदार्थ पोहोचविल्या जात असल्याचे तेव्हा उघडकीस आले होते. या गंभीर समस्येची व्याप्ती निश्चितच मोठी आहे. त्याच्या मुळाशी जाऊन व्यसनाधीनतेचे निर्मूलन करणे अत्यावश्यक आहे. कारण देशाचे भविष्य असणारी पुढची पिढीच संकटात आहे. ही समस्या केवळ शहरापुरती मर्यादित नाही; ग'ामीण भागातही ती झपाट्याने वाढताना दिसते. शाळेच्या गणवेशात असलेली मुले जर शाळेच्या बाहेर सिगारेट ओढताना किंवा गुटखा खाताना दिसली, तर तो समाजासाठी निश्चितच धोक्याचा इशारा म्हणावा लागेल.



शाळकरी विद्यार्थ्यामधील व्यसनांच्या विळ'याची आकडेवारी धक्कादायक आहे. गत काळात एका सामाजिक संघटनेने केलेल्या सर्वेक्षणात १०-१४ वयोगटातील सुमारे दोन कोटी शालेय विद्यार्थी तंबाखूच्या व्यसनाच्या आहारी गेल्याचे समोर आले. याच सर्वेक्षणानुसार तब्बल साडेपाच हजार विद्यार्थी दररोज या व्यसनाला बळी पडतात. शालेय विद्यार्थ्यांमध्ये तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन करणाऱ्यांचे प्रमाण सुमारे साडेआठ टक्के आहे. सातवा वाढदिवस साजरा करण्यापूर्वीच ११.४ टक्के मुले धूम'पान करतात तर २४ टक्के तंबाखूजन्य पदार्थाच्या आहारी जातात. आतातर तंबाखूपेक्षा धोकादायक असणाऱ्या अमली पदार्थाचे सेवन करण्याचे आकर्षण विद्यार्थ्यांमध्ये वाढत आहे. सिगारेट, हुक्का पार्लर, ई-सिगारेट हा तारुण्याच्या उंबरठ्यावर असणाऱ्यांसाठी प्रतिष्ठेचे ठरत आहे. यात मुलांसोबतच मुलींची सं'या चिंताजनक असल्याचे दिसून येते.

खरं म्हणजे या आणि अशा प्रकारच्या अनेक समस्यांना बदलती कुटुंब व्यवस्था कारणीभूत आहे का, याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. समाजामध्ये 'मी आणि माझे' हा बळावत असलेला संकुचित विचार, स्वकेंद्रित मानसिकता, पाश्चात्त्यांचे अंधानुकरण आणि भौतिक सुखांचा हव्यास यामुळे आपल्या संस्कृतीचे बलस्थान असलेली कुटुंब व्यवस्था गतीने बदलत आहे आणि या नकोशा बदलामुळे नवनवीन समस्या सामोरे येत आहे. वास्तविक कुटुंब व्यवस्थेतून होणारी जीवनमूल्यांची रुजवण, नकळत मिळणारे संस्कार चारित्र्यसंपन्न पिढी घडविते. याच संस्कारांचे प्रतिबिंब समाजात वावरताना उमटते. दुर्दैवाने कुटुंब व्यवस्थेची, त्यातून मिळणाऱ्या संस्कारांची वीण सैल होत असल्याचे चित्र आहे. या समस्येवर केवळ चर्चा करून व केवळ विचार व्यक्त करून उपाय मिळणार नाही. त्यासाठी आपल्या सर्व परिवारांना, समाजातल्या प्रत्येक कुटुंबातील सदस्यांनी व विशेषतः आई-वडिलांनी आपल्या पूर्वापार परंपरा, रूढी, सणोत्सव यांना प्राधान्य दिले पाहिजे. आपले पूर्वीचे जीवन जसे बाळबोध म्हटले जात होते ते संस्काराचे केंद्र होते. यातून जी पिढी तेव्हा पुढे आली तेव्हा त्यात महान विचारक, समाजसेवक असे अनेक क्षेत्रातील धुरिण निर्माण झालेत. घराघरांतून होणारे संस्कार लुप्त झाल्याने व्यसनाधीनतेसह अनेक समस्या निर्माण होत आहेत. यावर मात करण्यासाठी कुटुंब व्यवस्था पुन्हा संस्कार आणि संवादक्षम व्हावी.

९४२२८६२४८४

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# कुर्बानी कोण देणार?

लोकसभा असो किंवा विधानसभा, राज्यसभा असो किंवा विधान परिषद या निवडणुकांची चाहुल लागली की, महाराष्ट्रातील राजकारणात वेगळाच सळसळाट उसळतो. त्याचाच प्रत्यय आता भारत निवडणूक आयोगाने १६ मार्च रोजी राज्यसभेच्या निवडणुकांची तारीख जाहीर करताच महाविकास आघाडीच्या तंबूत बघायला मिळत आहे. महाराष्ट्रातून सात जागांसाठी निवडणूक होत असली, तरी महाविकास आघाडीच्या संख्याबळानुसार त्यांच्या वाट्याला प्रत्यक्षात एकच जागा निश्चित मानली जात आहे; आणि तिथूनच सुरू होतो तो प्रश्न 'कुर्बानी नेमकी कोण देणार?' कोणासाठी? आणि कशासाठी?

माढा निवडणुकीत आपली आता ही शेवटची निवडणूक म्हणून जाहीर करणारे शरद पवार राजकारणातून निवृत्ती घेतील, मार्गदर्शक म्हणून काम करतील अशी अपेक्षा होती. शरद पवारांचे पुतणे दिवंगत नेते अजित पवार यांची तशीच इच्छा होती. त्यांची ही इच्छा पूर्ण न होताच ते आपल्यातून निघूनही गेलेत. मात्र, शरद पवारांची इच्छा काही संपता संपेना झाली आहे. यावेळी पुन्हा शरद पवार यांनी राज्यसभेत जाण्याची स्वतः इच्छा व्यक्त करून, केवळ राजकीय वर्तुळात नव्हे, तर मविआत खळबळ उडवून दिली आहे. बरं, पवारांनी आपली इच्छा कोणाच्या तोंडून व्यक्त केली, तर संजय राऊत यांच्या... उबाठा गटाचे खासदार संजय राऊत यांनी पवारांनी स्वतः राज्यसभेवर जाण्याची इच्छा व्यक्त केल्याचा दावा करीत या चर्चेला अधिकृत स्वरूप दिलं. देशाला अनुभवी नेतृत्वाची गरज आहे, असा मुद्दा पुढे केला गेला. महाराष्ट्राच्या अस्मितेसाठी, मराठी माणसाचा आवाज संसदेत जोरकसपणे मांडण्यासाठी शरद पवारांचं राज्यसभेत जाणं महत्त्वाचं असल्याचं संजय राऊत म्हणत आहेत. मात्र, ८५ वर्षांच्या थकलेल्या, गंभीर आजारामुळे बोलण्याची थोडी अडचण असणाऱ्या व्यक्तीपेक्षा एखाद्या तरुण नेत्याला, उमेदवाराला जर संधी दिली तर तो मराठीचा आवाज अधिक जोरकसपणे मांडेल, असे राऊतांना का वाटू नये? की, उबाठा आणि शरद पवारांच्या पक्षात दुसरा कोणताही मराठी नेता, तरुण सक्षम नाही, असे राऊतांना सुचवायचे आहे का? एकही मराठी माणूस लायक नसल्यामुळेच मागील वेळी प्रियांका चतुर्वेदी या हिंदी महिलेला राज्यसभेवर पाठविले होते का? हे देखील गंभीर प्रश्न राऊतांच्या या भूमिकेमुळे निर्माण झाले आहेत.



### विधान परिषद : सत्तेचा दुसरा दरवाजा आणि बेगमी

मे महिन्यात विधान परिषदेच्या काही जागा रिक्त होत आहेत. त्यात उद्धव ठाकरे हेदेखील निवृत्त होत आहेत. त्यामुळे ठाकरे पुन्हा विधान परिषदेत जावेत, अशी उबाठा गटातील अनेकांची इच्छा आहे. पक्षप्रमुख म्हणून विधिमंडळात त्यांची उपस्थिती आवश्यक असल्याचा दावाही संजय राऊतांनीच केला आहे. राऊतांचा हा दावा म्हणजे सरळसरळ सौदेबाजीचेच संकेत होय. अर्थात शरद पवार राज्यसभेला आणि ठाकरे विधान परिषदेला, अशी ही राजकीय बेगमी केली जात असल्याचं स्पष्ट होत आहे. पण या व्यवहारात काँग्रेस कुठे आहे? मविआतील दोन पक्षांनी आपआपला स्वार्थ साधला, तोदेखील काँग्रेसला न विचारता, काँग्रेसच्याच जिवावर स्वतः निर्णय घेऊन दोघेही मोकळे झाले आहेत.

महाविकास आघाडीत काँग्रेस हा तिसरा, पण निर्णायक घटक आहे. संख्याबळानुसार दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष असलेली काँग्रेस यावेळी गप्प बसण्याच्या मनस्थितीत नाही. काँग्रेसकडून राष्ट्रवादी काँग्रेसने विलीनीकरणाच्या चर्चांबाबत भूमिका स्पष्ट करावी आणि राज्यसभा किंवा विधान परिषद, यापैकी किमान एक जागा काँग्रेसला द्यावी, अशी भूमिका घेतली जात आहे. हा केवळ दबावाचा डाव आहे की प्रत्यक्षात पर्याय उभा करण्याची तयारी, हे अद्याप स्पष्ट नाही. एवढं मात्र नक्की, यावेळी काँग्रेस स्वतःला केवळ प्रेक्षकाच्या भूमिकेत ठेवणार नाही आणि या दोघांच्या दबावतंत्राला बळी पडणार नाही. राजकारणात विचारधारा असते, पण राजकीय गणित अर्थात व्यवहारदेखील असतं. पवार दिल्लीला गेले, तर ठाकरे विधान परिषदेत हा 'पॅकेज डील' काँग्रेसला कितपत मान्य होईल? यातून काँग्रेसला काय फायदा होईल? हे यावेळी काँग्रेस बारकाईने बघणार, काँग्रेसची भूमिका येथे निर्णायक दिसत आहे. कारण 'एक जागा' या मर्यादेमुळे कोणाचंही स्वप्न दुसऱ्याच्या त्यागावर उभं राहणार आहे. त्यामुळं आता विचारधारा आणि व्यवहार दोन्हीचा कस लागणार आहे.

### 'कुर्बानी' की 'कुशल डाव?'

राजकारणात त्याग ही संकल्पना भाषणात शोभते. प्रत्यक्षात मात्र प्रत्येक पक्ष आपला राजकीय स्वार्थ साधण्याच्या प्रयत्नात असतो. उबाठाचं म्हणणं, संख्याबळ आमचं सर्वाधिक. राष्ट्रवादीचा युक्तिवाद, आमचं नेतृत्व राष्ट्रीय पातळीचं. काँग्रेसचा सवाल, आमचा वाटा काय? काँग्रेसला या समीकरणात समाधानकारक पर्याय द्यावा लागेल. अन्यथा शेवटच्या क्षणी वेगळं गणित उभं राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. या तिघांच्या तिढ्यातून मार्ग काढणं सोपं नाही. कारण इथे केवळ एक जागेचा प्रश्न नाही तर इथे सगळे भविष्यातील आपली राजकीय गुंतवणूक बघत, फायदा बघत आहेत. राज्यसभेवर जाणं म्हणजे राष्ट्रीय राजकारणात स्थान. विधान परिषद म्हणजे राज्याच्या राजकारणात प्रभाव. दोन्ही पदं महत्त्वाची. त्यामुळे दोन्हीवर दावा करणं स्वाभाविक. पण मविआतील तीन पक्षांपैकी दोघांचा यात लाभ दिसत आहे. तिसऱ्याच पक्षाचं काय? आता काँग्रेसने चंद्रपूरची घटना विसरून परभणीत उबाठाला समर्थन देत ज्याप्रमाणे कुर्बानी दिली होती, त्याचप्रमाणे काँग्रेस पुन्हा 'कुर्बानी' देते की 'कुशल डाव' खेळते? हे बघणे औत्सुक्याचे ठरणार आहे. काँग्रेसने जर राज्यसभेसाठी स्वतःचा उमेदवार उभा करण्याचा निर्णय घेतला, तर महाविकास आघाडीत तणाव निर्माण होऊ शकतो आणि जर राष्ट्रवादीला बाजूला ठेवून काँग्रेस-शिवसेना एकत्र आली, तर तेही वेगळं चित्र उभं होईल. म्हणजेच आघाडीत एकमताचा दावा असला, तरी प्रत्यक्षात ज्याप्रमाणे उबाठाने काँग्रेसला सोडून मुंबई पालिका निवडणूक मनसेसोबत लढली, त्याचप्रमाणे काँग्रेसकडेही अनेक पर्याय खुले आहेत. कारण काँग्रेससाठी ही निवडणूक केवळ एका जागेची नाही तर आघाडीतल्या प्रभावाची आणि राजकारणातल्या अस्तित्वाची आहे. राजकारणात शेवटच्या क्षणी समीकरणं बदलण्याची परंपरा आपल्याला आता काही नवीन राहिलेली नाही.

९२७०३३३८८६

### सकारात्मक विचार करून परीक्षा द्या

दहावीची बोर्ड परीक्षा आजपासून म्हणजे २० फेब्रुवारीपासून सुरू होत असून ती १८ मार्चपर्यंत असणार आहे. बारावीची परीक्षा ११ मार्चपर्यंत चालणार आहे. या परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील मैलाचा दगड असतो. विद्यार्थ्यांच्या आयुष्याला कलाटणी देणाऱ्या या परीक्षा असतात म्हणूनच या परीक्षा विद्यार्थ्यांच्या जीवनात अतिशय महत्त्वाच्या असतात. दहावी-बारावीची बोर्ड परीक्षा म्हणजे विद्यार्थी आणि पालकांसाठी कमालीचे टेन्शन. करीअरच्या दृष्टीने आणि पुढील अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी बोर्ड परीक्षेच्या गुणांना खूप महत्त्व असते. त्यामुळे विद्यार्थी वर्षभर भरपूर अभ्यास करत असतात. पण प्रत्यक्ष जेव्हा परीक्षा जवळ येते तेव्हा मात्र विद्यार्थ्यांचे टेन्शन वाढते. मात्र, या काळात विद्यार्थ्यांनी टेन्शन फ्री राहणे गरजेचे आहे. नकारात्मक विचार घेऊन जर विद्यार्थी परीक्षेला गेला तर त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी परीक्षा कालावधीत प्रसन्न राहावे. सतत अभ्यास करण्याऐवजी मध्येमध्ये ब्रेक घ्यावा. मित्रांशी अन्य विषयांवर चर्चा करावी, आवडती पुस्तके वाचणे अशा गोष्टी कराव्यात. रात्री जागरण करणे टाळावे. परीक्षा कालावधीत मोबाईलपासून दूरच राहावे. अभ्यासाचा खूप ताण आल्यास विश्रांती घ्यावी. घरी बनवलेलेच जेवण वेळेवर करावे. पालकांनीही या काळात सकारात्मक राहावे. आपल्या पाल्यांवर अभ्यासासाठी दबाव आणू नये. विद्यार्थी परीक्षेचे टेन्शन न घेता सकारात्मक विचार घेऊन परीक्षेला गेला तर यश निश्चित मिळेल.

**श्याम ठाणेदार** /९९२२५४६२९५

## वाचक पत्रे

### शिवचरित्राने डोळे उघडले पाहिजे

हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र म्हणजे कर्मयोगी तत्त्वज्ञानाचा जिवंत साक्षात्कार आहे. राष्ट्रधर्माचे आणि समाजधारणेचे महान तत्त्वज्ञान आहे. हे चरित्र केवळ एका व्यक्तीचे नाही तर ते हिंदवी स्वराज्यचे आणि हिंदवी समाजाचे चरित्र आहे. ज्यांना आपले राष्ट्र सार्वभौम, सामर्थ्यशाली, समृद्ध आणि अजिंक्य बनवायचे असेल त्यांनी ते हृदयात जपले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांना हिंदुत्वाचा अभिमान होता. आपला धर्म, आपले स्वराज्य, आपली संस्कृती याचे रक्षण हा त्यांच्या स्वराज्य स्थापनेच्या अनेक उद्धेशापैकी एक होता. म्हणूनच शिवचरित्राचा आदर्श आमच्या डोळ्यापुढे डोळसपणे ठेवला पाहिजे. या तेजस्वी चरित्राने आमचे केवळ डोळे दिपता कामा नयेत, ते उघडले गेले पाहिजे असे म्हणावे वाटते.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

### डिलिव्हरी बॉईजच्या मागण्यांची पूर्तता करा



ऑनलाईन खरेदीचे प्रमाण प्रचंड वाढलेले आहे. घरबसल्या वस्तू खरेदी करून खरेदीची हौस जिरविणाऱ्यांची संख्या सतत वाढतच आहे. त्यातच खाद्यपदार्थ मागवण्याचा प्रकारही शहरी भागात लोकप्रिय आहे. त्यासाठी वेगवेगळ्या कंपन्या सेवा पुरवीत असतात. त्यात वरचेवर स्पर्धादेखील वाढत चालली आहे. अशा डिलिव्हरी बॉईजना गिग वर्कर्स म्हटले जाते. त्यांच्या हक्क-अधिकारांचा विचार सध्या कुणीच करायला तयार नाही. खाद्यपदार्थांची ने-आण वेळेवर व्हावी यासाठी हे तरुण कामगार कायम धडपड करीत असतात. महानगरांमधील धावपळीच्या किंवा धकाधकीच्या जीवनात प्रत्येकासाठी वेळ अतिशय महत्त्वाचा असतो. कशाचीही तमा न बाळगता हे डिलिव्हरी बॉईज वर्कर्स आपले काम इमाने-इतबारे करीत असतात. वेळ वाचावा म्हणून ते प्रसंगी वाहतुकीचे नियमही पाळत नाहीत. अतिशय घाईमध्ये ऑर्डर वेळेत पोहोचविण्याची त्यांची लगबग असते. एखाद्या वेळेस उशीर झाल्यास ग्राहकांची बोलणीदेखील खावी लागतात. त्यामुळेच त्यांना धावाधाव करण्याशिवाय दुसरा पर्याय नसतो. खाद्यपदार्थ गरम असेल तर त्यांच्या धावपळीचे चीज होते. अन्यथा कंपनीकडूनदेखील त्यांच्यावर दंड ठोठावला जातो. अलिकडेच देशातील लाखो डिलिव्हरी बॉईजनी आपल्या प्रमुख मागण्यांसाठी संप पुकारला होता. सध्या देशात सव्वा कोटी डिलिव्हरी बॉईज या क्षेत्रात असल्याची आकडेवारी प्रसिद्ध झाली. या व्यवसायाची व्याप्ती वाढतच चालली असल्यामुळे डिलिव्हरी बॉईज यांचे महत्त्व वाढत आहे. मात्र, त्यांना मिळणारी वागणूक आणि मोबदला यावर सरकारकडून विशेष लक्ष दिले जाण्याची गरज आहे. नोकरीची शाश्वती, डिलिव्हरी पोच करण्याची वेळ वाढावी, किमान वेतन मिळावे तसेच कामाची वेळ आठ तासांची करावी इत्यादी मागण्यांवर सकारात्मक दृष्टीने विचार होणे आवश्यक आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## महत्वाचे...



## राष्ट्रवादी काँग्रेस (शप)च्या प्रदेश सचिवपदी ॲड. विजयसिंह गिड्डे

**मोडनिंब, दि. २० फेब्रुवार-**

राष्ट्रवादी काँग्रेस (शप)च्या प्रदेश सचिवपदी मोडनिंब (ता. माढा) येथील ॲड विजयसिंह गिड्डे यांची निवड झाली आहे. आ. रोहित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदेशाध्यक्ष आ. शशिकांत शिंदे यांच्या हस्ते राष्ट्रवादी युवक काँग्रेस प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख यांच्या स्वाक्षरीचे नियुक्तीपत्र त्यांना देण्यात आले. निवडीनंतर पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे ॲड. गिड्डे यांनी सांगितले. त्यांच्या निवडीबद्दल खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, आमदार अभिजित पाटील यांच्यासह विविध स्तरांतून स्वागत होत आहे.

## मलाबार गोल्डतर्फे आजपासून हेरिटेज डायमंड ज्वेलरी प्रदर्शन

**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

सात रस्ता, व्हीआयपी रोड येथील मलाबार गोल्ड अँड डायमंड्स तर्फे हेरिटेज डायमंड ज्वेलरी प्रदर्शनाचे आयोजन शनिवार २१ फेब्रुवारी ते १ मार्च या कालावधीत दररोज सकाळी १०.३० ते रात्री ८.३० या वेळेत हे प्रदर्शन होणार आहे, अशी माहिती या फर्मच्या सोलापूर शाखेचे व्यवस्थापक सागर जक्का यांनी पत्रकार परिषदेत दिली. मलाबार गोल्ड अँड डायमंड्स ही आंतरराष्ट्रीय स्तरावर विश्वासार्ह आणि पारदर्शक व्यवहारासाठी ओळखली जाणारी आघाडीची ज्वेलरी ब्रँड आहे. ग्राहकांचा विश्वास, उच्च दर्जा आणि आकर्षक डिझाइन्स हे आमचे ब्रीदवाक्य आहे. सोलापूरमधील ग्राहकांसाठी या फर्मतर्फे खास पारंपरिक वारसा जपणाऱ्या आणि आधुनिकतेची सांगड घालणाऱ्या डायमंड ज्वेलरीचे प्रदर्शन आयोजित केले आहे. या प्रदर्शनात पारंपरिक आणि रॉयल लूक असलेले एक्सक्लुझिव्ह डायमंड कलेक्शन, ब्राइडल स्पेशल आणि सिग्नेचर डिझाइन्स उपलब्ध करण्यात आले आहेत. मर्यादित कालावधीसाठी खास ऑफर्स व आकर्षक खरेदीची ही योजना आहे. प्रमाणित व हॉलमार्क असलेली उच्च दर्जाची डायमंड ज्वेलरी, अनुभवी ज्वेलरी सल्लागारांकडून वैयक्तिक मार्गदर्शन असे या प्रदर्शनाचे वैशिष्ट्य आहे. या प्रदर्शनाचा उद्देश केवळ विक्री नसून, सोलापूरमधील ग्राहकांना जागतिक दर्जाची डायमंड ज्वेलरी त्यांच्या शहरातच उपलब्ध करून देणे हा आहे. या पत्रकार परिषदेला सचिन पाटोळे, शाहीर सय्यद, अनुराधा हडपद, स्नेहा बुधनी, सुमित टकले आदी उपस्थित होते.

## फायनान्सकडून फसवणूक, परतावा न मिळालेल्यांनी संपर्क साधावा

**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

**पोलीस आयुक्तालयाकडून गुंतवणूकदार ठेवीदारांना आवाहन**

साईराज फायनान्सचे सचिन भडंगे यांनी सोलापूरातील गुंतवणूकदार/ठेवीदार यांची फसवणूक केली असल्याची तक्रार पोलीस आयुक्तालयाकडे केली आहे. शहरातील साईराज फायनान्स या कंपनीमध्ये ज्या ठेवीदारांनी गुंतवणूक केली आहे व ज्यांना या कंपनीकडून परतावा मिळालेला नाही, त्या ठेवीदारांनी आर्थिक शहर गुन्हे शाखा या ठिकाणी कागदपत्रासह हजर राहून माहीती द्यावी असे आवाहन पोलीस आयुक्तालयाकडून करण्यात आले आहे. पोलीस आयुक्त कार्यालय, सोलापूर शहर येथे तक्रारदार पुनम धनंजय ढवळे (वय ४० वर्षे, रा.२९, ए, होमकर नगर, भवानी पेठ) यांनी साईराज फायनान्सचे सचिन नामदेव भडंगे यांचेविरोधात तक्रार अर्ज दिलेला होता. या तक्रार अर्जाची चौकशी गुन्हे शाखेकडून करण्यात आली असता, सचिन भडंगे याने फिर्यादीचे सासरे शामसुदंर ढवळे यांना त्याच्या साईराज फायनान्स मध्ये पैसे गुतंवणुक करण्यास परावृत्त करुन, फिर्यादी यांचे मयत सासरे यांच्याकडुन ७९ लाख ४८ हजार रुपये रोख स्वरुपात व खात्यावर रक्कम घेवुन त्या रक्कमेवर १२ टक्के दरमहा १ लाख ८० हजार रुपये परतावा देतो असे सांगुन फिर्यादी यांचे मयत सासरे शामसुंदर ढवळे यांच्याकडुन पैसे घेतले. तसेच साक्षीदार नरेंद्र मोहनराव चव्हाण यांच्याकडुन ६ लाख रुपये घेतले. फिर्यादी यांचे मयत सासरे शामसुंदर ढवळे व साक्षीदार नरेंद्र चव्हाण यांच्याकडुन घेतलेली रक्कम ८५ लाख ४८ हजार रुपये घेवुन, घेतलेली रक्कम व त्यावरील परतावा परत न देता फिर्यादी व साक्षीदार यांची फसवणुक केली आहे. पुनम ढवळे (वय ४० वर्षे, रा.२९ ए होमकर नगर, भवानी पेठ) यांनी दिलेल्या तक्रारी अर्जाचे चौकशीअंती जोडभावी पोलीस ठाणे सोलापूर शहर येथे गुन्हा नोंद असून पुढील तपास आर्थिक गुन्हे शाखेचे सपोनि पेटकर करीत आहेत.





## शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी लोखंडी रॉडने एकास मारहाण

**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी थांबलेल्या एका व्यक्तीस शिवीगाळ वरून लोखंडी रॉडने मारहाण झाल्याचा धक्कादायक प्रकार दिनांक १९ फेब्रुवारी रोजी घडला आहे. या हकीकत अशी की, शरीफ होटगी वय २४, रा. मुस्लिम पाच्छा पेठ सोलापूर हा प्रभात टॉकीज समोर थांबला असताना शिवीगाळ वरून उमेश (पूर्ण नाव माहित नाही) यांनी लोखंडी रोडने मारल्याने डोक्यात जखम झाल्याने त्यांना उपचारासाठी मित्र सोहेल पटेल यांनी शासकीय रुग्णालय येथे दाखल केले अशी नोंद सिविल पोलीस चौकीत झाली आहे.


## सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

**घनकचरा व्यवस्थापन कार्यालय**

**इंद्रभुवन इमारत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, सोलापूर ४१३००२**

जा.क्र./स.आ./वे./५५२ दि. २०/०२/२०२६

स्वच्छता ही सेवा

**जाहीर टेंडर नोटीस**

**सोलापूर महानगरपालिका**

**घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील कर्मचाऱ्यांकरिता सुरक्षा साहित्य, अवजारे खरेदी करणेकरिता अल्पमुदतीची निविदा प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.**

१) अ.क्र. - २२१५ २) अ.क्र. - २२१६ ३) अ.क्र. - २२१७

सदर कामाच्या निविदा व तपशील सोलापूर महानगरपालिकेच्या वेबसाईटवर दि. २०/०२/२०२६ पासून पाहण्यास उपलब्ध आहे.

सही/-
(शशिकांत भोसले)
सहा. आयुक्त
सोलापूर महानगरपालिका

---

### जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ११६/२०२५

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

१. **पिरखान बशीर पठाण** - अर्जदार
रा. पिंपरी (आर) ता. बार्शी जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील विशाल डी. गोणेकर)
विरुध्द
२. **जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रा.प. पिंपरी (आर)** - गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. पिंपरी (आर) ता. बार्शी जि. सोलापूर यांचा मौजे पिंपरी (आर) ता. बार्शी राहत्या घरी याठिकाणी दिनांक १० मे १९८२ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक १० मे १९८२ रोजी मौजे पिंपरी (आर) ता. बार्शी राहत्या घरी याठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन दयावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३० डिंसेबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का
सही/-
(एफ.आर. शेख)
तहसिलदार, बार्शी

---

### जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ७३/२०२५

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

१. **जयश्री श्रीमंत माळी** - अर्जदार
रा. मळेगाव ता. बार्शी
(असल्यास, तर्फे वकील विशाल डी. गोणेकर)
विरुध्द
२. **जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रा.प. मळेगाव** - गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. मळेगाव, ता. बार्शी यांचा मौजे मळेगाव, ता. बार्शी राहत्या घरी याठिकाणी दिनांक ०१ जुन १९८२ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०१ जुन १९८२ रोजी मौजे मळेगाव, ता. बार्शी राहत्या घरी याठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन दयावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३० डिसेबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का
सही/-
(एफ.आर. शेख)
तहसिलदार, बार्शी

---

बँक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

**नवी पेठ, शाखा - पहिला मजला, डांगेकर कॉम्प्लेक्स, विठ्ठल मंदिर चौपाड, नवी पेठ, सोलापूर - ४१३००७**

**परिशिष्ठ 3-A प्रतिकात्मक ताबा नोटीस**

ज्या अर्थी, खाली सही करणार बँक ऑफ बडोदाचे अधिकृत अधिकारी, यांनी सिक्युरीटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ आणि सेक्शन १३(२) कलमाखाली व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ चा रुल ३ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करुन कर्जदार **सौ. कोमल सागर पवार आणि श्री. सागर राजेंद्र पवार यांना दिनांक १८/०८/२०२५ रोजी मागणी नोटीस बजावली** होती की त्यांनी सदर मागणी नोटीसीत नमूद केलेली **रक्कम रु. ३०,५४,८२१.०४/- (अक्षरी - तीस लाख चौपण्ण हजार आठशे एकवीस रुपये आणि चार पैसे फक्त)** + त्यावर अधिक व्याज + इतर **खर्च** हे या नोटीसीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परत करावी.

कर्जदार ही रक्कम परत करण्यास अपयशी ठरले असल्याने विशेषकरुन कर्जदार / जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते की, खाली सही करणार यांनी त्यांना / तिला सदर कायद्याच्या सेक्शन १३(४) चा रुल ८ अंतर्गत अधिकारांचा वापर करुन खाली नमूद केलेल्या मालमत्तेचा **दि. २०/०२/२०२६ रोजी प्रतिकात्मक ताबा** घेतला आहे.

विशेष करुन कर्जदार, आणि जनता यांना सावध करण्यात येते की त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये. असा व्यवहार केल्यास तो बँक ऑफ बडोदा यांना येणे रक्कम **रु. ३०,५४,८२१.०४/- (अक्षरी - तीस लाख चौपण्ण हजार आठशे एकवीस रुपये आणि चार पैसे फक्त)** + व्याज + **इतर खर्च** यांच्या अधिन राहील.

सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम १३ च्या उपकलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदाराचे लक्ष वेधले जाते.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

प्लॉट क्रमांक २४७/१, एफ प्लॉट क्रमांक ३५, फ्लॅट क्रमांक ४, दरवाजा-क्षेत्र. जमीन चौरस मीटर, बिल्ड अप क्षेत्र २७.४२, कार्पेट क्षेत्र २४.६७ येथे असलेल्या मालमत्तेचे गहाणखत, जे फ्लॅट क्रमांक ४, दुसरा मजला, जय लक्ष्मी रेसिडेन्सी २, सब प्लॉट क्रमांक २४७/१, एफ प्लॉट क्रमांक ३५ सी.एस. क्रमांक १०३८९/ए. टी. पी. क्रमांक १ न्यु पाच्छा पेठ, सोलापूर-४१३००५ येथे आहे. श्रीमती कोमल सागर पवार आणि श्री. सागर राजेंद्र पवार यांच्या मालकीचे आहे.

**पुर्वेस** : फ्लॅट क्रमांक ०५
**दक्षिणेस** : फायनल फ्लॅट क्रमांक ३५/२४७/२
**उत्तरेस** : प्लॉट क्रमांक ३५/२४८
**पश्चिमेस** : रोड

दिनांक : २०/०२/२०२६
स्थळ : नवी पेठ, सोलापूर

(मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा)

सही/-
अधिकृत अधिकारी
बँक ऑफ बडोदा

---

### बैंक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra

प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5

91 YEARS

**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**

आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

**नियम - ८ (११)**

**ताबा सूचना**

जेथे, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत बँक ऑफ महाराष्ट्रचे अधिकृत अधिकारी म्हणून आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ३ सह वाचलेल्या कलम १३ च्या उपकलम (१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, २६.०२.२०२४ रोजी डिमांड नोटिस जारी केल्या आहेत ज्यामध्ये खालील कर्जदारांना आणि जामीनदारांना सूचना मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत संपूर्ण थकबाकी परत करण्याचे आवाहन केले आहे.

कर्जदाराने रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की १८.०२.२०२६ रोजी सुरक्षा हित अंमलबजावणी नियम, २००२ च्या नियम ८ सह वाचलेल्या कायद्याच्या कलम १३ च्या उपकलम (४) अंतर्गत त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा अधोरेखित व्यक्तीने घेतला आहे.

कर्जदाराला विशेषतः आणि सर्वसामान्य जनतेला येथे इशारा देण्यात येत आहे की त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी कोणताही व्यवहार केल्यास वर नमूद केलेल्या रकमेसाठी बँक ऑफ महाराष्ट्रकडून शुल्क आकारले जाईल.

कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उपकलम (८) च्या तरतुदींकडे आकर्षित केले जाते, उपलब्ध वेळेनुसार, सुरक्षित मालमत्ता परत मिळविण्यासाठी..

| अ.क्र. | शाखेचे नाव, कर्जदार आणि जामीनदार | गहाण ठेवलेल्या मालमत्तेची माहिती | मागणी सूचना आणि एकूण देयके |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा- इर्ले-वैराग**<br>**कर्जदार :-**<br>**१. श्री. सुनील राजेंद्र देवकते**<br>पत्ता: पोस्ट वैराग ता. बार्शी. जिल्हा सोलापूर ४१३४०२.<br>**२. श्रीमती. लक्ष्मी राजेंद्र देवकते**<br>पत्ता: पोस्ट वैराग ता. बार्शी. जिल्हा सोलापूर ४१३४०२. | **सुरक्षा:-**<br>सीटीएस/सर्वेक्षण क्रमांक/गट क्रमांक ३९१/२ असलेल्या जमिनीचे नोंदणीकृत गहाणखत, भूखंड क्रमांक ३३ जीपी एमआय क्रमांक २२१२/७३ चा भाग, १६७.१७ चौ.मी. वैराग पोस्ट वैराग ता. बार्शी जिल्हा सोलापूर ४१३४०२ येथे श्री. सुनील राजेंद्र देवकते यांच्या नावाने.<br>**अशी चतु:सीमा -**<br>उत्तरेकडे किंवा दिशेने :- प्लॉट क्रमांक ३२,<br>पूर्वेकडे किंवा दिशेने :- प्लॉट क्रमांक ४२,<br>पश्चिमेकडे किंवा दिशेने :- रस्ता,<br>दक्षिणेकडे किंवा दिशेने :- प्लॉट क्रमांक ३४ | **मागणी सूचना:**<br>**दिनांक : २६/०२/२०२४**<br>रु. १५,१६,५३०.३८/-<br>(रुपये पंधरा लाख सोळा हजार पाचशे तीस रुपये आणि अडोतीस पैसे फक्त) अधिक २६/०२/२०२४ पासून कर्जाची वसुली होईपर्यंत लागू न केलेले व्याज<br>**भौतिक ताबा तारीख:-**<br>**१८/०२/२०२६** |

ठिकाण - सोलापूर
दिनांक - १८/०२/२०२६

सही/-
मुख्य व्यवस्थापक आणि अधिकृत अधिकारी,
सोलापूर झोन.

---

### जाहीर प्रसिध्दीकरण

एस आर-३५८/२०२६

**सोलापूर येथील मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी साहेब, उत्तर सोलापूर यांचे कार्यालयात, सोलापूर.**

**कदिरबाशा शरफोद्दीन जमादार**
वय - ४० वर्षे, धंदा - व्यवसाय
रा. सिध्देश्वर नगर-२, मजरेवाडी, सोलापूर
मोबाईल नंबर- ९७६६८१९९४५ / २५२६००९५८ — **अर्जदार**
विरुध्द
**मा. उपनिबंधक, जन्म-मृत्यु नोदणी विभाग, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर** — **सामनेवाला**

सदर अर्जदार याचे दि. २३/०७/१९८५ रोजी वाडीया हॉस्पीटल सोलापूर येथे जन्म झालेले आहे. तर अर्जदाराचे आईचे नाव जैनब्बी शरफोद्दीन जमादार असे आहे तर अर्जदाराचे वडीलांचे नाव शरफोद्दीन दादासाहेब जमादार असे आहे. सबब सदरचा अर्ज जन्म दाखला मिळणेकरीता दाखल केलेली आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी कोणाची काही हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून नेमलेली तारीख १५/०३/२०२६ रोजी स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून म्हणणे न आल्यास काहीही हरकत नाही असे समजुन या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल.

आज दिनांक १८/०२/२०२६ रोजी आमचे सहीने व तहसिलदार यांच्या शिक्क्याने प्रसिध्द केले असे.

शिक्का
सही/-
तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, उत्तर सोलापूर

---

### जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ११७/२०२५

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

१. **नशिर बशीर पठाण** - अर्जदार
**रा. पिंपरी (आर) ता. बार्शी जि. सोलापूर**
(असल्यास, तर्फे वकील विशाल डी. गोणेकर)
विरुध्द
२. **जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रा.प. पिंपरी (आर)** - गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. पिंपरी (आर) ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे पिंपरी (आर) ता. बार्शी राहत्या घरी याठिकाणी दिनांक ०९ जुन १९८७ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०९ जुन १९८७ रोजी मौजे पिंपरी (आर) ता. बार्शी राहत्या घरी याठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३० डिंसेबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का
सही/-
(एफ.आर. शेख)
तहसिलदार, बार्शी

---

### जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. १३७/२०२५

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

१. **आनंद श्रावण गायकवाड** - अर्जदार
रा. चारे ता. बार्शी, जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील शिवाजी रा. जाधवर)
विरुध्द
२. **जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रा.प. चारे** - गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदाराची मुलगी नलिनी आनंद गायकवाड, रा. चारे ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे चारे ता. बार्शी राहत्या घरी याठिकाणी दिनांक २१ ऑगस्ट २००७ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराची मुलगी नलिनी आनंद गायकवाड यांचा दिनांक २१ ऑगस्ट २००७ रोजी मौजे चारे, ता. बार्शी राहत्या घरी याठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलानार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. २० फेब्रुवारी २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का
सही/-
(एफ.आर. शेख)
तहसिलदार, बार्शी

---

### जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. १०७/२०२५

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

१. **रुपाली चंद्रशेखर तेलंगे** - अर्जदार
रा. मानकेश्वर, ता. भूम, जि. धाराशिव
(असल्यास, तर्फे वकील राहूल अंकुश गुंड)
विरुध्द
२. **जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी न.प. बार्शी** - गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराची मुलगी स्वराली चंद्रशेखर तेलंगे, रा. मानकेश्वर, ता. भूम, जि. धाराशिव यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील श्रध्दा हॉस्पिटल बार्शी याठिकाणी दिनांक ०२ ऑक्टोबर २०२१ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराची मुलगी स्वराली चंद्रशेखर तेलंगे यांचा दिनांक ०२ ऑक्टोबर २०२१ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील श्रध्दा हॉस्पिल, बार्शी याठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. २० फेब्रुवारी २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का
सही/-
(एफ.आर. शेख)
तहसिलदार, बार्शी

---

### जाहीर प्रसिध्दीकरण

सि.कि. अर्ज नं. ३४५/२०२५

**सोलापूर येथील मे. जिल्हा न्यायाधिश (डी.एन. सुरवसे) यांचे कोर्टात**

**१) श्रीमती राजश्री पती सचिन बिरादार,**
वय - ३५ वर्षे, धंदा - घरकाम,
**२) चि. ध्रुव पिता सचिन बिरादार**
वय - ११ वर्षे, धंदा - शिक्षण,
(अज्ञान अर्जदार नं. २ याची पालनकर्ती आई अर्जदार नं. १ राजश्री स. बिरादार ही असे).
हल्ली रा. द्वारा - श्री. सागर सिध्दाराम मल्लाड
सी-२२९, सिंधु विहार, हिंदु कॉलनी,
जुळे सोलापूर, सोलापूर. — **अर्जदार**
विरुध्द
**महाराष्ट्र सरकार**
**(सदरची नोटीस मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांचेवर बजावण्यात यावी.)** — **सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदार नं. १ यांनी अज्ञान अर्जदार नं. २ याचे नावे असलेली डि।। व सब डि।। सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर भाग सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढीतील सोरेगाव येथील 'स्क्वेअर पार्क'मधील बिनशेती खुली प्लॉट जागा यांसी गट नं. २११ पैकी प्लॉट नं. ४० यांसी क्षेत्र ९४.२५ चौ.मी. किंवा १०१४.५०७ चौ.फूट सदर संपूर्ण जागा खुली आहे, यांसी चतु:सिमा:- पुर्वेस : ६ मीटर रस्ता, दक्षिणेस - प्लॉट नं. ४१, पश्चिमेस : प्लॉट नं. ४७, उत्तरेस : प्लॉट नं. ३९, येणेप्रमाणे चतु:सिमेतील खुली प्लॉट जागा त्यातील तदंगभूत वस्तुसह व जाणेयेण्याच्या वहिवाटीच्या व इजमेंटच्या सर्वहक्कासहची घरजागेची मिळकत. सदरची मिळकत किशोर जगन्नाथ चव्हाण यांना अथवा ते सांगतील त्यांच्या नावे विक्री करण्यास परवानगी मिळणेकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या लेखावरुन असे कळविण्यात येते की, अर्जदार यांचे मागणीवरुन अज्ञान अर्जदार नं. २ याचे नावे असलेली वर नमूद मिळकत विक्री करण्यास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत किंवा नेमलेली ता. २७/०२/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. स्वतः अगर वकीलामार्फत हजर होऊन लेखी म्हणणे मांडावे. सदर मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकाराने हरकत न आल्यास कोणाची हरकत नाही असे समजून अर्जदार यांचे मागणीप्रमाणे अज्ञानाच्या नावे असलेली मिळकत विक्री करणेस परवानगी देण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकाराने तक्रार चालणार नाही.

हा जाहीरनामा माझी सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिला ता. २०/०२/२०२६

सही /-
कनिष्ठ लिपीक

कोर्टाचा शिक्का

हुकूमावरुन,
सही /-
सहाय्यक अधिक्षक
जिल्हा न्यायाधिश, सोलापूर

---

### जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ११५/२०२५

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

१. **पिरखान बशीर पठाण - अर्जदार**
रा. पिंपरी (आर) ता. बार्शी, जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील विशाल डी. गोणेकर)
विरुध्द
२. **जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी - गैरअर्जदार तथा ग्रामसेवक ग्रा.प. पिंपरी (आर)**

सदर या जाहीर नोटीशीद्वारे सर्व लोकांरा कळविण्यात येते की, अर्जदाराचा भाऊ नुरखान बशीर पठाण, रा. पिंपरी (आर) ता. बार्शी जि. सोलापूर यांचा मौजे पिंपरी (आर) ता. बार्शी राहत्या घरी याठिकाणी दिनांक ०१ जानेवारी १९८१ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराचा भाऊ नुरखान बशीर पठाण यांचा दिनांक ०१ जानेवारी १९८१ रोजी मौजे पिंपरी (आर) ता. बार्शी राहत्या घरी याठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३० डिंसेबर २०२५ रोजी माझ्या राहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का
सही/-
(एफ.आर. शेख)
तहसिलदार, बार्शी

---

### जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. १४१/२०२५

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

१. **सुरवंता विक्रम कदम** - अर्जदार
रा. कदमवस्ती मांडेगाव, ता. बार्शी
(असल्यास, तर्फे वकील शिवाजी रा. जाधवर)
विरुध्द
२. **जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रा.प. मांडेगाव** - गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराची मुलगी चंद्रभागा विक्रम कदम, रा. कदमवस्ती मांडेगाव ता. बार्शी यांचा मौजे मांडेगाव, ता. बार्शी राहत्या घरी याठिकाणी दिनांक ०७ ऑगस्ट १९८९ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराची मुलगी चंद्रभागा विक्रम कदम यांचा दिनांक ०७ ऑगस्ट १९८९ रोजी मौजे मांडेगाव, ता. बार्शी राहत्या घरी याठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. २० फेब्रुवारी २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का
सही/-
(एफ.आर. शेख)
तहसिलदार, बार्शी

---

### जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. १५६/२०२५

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

१. **दैवशाला लक्ष्मण दराडे** - अर्जदार
रा. भालगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील राहूल अंकुश पाटील)
विरुध्द
२. **जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी न.प. बार्शी** - गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचा मुलगा प्रतिक लक्ष्मण दराडे, रा. भालगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील श्रध्दा हॉस्पिटल, बार्शी याठिकाणी दिनांक २३ सप्टेंबर २००६ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराचा मुलगा प्रतिक लक्ष्मण दराडे यांचा दिनांक २३ सप्टेंबर २००६ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील श्रध्दा हॉस्पिटल, बार्शी याठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. २० फेब्रुवारी २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का
सही/-
(एफ.आर. शेख)
तहसिलदार, बार्शी

---

### जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ९/२०२५

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

१. **पंडित रंगनाथ वायचळ** - अर्जदार
रा. घाणेगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील श्रीराम श्रीधर काशीद)
विरुध्द
२. **जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रा.प. घाणेगाव** - गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदार यांची आई शांताबाई रंगनाथ वायचळ, रा. घाणेगाव, ता. बार्शी जि. सोलापूर यांचा मौजे घाणेगाव, ता. बार्शी राहत्या घरी याठिकाणी दिनांक १६ ऑक्टोबर १९९४ रोजी मृत्यू झालेला असून त्यांची मृत्यू नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये मृत्यू नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांची आई शांताबाई रंगनाथ वायचळ यांचा दिनांक १६ ऑक्टोबर १९९४ रोजी मौजे घाणेगाव ता. बार्शी राहत्या घरी याठिकाणी मृत्यू झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. २० फेब्रुवारी २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का
सही/-
(एफ.आर. शेख)
तहसिलदार, बार्शी

---

### जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. १५४/२०२५

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

१. **राजेंद्र बब्रुवान सिरसट** - अर्जदार
रा. शेळगाव आर ता. बार्शी, जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील)
विरुध्द
२. **जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रा.प. शेळगाव आर** - गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराची मुलगी किरण राजेंद्र सिरसट, रा. शेळगाव आर ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे शेळगाव आर ता. बार्शी राहत्या घरी याठिकाणी दिनांक २४ मार्च २००६ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराची मुलगी किरण राजेंद्र सिरसट यांचा दिनांक २४ मार्च २००६ रोजी मौजे शेळगाव आर ता. बार्शी राहत्या घरी याठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. २० फेब्रुवारी २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का
सही/-
(एफ.आर. शेख)
तहसिलदार, बार्शी

---

महावितरण

**ई-निविदा सूचना**

सोलापूर शहर विभागांतर्गत **11 KV AB Switch** देखभाल व दुरूस्ती करणेच्या कामाकरिता अनुभवी ठेकेदारांकडून ई- निविदा **EE/SUR/U/T-02/2025-26 (किंमत- 10.00 लाख रुपये)** ई-निविदा ऑनलाईन मागविण्यात येत आहे. निविदा विक्री **दि. 20.02.2026 ते 24.02.2026** निविदा सादर करण्याची अंतिम **दि. 24.02.2026 23.55 वाजेपर्यंत** राहील. सदर तपशील महावितरण कंपनीच्या अधिकृत **http://works.mahadiscom.in/eTender/etender** संकेतस्थळावर उपलब्ध राहतील. सदरील निविदा स्वीकारणे/नाकारणे अथवा रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार निम्न स्वाक्षरीदाराकडे राहतील.

**पीआरओ BMTZ/217/2025-26** **कार्यकारी अभियंता, सोलापूर शहर**

# टी-२० विश्वचषकाचा थरार



## महत्त्वाचे

### क्रिकेटपटू चहरने केली घटस्फोटाची घोषणा

**नवी दिल्ली** : भारतीय क्रिकेटपटू राहुल चहरने पत्नी इशानी जोहरपासून वेगळे होण्याची घोषणा केली आहे. राहुल चहरने आपल्या समाज माध्यम हॅण्डलवर



ही घोषणा केली. मी आपल्या आयुष्यातील १५ महिने कोर्टरूममध्ये आपले सत्य सांगण्यासाठी भटकत होतो, असे त्याने स्पष्ट केले. राजस्थानकडून देशांतर्गत क्रिकेटमध्ये खेळणारा आणि इंडियन प्रीमियर लीगमध्ये तीन फ्रॅन्चायझी - पंजाब किंग्ज, मुंबई इंडियन्स, सनरायझर्स हैदराबाद आणि रायझिंग पुणे सुपरजायंट - यांचे प्रतिनिधित्व करणारा २६ वर्षीय लेग स्पिनर २०१९ मध्ये जयपूरमध्ये एका जिव्हाळ्याच्या समारंभात इशानीशी विवाहबद्ध झाला. तीन वर्षांनंतर या जोडप्याने ९ मार्च २०२२ रोजी गोव्यात डेस्टिनेशन वेडिंगमध्ये लग्न केले. एका लांबलचक पोस्टमध्ये, राहुल चहरने म्हटले की, मी स्वतःला पूर्णपणे समजून घेण्यापूर्वीच लहान वयात लग्न केले होते. त्यानंतर मला असे अनेक वर्षे धडे मिळाले ज्यांची मी कधीच अपेक्षा केली नव्हती, आणि गेल्या पंधरा महिन्यांत मी न्यायालयीन कोठडीत फिरत होतो, असे त्याने लिहिले.

### पाकिस्तान सरकारने हॉकी कर्णधार बटची बंदी उठविली

**लाहोर** : पाकिस्तान सरकारने शुक्रवारी राष्ट्रीय हॉकी संघाचा कर्णधार अम्मद शकील बटवर राष्ट्रीय महासंघाने (पीएचएफ) लादलेली दोन वर्षांची बंदी रद्द केली आणि हे पाऊल 'बेकायदेशीर आणि असंवैधानिक' असल्याचे म्हटले. गुरुवारी पाकिस्तान हॉकी महासंघाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देण्यापूर्वी, तारिक बुगटी यांनी अलिकडच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील गैरव्यवस्थापनाबद्दल कर्णधाराने केलेल्या नाराजीनंतर पीएचएफवर टीका केल्याबद्दल बटवर दोन वर्षांची बंदी घातली. पण पंतप्रधान शेहबाज शरीफ यांनी नियुक्त केलेले पीएचएफचे अंतरिम अध्यक्ष मुहुयदीन अहमद वाणी यांनी हा निर्णय मागे घेतला आणि बुगटी यांनी हे 'बेकायदेशीर आणि असंवैधानिक पाऊल' असल्याचे म्हटले.

### रविवारी ९ व १३ वर्षाखालील जिल्हा बुद्धिबळ स्पर्धा

**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी -**
सोलापुर चेस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सोलापुर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर पी. एम. उषा योजना अंतर्गत रविवार २२ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता माहेश्वरी विद्या प्रसारक मंडळ पुणे संचलित देशभक्त हरिनारायण बंकटलाल सोनी महाविद्यालयात १३ व ९ वर्षाखालील मुले व मुलींच्या जिल्हास्तरीय निवड बुद्धिबळ स्पर्धा होईल. यातून मुले व मुलींच्या गटातील प्रथम दोन खेळाडूंची निवड राज्य स्पर्धे साठी करण्यात येणार असून ७ व ११ वर्षाखालील मुले व मुलींसाठी उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात येतील. निवड झालेल्या खेळाडूंना प्रत्येकी रु. एक हजार राज्य स्पर्धा खेळून आल्यानंतर देण्यात येणार असून स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना एकूण ६० बक्षिसे, चषक व मेडल्स देऊन गौरविण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे चेअरमन मधुसूदन करवा व प्राचार्या डॉ. आशा रोकडे यांनी दिली. इच्छुक खेळाडूंनी अधिक माहितीसाठी उदय वगरे मो.क्र. ८८८८०४५३४४ अथवा प्रा. सुवर्णा कांबळे मो.क्र. ९८८१६९१७७९ यांच्याकडे संपर्क साधावा, असे सोलापुर चेस अकॅडेमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर व सचिव आंतरराष्ट्रीय पंच सुमुख गायकवाड यांनी कळविले आहे. या स्पर्धेत सहभाग नोंदविण्याचे आवाहन सोलापुर डीस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष धैर्यशील मोहिते पाटील यांनी केले आहे.

### दहावी, बारावी क्रीडा गुण सवलत प्रक्रिया लवकरच सुरू होईल

**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**
दहावी व बारावीच्या खेळाडू विद्यार्थ्यांना क्रीडा गुणाची सवलत मिळण्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया लवकरच सुरू होईल. या योजनेचे ऑनलाईन ॲप्लिकेशन महा आय.टी. यांच्यामार्फत लवकरच चालू होत आहे. वेळेत अर्ज सादर होण्यासाठी सर्व शाळा व कनिष्ट महाविद्यालयातील क्रीडा शिक्षक आणि पालकांनी खेळाडू विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र, प्रोफॉर्मा-१ व २ दहावी/बारावीचे हॉल तिकीट, गुणपत्रक या बाबींची तयारी व स्कॅन करुन ठेवाव्यात, असे आवाहन जिल्हा क्रीडाधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केले आहे.

# विश्वचषकाच्या सुपर एट फेरीत दिग्गज संघ झुंजणार

**♦ नवी दिल्ली, २० फेब्रुवारी**



आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषका क्रिकेट स्पर्धेच्या १० व्या आवृत्तीत आता सर्वात आकर्षक अध्याय- सुपर ८ मध्ये प्रवेश केला आहे. काही आठवड्यांच्या हाय व्होल्टेज स्पर्धा, निसटता पराभव आणि प्रमुख संघांना धक्का देणारे उलटफेर नंतर, २० संघांची ही लढाई आता अंतिम आठ दावेदारांमध्ये पोहोचली आहे.

२१ फेब्रुवारी ते १ मार्च दरम्यान, दोन तीव्र स्पर्धात्मक गटांमध्ये एकाच राऊंड-रॉबिन लढाईत उपांत्य फेरीत स्थान मिळविण्याची शर्यत तीव्र होईल.

कोलंबो येथे होणाऱ्या आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या सुपर एट फेरीच्या पहिल्या सामन्यात पाकिस्तानचा सामना न्यूझीलंडशी होईल, तर २०२४ च्या रोमांचक जेतेपद निर्णायक सामन्याच्य पुनरावृत्तीमध्ये गतविजेत्या भारताचा सामना दक्षिण आफ्रिकेशी होईल.

आठ पूर्व-मानांकित संघांपैकी सात संघांनी प्रगती करून आपल्या क्रमवारीला न्याय दिला आहे, परंतु या टप्प्यात एक धक्कादायक अंडरडॉग सुद्धा आहे. झिम्बाब्वेने निर्भय मोहिमेसह अव्वल संघांच्या गटात प्रवेश केला.

**गट १ : भारत, झिम्बाब्वे, वेस्ट इंडीज, दक्षिण आफ्रिका**

सह-यजमान भारत गट १ मध्ये आघाडीवर आहे व गटातील इतर दोन अव्वल संघांशी नेहमीच धोकादायक वेस्ट इंडीज क्रिकेट संघ व पुनरुज्जीवित दक्षिण आफ्रिका राष्ट्रीय क्रिकेट संघाशी सामना करेल.

स्पर्धेपूर्वीच्या पसंतीच्या ऑस्ट्रेलियाची जागा घेणाऱ्या झिम्बाब्वेने चौथ्या फेरीत स्थान मिळविले. सुपर एटमध्ये गती आणि विश्वासावर स्वार होऊन झिम्बाब्वे स्पर्धेचे आश्चर्यकारक पॅकेज म्हणून उदयास आले आहे. त्यांच्या निर्भय क्रिकेट ब्रॅण्डला आता सर्वात कठोर परीक्षेला सामोरे जावे लागत आहे.

२२ फेब्रुवारी रोजी अहमदाबादमध्ये होणारा भारताचा दक्षिण आफ्रिकेविरुद्धचा सामना चुरशीचा होण्याची शक्यता आहे, तर १ मार्च रोजी कोलकाता येथे होणाऱ्या वेस्ट इंडीजविरुद्धच्या सामन्यात उपांत्य फेरीचे भवितव्य निश्चित होऊ शकते.

**गट २ : जुने प्रतिस्पर्धी, नवीन दावे - पाकिस्तान, श्रीलंका, इंग्लंड, न्यूझीलंड.**

जर गट १ हा शक्ती आणि अनिश्चिततेचा असेल, तर गट २ स्पर्धा आणि वंशावळीने भरलेला आहे. पाकिस्तानचा राष्ट्रीय क्रिकेट संघ दोन वेळा विजेता (२०१० आणि २०२२) इंग्लंड, बारमाही डार्क हॉर्स न्यूझीलंड आणि नवोदित श्रीलंका यांच्यासोबत जागा सामायिक करतो.

२१ फेब्रुवारी रोजी सुपर ८ च्या सुरुवातीपासून, न्यूझीलंड आणि पाकिस्तान कोलंबोमध्ये रंगतदार सूर लावतील. इंग्लंड आणि श्रीलंका एक दिवसानंतर कॅण्डीमध्ये पुन्हा शत्रुत्वाची सुरुवात करतील, तर २४ फेब्रुवारी रोजी इंग्लंड आणि पाकिस्तानचा सामना गटाच्या निर्णायक सामन्यात ब्लॉकबस्टर म्हणून वाटेल.

**फॉरमॅट : दुसरी संधी नाही**

प्रत्येक गट एकाच राऊंड-रॉबिन स्वरूपात खेळेल, म्हणजे प्रत्येक संघाला तीन सामने मिळतील. प्रत्येक गटातील केवळ दोन अव्वल संघ उपांत्य फेरीत पोहोचतील.

गती, नेट रन रेट आणि दबावाखालील स्वभाव हे निर्णायक ठरतील. महत्त्वाकांक्षा आणि बाद फेरी यांच्यातील फरक केवळ एका आठवड्याच्या खेळामुळे, प्रत्येक षटक स्पर्धेचे चित्र बदलू शकते.

सुपर ८ फेरीचे सामने नरेंद्र मोदी स्टेडियम, आर. प्रेमदासा स्टेडियम, पल्लेकेले आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, ईडन गार्डन्स, वानखेडे स्टेडियम, एम. ए. चिदम्बरम स्टेडियम आणि अरुण जेटली स्टेडियम येथे खेळले जाणार आहे. (वृत्तसंस्था)

### सुपर एट फेरीचे वेळापत्रक

| |
|---|
| २१ फेब्रुवारी- सायं. ७.०० वा., कोलंबो - पाकिस्तान वि. न्यूझीलंड, |
| २२ फेब्रुवारी- दुपारी ३.०० वा., पल्लेकेले - श्रीलंका वि. इंग्लंड |
| २२ फेब्रुवारी, सायं. ७.०० वा., अहमदाबाद- भारत वि. दक्षिण आफ्रिका |
| २३ फेब्रुवारी, सायं. ७.०० वा., मुंबई- झिम्बाब्वे वि. वेस्ट इंडीज |
| २४ फेब्रुवारी, सायं. ७.०० वा., पल्लेकेले- इंग्लंड वि. पाकिस्तान |
| २५ फेब्रुवारी, सायं. ७.०० वा., कोलंबो- श्रीलंका वि. न्यूझीलंड |
| २६ फेब्रुवारी, दुपारी ३.०० वा., अहमदाबाद- वेस्ट इंडीज वि. द.आफ्रिका |
| २६ फेब्रुवारी, सायं. ७.०० वा., चेन्नई- भारत वि. झिम्बाब्वे |
| २७ फेब्रुवारी, सायं. ७.०० वा., कोलंबो- इंग्लंड वि. न्यूझीलंड |
| २८ फेब्रुवारी, सायं. ७.०० वा., पल्लेकेले- श्रीलंका वि. पाकिस्तान |
| १ मार्च, दुपारी ३.०० वा., दिल्ली - झिम्बाब्वे वि. दक्षिण आफ्रिका |
| १ मार्च, सायं. ७.०० वा., कोलकाता- भारत वि. वेस्ट इंडीज |

# न्यूझीलंडचे पाकिस्तानला रोखण्याचे लक्ष्य


**♦ कोलंबो, २० फेब्रुवारी**

आयसीसी टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत शनिवारी येथे सुपर एट फेरीत गट २ मधील पहिला सामना पाकिस्तान आणि न्यूझीलंड यांच्यादरम्यान खेळला जाणार आहे. न्यूझीलंडने पाकिस्तानच्या फिरकी गोलंदाजांना रोखण्याचे लक्ष्य ठेवले आहे. पाकिस्तानच्या चातुर्य व विविधतेचा सामना करताना न्यूझीलंडच्या मधल्या फळीची मजबूत प्रत्युत्तर देण्याची क्षमता महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

आयसीसीच्या टी-२० विश्वचषकात सलामीवीर टिम सेफर्ट व फिन ॲलन वगळता न्यूझीलंडच्या फलंदाजांनी अद्याप तडाखेबंद फलंदाजी केलेली नाही. सेफर्ट व ॲलनने तीन अर्धशतके झळकावली आहेत, परंतु त्यांचे मधल्या फळीतील सहकारी त्यांना पुरेसे सहकार्य करू शकले नाहीत. ग्लेन फिलिप्स, रचिन रवींद्र, मार्क चॅपमन व डॅरिल मिशेल सारखे खेळाडू सातत्य राखण्यासाठी संघर्ष करत आहेत. फिलिप्स व रवींद्रने प्रत्येकी अर्धशतक ठोकले आहेत. त्यांच्याकडूनही खूप आशा आहे. चार सामन्यांमधून रवींद्रने ७२ धावा केल्या आहेत व यात ५९ धावा कॅनडाविरुद्धच्या एकाच सामन्यात झाल्या आहेत. या स्पर्धेत न्यूझीलंड



सलमान आगा



मिचेल सॅण्टनर

पहिल्यांदाच कोलंबोमध्ये खेळणार असल्याने परिस्थिती आणखी गुंतागुंतीची होते.

याउलट, पाकिस्तान विश्वचषकाच्या सुरुवातीपासूनच कोलंबो शहरात दाखल झालेले आहे व त्यांनी प्रेमादासा येथे आधीच दोन सामने खेळले आहेत.

पाकिस्तानचे गोलंदाज, विशेषतः फिरकीपटू, या संथ खेळपट्टीवर प्रभावी होण्यासाठी आवश्यक असलेला वेग व लांबी जाणतात. या खेळपट्टीवर फटकेबाजी करण्यापेक्षा सावधगिरीची आवश्यकता असते.

म्हणून, न्यूझीलंडच्या मधल्या फळीने ॲलन व सेफर्टच्या पॉवरप्ले स्फोटकतेला पाठिंबा दिला पाहिजे. त्यामुळे त्यांचा संघ सुमारे १८० धावांपर्यंत पोहोचू शकेल किंवा त्या परिसरात लक्ष्याचा पाठलाग करताना दिसेल.

उस्मान तारिक, अबरार अहमद, सैम अयुब, मोहम्मद नवाज व शादाब खान सारखे फिरकी गोलंदाज पाकिस्तानला एक वेगळी धार देतात, परंतु फलंदाजीत त्यांच्याही स्वतःच्या चिंता आहेत.

स्पर्धेतील सध्याचा अव्वल धावपटू साहिबजादा फरहान (२२०) नंतर शादाब खान (८८) हा त्यांचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज आहे.

पाकिस्तानच्या फलंदाजांना न्यूझीलंडसारख्या अनुभवी संघाविरुद्ध मोठे सामूहिक योगदान द्यावे लागेल.

माजी कर्णधार बाबर आझम आधुनिक टी-२० फलंदाजीच्या गरजा पूर्ण करण्यास संघर्ष करत आहे. जर बाबर पुन्हा एकदा अडखळला तर संघ व्यवस्थापन फखर झमान सारख्या खेळाडूला संघात आणू शकते. ते डावखुरा वेगवान गोलंदाज शाहीन शाह आफ्रिदीचा समावेश करण्यावरही विचार करतील. (वृत्तसंस्था)

### आजचा सुपर-८ सामना

**पाकिस्तान वि. न्यूझीलंड**
**स्थळ** : आर. प्रेमदासा स्टेडियम, कोलंबो
**वेळ** : सायंकाळी ७.०० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# माजी भारतीय क्रिकेटपटूंनी केली भविष्यवाणी

**नवी दिल्ली** - शनिवारी कोलंबोतील आर. प्रेदासा स्टेडियमवर पाकिस्तान आणि न्यूझीलंड यांच्यात होणाऱ्या सुपर ८ फेऱ्यांपूर्वी माजी भारतीय क्रिकेटपटूंनी चालू टी-२० विश्वचषक २०२६ स्पर्धेच्या उपांत्य फेरी पोहोचणाऱ्या संघांची भविष्यवाणी केली आहे. आठ संघांना चार संघांच्या दोन गटात स्थान देण्यात आले आहे. सर्व संघ त्यांच्या गटातील इतर संघांविरुद्ध तीन सामने खेळतील, प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ उपांत्य फेरीत पोहोचतील. भारताचा महान कसोटीपटू चेतेश्वर पुजाराने अव्वल चार संघासाठी भारत, दक्षिण आफ्रिका, श्रीलंका आणि न्यूझीलंडची निवड केली आहे. मोहम्मद कैफने पुढील टप्प्यासाठी भारत, दक्षिण आफ्रिका, इंग्लंड आणि न्यूझीलंडची निवड केली. भारताचा टी-२० मध्ये सर्वाधिक बळी घेणारा फिरकी गोलंदाज युजवेंद्र चहलने अव्वल चारमध्ये पोहोचण्यासाठी भारत, दक्षिण आफ्रिका, इंग्लंड आणि न्यूझीलंडची निवड केली, तर माजी वेगवान गोलंदाज वरुण आरोनने सर्वात धाडसी निर्णय घेतला, भारत, वेस्ट इंडीज, इंग्लंड आणि पाकिस्तानची निवड केली.

### दृष्टिहिनांच्या क्रिकेटसाठी बीसीसीआयचा पाठिंबा

**बंगळुरू** : जागतिक स्तरावर दृष्टिहिन क्रिकेटपटूंच्या विकासासाठी ऐतिहासिक वचनबद्धतेबद्दल क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाइंड इन इंडियाने भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे मनापासून कौतुक केले आहे. गत दशकात, भारताच्या दृष्टिहिन क्रिकेटपटूंनी जागतिक स्तरावर एक असाधारण वारसा स्थापित केला आहे. २०१२ पासून अनेक पुरुष विश्वचषक विजेतेपद जिंकले आहेत आणि ऐतिहासिक पहिला महिला विश्वचषक विजय मिळवला आहे. बीसीसीआयच्या औपचारिक पाठिंब्यामुळे आता हे यश केवळ साजरे केले जात नाही तर सर्वोच्च स्तरावर संरचित पाठिंब्याद्वारे टिकवून ठेवले जाते आणि उंचावले जाते. (आयसीसी) अध्यक्ष जय शाह यांच्या नेतृत्वाखालील महत्त्वाचा टप्पा गाठला आहे.

# व्हॅलेंटाईन स्कूलच्या लास्या शेरलाची आंतरराष्ट्रीय स्केटिंग स्पर्धेसाठी निवड




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**
व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मिडीयम स्कूलच्या लास्या नरेंद्र शेरलाची पार्किंग लॉट स्केटिंग रिंक मडगाव दक्षिण गोवा येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय ओपन रोलर स्केटिंक स्पोर्ट्स प्रमोशन टूर्नामेंट चाचणीमध्ये निवड झाली. गोवा स्केटिंग फ ेस्टिव्हलमध्ये सहभागी झाल्याबद्दल तिला प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. तिला क्रीडा विभाग प्रमुख संतोष पाटील व मोनिका जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. तिला संस्थेचे अध्यक्ष उमाकांत मेंढापूरे, उपाध्यक्ष यमुना दिड्डी, सचिव संतोष गड्डम, सहसचिव नागेश शेंडगे, मुख्याध्यापिका जी. एच. कल्याणी उपमुख्याध्यापिका मिना दुधनीकर, पर्यवेक्षिका सुनिता मंद्रुपकर व नागमणी पेगडा व सुप्रिया बोम्मा आदींनी कौतुक केले.

# 'मिशन लक्ष्यवेध' प्रवेशाची प्रक्रिया सुरू

## आठ खेळांचा समावेश, २५ फेब्रुवारीपर्यंत नोंदणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**
राज्यातील क्रीडा विकासाकरिता 'मिशन लक्ष्यवेध' या महत्त्वाकांक्षी उपक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. याअंतर्गत पुणे विभागीय स्तरावर ॲथलेटिक्स, वेटलिफ्टींग, शुटींग, रोईंग, लॉन टेनिस, कुस्ती, टेबल टेनिस व हॉकी या आठ खेळांचा समावेश आहे. यासाठी नऊ क्रीडा निपुणता केंद्र कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात आली असून प्रवेशासाठी प्राविण्य प्राप्त खेळाडूंनी २५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन पुणे विभागीय क्रीडा उपसंचालक युवराज नाईक यांनी केले आहे.

ॲथलेटिक्स, शुटींग, रोईंग, कुस्ती, टेबल टेनिस या पाच खेळांसाठी प्रत्येकी २० खेळाडूंची व हॉकीसाठी ४० खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे. यासाठी २५ वर्षाआतील मुले, मुली पात्र असतील. प्रवेशासाठी जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड, गेल्या २ वर्षातील क्रीडा विषयक कामगिरीचे प्रमाणपत्र, पासपोर्ट साईज ३ छायाचित्र, शाळा- महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र, पालकांचे संमतीपत्र इत्यादी कागदपत्रे आवश्यक राहतील. खेळाडू क्रीडा कौशल्य व तंदुरुस्ती चाचण्यांमध्ये पात्र होणे आवश्यक आहे. शासन मान्यताप्राप्त डॉक्टरांचे वैध वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र अनिवार्य राहील.

निवड झालेल्या खेळाडूंना निवास, भोजन, पूरक आहार खर्च, क्रीडा साहित्य, प्रशिक्षण साहित्य, खेळाडूंचे किट, निवडलेल्या खेळाडूंचे देशांतर्गत, परदेशी प्रशिक्षणासाठी होणारा खर्च, स्पर्धा सहभाग खर्च, खेळाडूंच्या वैद्यकीय चाचण्या, किरकोळ वैद्यकीय उपचाराचा खर्च क्रीडा व युवक सेवा विभागामार्फत करण्यात येईल. इच्छुक राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंनी उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, विभागीय क्रीडा संकुल, सर्व्हे नं. १९१, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, मोझे विद्यालयासमोर, येरवडा, पुणे- ४११००६ येथे प्रत्यक्ष अथवा deputypune@gmail.com या ईमेलवर विहित मुदतीत अर्ज करावेत, असे आवाहनही श्री. नाईक यांनी केले आहे.

# लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महाविद्यालय योगासन स्पर्धेत उपविजेते

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**
सात रस्ता मोदीखाना येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयातील खेळाडूंनी महाविद्यालयीन सांघिक सूर्यनमस्कार व योगासन क्रीडा स्पर्धेत उपविजेतेपद संपादिले.

नू.म.वि. प्रशालेत सोलापूर जिल्हा योग परिषद व योगसाधना मंडळ यांच्यामार्फत ही स्पर्धा पार पडली. या खेळाडूंना क्रीडा संचालक प्रा. भक्तराज जाधव, अशोक विंचूरकर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे रयत शिक्षण संस्थेच्या मध्य विभागाचे चेअरमन संजीव पाटील, प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे यांनी अभिनंदन केले.

**कामगिरी केलेले खेळाडू :** राजेश्वरी नूला, कोमल म्हात्रे, श्राविका म्हैसकर, सलोनी उबाळे, श्रुती वाघमारे, प्रज्ञा दिवेकर, प्रतिमा साखरे, प्रेरणा सुरवसे, सलोनी कुरापटी, गायत्री टिकुटे, प्रतीक्षा नागटिळक.





# दांडपट्टा फिरविण्यात सोनाक्षी माडे हिचा विक्रम

## सलग १२ तास १२ मिनिटे व १२ सेकंद फिरविला

## ऑरेंज व ग्रीन बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**
श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६व्या जयंतीचे औचित्य साधून विडी घरकुल येथील संभाजीराव शिंदे प्रशालेच्या नववीत शिकणाऱ्या सोनाक्षी मोहन माडे हिने सुशिल रसिक सभागृहात सलग १२ तास १२ मिनिटे व १२ सेकंद दांडपट्टा फिरवून विश्वविक्रम नोंद केला.

हा विक्रम सकाळी ६ वाजता चालू होऊन सायंकाळी ६ वाजून १५ मिनिटांनी समारोप झाला. पारंपारीक खेळ प्रकाराचे प्रशिक्षण देणाऱ्या रूद्रशक्ती गुरूकुल या प्रशिक्षण केंद्रात १५ वर्षीय सोनाक्षी गेली ५ वर्षापासून विविध पारंपारिक खेळांचे प्रशिक्षण घेत आहे. तिला विवेक मिस्किन यांचे मार्गदर्शन लाभले. याप्रसंगी ऑरेंज बुक व ग्रीन बुक ऑफ रेकॉर्डचे अधिकृत पदाधिकारी उपस्थित राहुन दोन्हीही वर्ल्ड कपचे प्रमाणपत्र जाहीर करून त्यांच्या हस्ते बहाल करण्यात आले.

समारोप प्रसंगी संभाजीराव शिंदे विद्यामंदिरच्या संचालिका डॉ. राधिकाताई चिलका, जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रदिपसिंह रजपूत, नगरसेवक भारत बडूरवाले, मुख्याध्यापक सतीश मल्लाव, मुख्याध्यापक सचिन ढोपरे, रूद्रशक्ती गुरूकुलचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. या विक्रमास संस्था अध्यक्ष डॉ. सुर्यप्रकाश कोठे, आमदार देवेंद्र कोठे, नगरसेवक प्रथमेश कोठे, मार्गदर्शिका तनुजा मारपल्ली आदींनी कौतुक करून अभिनंदन केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



बार्शी : पत्रकारांच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करतानाचे छायाचित्र.



### विद्यार्थी व शिक्षकांच्या एकोप्याने कै.कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतनमध्ये शिवजयंती उत्साहात

**अक्कलकोट दि. २० फेबुवारी -**
श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान संचलीत कै.कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतनमध्ये संस्थेचे चेअरमन महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यार्थी व शिक्षकांच्या एकोप्याने कै.कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतनमध्ये शिवजयंती निमीत्त आज छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचे प्रा.नागनाथ जेऊरे यांच्या हस्ते पुजन करण्यात आले. यावेळी प्रा.नागनाथ जेऊरे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना शिवरायांचे जीवन कार्य सांगीतले. छत्रपती शिवरायांचे आदर्श बाळगून विद्यार्थ्यांनी जोमाने अभ्यास करून यश प्राप्त करावे असे आवाहन ही प्राचार्य नागनाथ जीवरे यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना केले. यावेळी विजयकुमार पवार सर, उमेश सोनवणे, रवींद्र नष्टे, चित्तरंजन अगरथडे, सचिन घाटगे, बंटी नारायणकर आदींसह अन्य ज्ञात अज्ञात शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### तुर्कपिंपरी येथील स्मशानभूमी बंद करण्याच्या सूचना

**बार्शी दि. २० फेब्रुवारी -**
तालुक्यातील तुर्कपिंपरी येथे दलित वस्तीशेजारी पन्नास फुटांच्या अंतरावर ग्रामपंचायतीने बेकायदेशीर स्मशान भूमी बांधल्यामुळे तेथील दलित बांधवाना मोठ्या प्रमाणात श्वसनाचे त्रास उद्भवत आहेत. त्यामुळे तेथील बांधव उपोषणाला बसले असता त्यांना नॅशनल दलित मुव्हमेंट फॉर जस्टीस संघटनेच्यावतीने जाहीर पाठिंबा देऊन तसेच तहसीलदार यांना भेटून स्मशानभूमी कायमची बंद करण्याच्या सूचना दिल्या व विषय मार्गी लावला. सर्व दलित बांधवांच्या व संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या एकजुटीमुळे हा निर्णय मार्गी लागला.



### 'सिंहगड'मध्ये नूतनीकरणीय ऊर्जा या विषयावर मार्गदर्शन

**पंढरपूर, दि. २० फेब्रुवारी -**
कोर्टी-पंढरपूर येथील सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाच्या एस.के.एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या यांत्रिकी अभियांत्रिकी विभागाने द्वितीय वर्ष यांत्रिकी अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी नूतनीकरणीय ऊर्जा विषयावर स्पार्टन सोलार टेक्नॉलॉजीचे संस्थापक सुरज डोके यांचे मार्गदर्शन झाले. डोके यांनी नूतनीकरणीय ऊर्जा, विशेषतः सौरऊर्जा, पवनऊर्जा, जलऊर्जा आणि बायोमास ऊर्जा यांचे तांत्रिक, आर्थिक आणि सामाजिक महत्त्व विद्यार्थ्यांसमोर मांडले. त्यांनी सांगितले की सौर, पवन, जल, बायोमास आणि भू-ऊष्मा यांचा वापर पारंपरिक जीवाश्म इंधनावर अवलंबित्व कमी करण्यासाठी, प्रदूषण कमी करण्यासाठी आणि शाश्वत विकास साधण्यासाठी होतो. सौर पॅनेल्स, इन्व्हर्टर, बॅटरी स्टोरेज, सौरऊर्जा प्रणालींचे डिझाइन आणि कार्यप्रणाली यांचा समावेश कसा होतो, हे समजावून सांगितले. समन्वयक प्रा. धनंजय गिराम यांनी अतिथींचे स्वागत केले. विभागप्रमुख डॉ. एस. एस. कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. स्वानंद कुलकर्णी आणि प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम झाला.

### नाल्यात आढळून आलेल्या व्यक्तीचा मृत्यू

**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी -**
शहरातील नामांकित शाळेसमोरील पाण्याच्या नाल्यामध्ये आढळून आलेल्या अनोळखी इसमाचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या हकीकत अशी की अनोळखी पुरुष वय ३५ ते ४० वर्षे हा वसंतराव नाईक शाळे समोरील पाण्याच्या नाल्यामध्ये निश्चित जखमी हालचाल न करण्याच्या स्थितीत मिळून आल्याने त्यांना उपचारासाठी सदर बाझार पोलीस ठाण्याचे राठोड यांनी दिनांक १९ फेब्रुवारी रोजी शासकीय रुग्णालय येथे दाखल केले असता उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले अशी नोंद सिविल पोलीस चौकीत झाली आहे.

## निधन वृत्त...

### इंदुबाई कोंडा



**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**
अक्कलकोट रोड, मनिंधारी येथील रहिवासी बाळकृष्ण कोंडा यांचे काकू इंदुबाई कोंडा यांच्या अल्पशा आजारीने वयाचा ८९ वर्षी राहत्याघरी निधन झाले. त्यांच्या पश्चात चुलते मुले लक्ष्मीकांत कोंडा,अविनाश कोंडा, जयंत कोंडा,देवीदास कोंडा, बाळकृष्ण कोंडा, नातू, नाती व नातवंडे आहे.

# पांढऱ्या रेशमी वस्त्रात खुलले विठ्ठल-रुक्मीणीचे रुप

## वसंतपंचमी ते रंगपंचमी विशेष पोशाख; रंगीबेरंगी किंवा महावस्त्राऐवजी या पोशाखाचे महत्व

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.२० फेब्रुवारी -**
एरव्ही वेगवेगळ्या रंगीबेरंगातील सुंदर रेशमी,भरजरी पोशाखात दिसणारे विठ्ठल आणि रुखुमाई वसंतपंचमी पासून केवळ पांढऱ्या रंगाच्या पोशाखातच दृष्टीस पडतात. त्याचे कारण देखील अनोखे आणि वेगळे असे आहे. कारण वसंतपंचमीच्या मुहुर्तावर विठ्ठल रखुमाईचा शाहीविवाह सोहळा संपन्न होतो आणि त्या दिवसापासून खऱ्या अर्थाने विठुरायाच्या रंगपंचमीला सुरुवात होत असते. त्यामुळेच साधारण एक महिना म्हणजेच वसंतपंचमी ते रंगपंचमी या काळात विठ्ठल आणि रखुमाईमाता आपणाला केवळ पांढऱ्या शुभ्र रंगाच्या भरजरी वस्त्रातच दिसुन येतात.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या विठुरायाच्या रुपाचे वर्णन वेगवेगळ्या संतमहात्म्यांनी आपआपल्या पध्दतीने आपआपल्या अभंगातून केलेले आहे. मुळातच राजस सुकुमार मदनाचा पुतळा असलेल्या विठुरायाच्या रुपाची मोहिनी सातासमुद्रापार वर्णिली जात आहे. अगदी ज्ञानोबा,तुकाबोराया सारख्यां संतमहात्म्या पासून ते जगतगुरु शंकराचार्यापर्यंत आणि तेथून अगदी सर्वसामान्य वारकरी भक्तांपर्यंत विठुरायाच्या रुपाचे गारुड सर्वांच्या म नावरच बिंबलेले आहे. येथील मंदिरात अगदी पहाटे पासून ते सायंकाळ पर्यंत विठ्ठल आणि माता रुक्मिणीचे विधीवत उपचार सुरु असतात. त्यामध्ये दररोज दुपारी विठ्ठल आणि रखुमाईला वेगवेगळ्या रंगाचे रेशमी वस्त्रे परिधान केली जात असतात. ऋतुमाना नुसार विठ्ठल,रखुम ाईचे खान,पान तसेच महावस्त्रां मध्ये देखील बदल केले जात असतात. मात्र ऐरव्ही मंदिरात वेगवेगळ्या रंगाच्या रेशमी महावस्त्रे परिधान केलेले विठ्ठल आणि रखुमाई वसंतपंचमी पासून केवळ पांढऱ्या रंगाच्या भरजरी महावस्त्रांमध्येच दिसुन येतात. कारण वसंतपंचमी या विठ्ठल रखुमाईच्या विवाह सोहळ्या दिवसा पासून विठ्ठलाच्या रंगपंचमीला खऱ्या अर्थाने सुरुवात होत असते.

वसंत पंचमी ते रंगपंचमी अशी महिनाभर विठ्ठलाची रंगपंचमी सुरु असते. या काळात दररोज मंदिरात विठ्ठल आणि रखुमाईला पांढऱ्या रंगाचा पोशाख परिधान करुन त्यावर गुलाल,केशराची ऊधळण केली जाते. त्यामुळे मंदिरातील प्रथा,परंपरेनुसार विठुरायाला संपुर्ण म हिनाभर केवळ पांढऱ्या रंगाचा पोशाखच परिधान केला जातो. या पांढऱ्याशुभ्र म हावस्त्रा मध्ये किंवा पोशाखा मध्ये सुध्दा मुळातच विठ्ठलाचे लोभस असलेले रुप अधिकच मोहक आणि आकर्षक दिसते.



### गुलाबदाणीतून शिंपडले जाते गुलाबपाणी

वसंतपंचमीपासून ते रंगपंचमीपर्यंत विठुरायाला पांढरा शुभ्र वेष परिधान करण्यात येत असतो. या काळात दररोज गुलालांची उधळण भगवंताच्या अंगावर केली जाते. यावेळी गुलाबदाणीतून विठ्ठल आणि रुक्मिणीच्या मुर्तींवर गुलाबपाणी देखील शिंपडले जाते. वसंतपंचमी पासून ते रंगपंचमी पर्यंत म्हणजे जवळपास एक महिना विठ्ठलाची रंगपंचमी सुरु राहणार. या रंगपंचमी उत्सवाचा शुभारंभ काही दिवसापूर्वी संपन्न झालेल्या वसंतपचंमीच्या निमित्ताने झाला. त्यामुळे वसंतपंचमी पासून सावळा विठूराया आणि रुक्मिणीमाता पांढ-या शुभ्र वेषात दिसता आहेत.

# कासेगावच्या उपसरपंचपदी शहाजहान शेख बिनविरोध

## राजीनाम्यामुळे रिक्त पदासाठी आज झाली निवडणूक



**तभा वृत्तसेवा,**
**कासेगाव, दि.२० फेब्रुवारी-**
कासेगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथील उपसरपंचपदी माजी सैनिक शहाजहान शेख यांची आज दि.२० फेब्रुवारी रोजी झालेल्या ग्रामपंचायतच्या विशेष मासिक सभेत बिनविरोध एकमताने निवड झाली.

गेल्या दोन महिन्यापूर्वी येथील उपसरपंच ज्ञानेश्वर रोकडे यांच्यावरील अविश्वास ठराव सर्वानुमते संमत झाल्याने उपसरपंच पद रिक्त होते. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीची आचारसंहिता सपंल्याने आज या निवडीसाठी सरपंच यशपाल वाडकर यांच्या अध्यक्षतेखाली विशेष मासिक सभेचे आयोजन केले होते. या सभेस श्री.शेख, ज्ञानेश्वर रोकडे, भरत जाधव, नारायण जाधव, संभाजी चौगुले, सोनाली वाडकर, अनिता हेडे, संगिता गायकवाड, सोनाली पाटोळे, कल्पना राऊत, सुरेखा चौगुले हे ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. बैठकीत उपसरपंच पदासाठी श्री. शेख यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची उपसरपंचपदी एकमताने बिनविरोध निवड झाली. ग्रामसेवक रतन कलाल यांनी उपसरपंचपदी शहाजान शेख यांची निवड झाल्याचे जाहीर केले.

त्यानंतर गुलालाची उधळण करीत जल्लोष करण्यात आला. माजी सरपंच नेताजी पाटील यांच्या हस्ते श्री. शेख यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर श्री. शेख व सर्व समर्थकांनी दिवंगत सरपंच श्रीकांत बप्पा वाडकर यांच्या प्रतिमेस, छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीस तसेच ग्रामदैवत महादेवास पुष्पहार अर्पण करत पूजन केले. यावेळी सरपंच वाडकर यांनी श्री.शेख हे माजी सैनिक असल्याने गावासाठी काम करण्याची त्यांची प्रामाणिक तळमळ आहे. त्यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानात चांगले काम केले असल्याचे सांगितले. उपसरपंच शेख यांनी देशाच्या सीमांसह गावासाठी काम करण्याची चांगली संधी मिळाल्याने त्या संधीचे समाजातील सर्व जाती धर्माला सोबत घेत काम करणार असल्याचे सांगितले. यावेळी युवा उद्योजक बालाजी चौगुले, माजी तंटामुक्त अध्यक्ष निशिकांत पाटील, तंटामुक्त अध्यक्ष संजय पवार, माजी चेअरमन विलास वाडकर, मल्लिनाथ येणगुरे, माजी उपसरपंच ज्ञानेश्वर रोकडे, रामहरी चौगुले, लक्ष्मण वाडकर, ताजोद्दीन शेख, नाना खारे यांच्यासह ग्राम पंचायत सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.




# ग्रंथभेटीतून शिवजयंतीचा संदेश

## हालहळ्ळीतील स्वा. सावरकर सार्वजनिक वाचनालयाचा प्रेरणादायी उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२० फेब्रुवारी-**
तालुक्यातील हालहळ्ळी (अ.) येथील स्वातंत्र्यवीर सावरकर सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने संस्थापक अध्यक्ष गुरुनाथ गोविंदे यांच्या कल्पकतेतून छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती विद्यार्थ्यांना ग्रंथभेट देत साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी ग्रामसेविका सरवळे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अध्यक्षस्थानी सरपंच प्रकाश बिराजदार होते. यावेळी पोलीस पाटील मल्लिकार्जुन बिराजदार यांनी विनायक दामोदर सावरकर यांच्या प्रतिमेस हार अर्पण करून अभिवादन केले.

'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत निरंतर वाचन केंद्रातील शालेय विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते ग्रंथभेट देण्यात आली. विद्यार्थ्यांनी वाचलेल्या पुस्तकावर आपल्या बोलीभाषेत अभिप्राय लिहून तो मराठी भाषा गौरव दिनी २७ फेब्रुवारीपर्यंत शाळेच्या मुख्याध्यापकांकडे सादर करावा, असे आवाहन करण्यात आले. यावेळी नदाफ, शेख उपस्थित होते. शेख यांनी शिवरायांच्या पराक्रमाची व स्वराज्य स्थापनेची माहिती देत विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाविषयी अभिमान जागवला.



# माढ्यात जि.प. शाळा समिती अध्यक्षपदी गणेश मोरे

## उपाध्यक्षपदी वर्षा गायकवाड; शिक्षणप्रेमी सदस्यपदी शेखर म्हेत्रे

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि.२० फेब्रुवारी-**
माढा जिल्हा परिषद मुलींच्या शाळेत कार्यकाल संपल्याने नव्याने गठीत समितीच्या अध्यक्षपदी गणेश मोरे व उपाध्यक्षपदी वर्षा गायकवाड यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

यासंदर्भात शाळेत नुकतीच पालकांची बैठक झाली. त्यावेळी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व सदस्य पदांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या समितीमध्ये शिक्षणप्रेमी सदस्य म्हणून माढा तरूण भारत प्रतिनिधी शेखर म्हेत्रे यांची निवड करण्यात आली. या समितीमध्ये ७५ टक्के पालकांमधून व २५ टक्के सदस्य हे स्थानिक स्वराज्य संस्था शिक्षक प्रतिनिधी शिक्षणप्रेमी व विद्यार्थी प्रतिनिधी यातून नियुक्त करण्यात आले. पहिली ते सातवीच्या पालकांमधून ११ सदस्यांची नेमणूक करण्यात आली. यावेळी समितीचे तत्कालीन अध्यक्ष नितीन (नाना) साठे, उपाध्यक्ष देवीदास खरात, नगरसेवक नाना साठे, मुख्याध्यापक सुरेश माळी, सहशिक्षक विनोद परिचारक, चारुदत्त अष्टेकर, सोमनाथ शिंदे, प्रवीण भांगे तसेच सर्व शिक्षक उपस्थित होते. समितीचे नूतन अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्यांचे अभिनंदन करून सत्कार करण्यात आला.

# अकलूजमध्ये उत्सव विचारांचा, वारसा स्वराज्याचा

## खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या संकल्पनेतून व्याख्यानमाला

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२० फेब्रुवारी-**
छत्रपती शिवाजी महाराजांनी केवळ युद्धे जिंकली नाहीत, तर शेती, व्यापार आणि पायाभूत सुविधांवर भर देत स्वराज्य आर्थिक व सांस्कृतिकदृष्ट्या बळकट केले. किल्ले, रस्ते व सिंचन व्यवस्थेवर त्यांनी दिलेला भर हा आधुनिक विकासाचा पाया ठरला, असे प्रतिपादन इतिहास विश्लेषक डॉ. दत्तात्रय मगर यांनी केले. .

खासदार धैर्यशील व शितलदेवी मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिवजयंतीनिमित्त वैचारिक परिसंवाद व व्याख्यानमालेत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. शिवरत्न नॉलेज सिटी, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा अकलूज, सिंहगर्जना ग्रुप व जाणीव मैत्री ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. व्यासपीठावर इशिता मोहिते-पाटील, प्रा. सुहास उरवणे, डॉ. पांडुरंग नलवडे, प्रा. अनिल लोंढे, विक्रम वैद्य, डॉ. अमोल माने शेंडगे, अनिल जाधव, डॉ. विश्वनाथ आवड आदी उपस्थित होते.



प्रा. लोंढे यांनी महात्मा जोतिराव फुले यांनी १८७० साली शिवजयंतीची सुरुवात करून समाजजागृतीचा पाया रचल्याचा उल्लेख केला. प्रा. उरवणे यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या 'अनुभव मंटप' या लोकशाही संकल्पनेवर प्रकाश टाकत समता, न्याय व सुशासनाच्या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. डॉ. आवड यांनी डॉ. आंबेडकर यांच्या सामाजिक संघर्षाचा आढावा घेत समान हक्कांच्या लढ्याची आठवण करून दिली. वैद्य यांनी गड-किल्ले संवर्धनाची गरज व्यक्त केली, तर अनिल जाधव यांनी तरुणाईला इतिहासाशी जोडण्यासाठी अशा वैचारिक उपक्रमांची आवश्यकता अधोरेखित केली. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन नागनाथ साळवे यांनी केले.

# घरकुलसाठी मोफत वाळू योजनेचा उडाला बोजवारा

▶▶ 'दक्षिण'च्या ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचा हलगर्जीपणा

▶▶ बीडीओंनी ठोस भूमिका घेण्याची गरज

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि.२० फेब्रुवारी -**
शासनाने घरकुल बांधकामासाठी पाच ब्रास मोफत वाळू योजना सुरु केली आहे. मात्र दक्षिण सोलापूरमध्ये ग्रामपंचायत प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू योजनेचा लाभ मिळताना दिसून येत नाही. ग्राम पंचायत अधिकाऱ्यांकडे वारंवार पाठपुरावा करूनही ग्रामपंचायत अधिकारी वाळू मागणी प्रस्ताव देत नसल्यामुळे अनेक लाभार्थ्यांचे घरकुल बांधकाम प्रलंबित आहेत. दक्षिणचे गटविकास अधिकारी यांनी मनमानी कारभार करणाऱ्या ग्राम पंचायत अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

घरकुलसाठी शासनाकडून पाच ब्रास मोफत वाळू मिळणार असल्याचे सांगितल्यावर ग्रामपंचायत अधिकार्यांकडे लाभार्थी तीन महिन्यांपासून चकरा मारत आहेत. शिवाय मंद्रूप अप्पर तहसील कार्यालयाकडेही विचारणा केली आहे . मात्र ग्रामपंचायत अधिकार्यांच्या हलगर्जीपणामुळे मोफत वाळू मिळत नाही. त्यामुळे वीस हजार रूपये जादा रक्कम देऊन लाभार्थ्यांना वाळू विकत घ्यावे लागत आहे.
**- सचिन व्हनमाने, माजी तालुका कार्याध्यक्ष, युवक काँग्रेस दक्षिण सोलापूर**

शासनाकडून गेल्या वर्षी मोठ्या प्रमाणात घरकुल मंजूर करण्यात आले. मात्र घरकुल बांधकामासाठी वाळू मिळत नसल्यामुळे अनेक ठिकाणी वाळू लिलाव करून वाळू उपलब्ध करण्यात आला आहे. वाळू लिलाव करताना घरकुल साठी वाळू मोफत देण्याचा नियम करण्यात आल्याम ुळे घरकुल लाभार्थ्यांना वाळू मिळण्याची अपेक्षा होती. मात्र दक्षिण सोलापूर मध्ये अनेक घरकुल बांधकाम वाळूअभावी बंद आहेत. घरकुलसाठी अनुदान कमी असल्यामुळे लाभार्थ्यांना स्वतःचा हिस्सा घालूनही बांधकाम पूर्ण करताना नाकीनऊ येत आहेत. त्यामुळे अनेक लाभार्थ्यांनी ग्रामपंचायत अधिकाऱ्यांकडे घरकुल बांधकामासाठी वाळूची मागणी केली आहे. मात्र 'सरकारी काम सहा महिने थांब' याप्रमाणे ग्रामपंचायत अधिकारी वाळू मागणीचे प्रस्ताव पंचायत समितीकडे पाठवत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे पंचायत समिती कार्यालयाकडून तहसीलदार कार्यालयाकडे मोफत वाळू लाभार्थी यादी दिसून येत नाही. त्यामुळे अनेक लाभार्थ्यांना वाळू विकत घेऊन बांधकाम करावे लागत आहे . शासनाच्या नियमापेक्षा वाळू ठेकेदार अधिक रॉयल्टी घेत असल्यामुळे वाळू विकत घेणेही महागले आहे. म्हणून घरकुल लाभार्थ्यांना आर्थिक फटका बसत आहे . तहसीलदार कार्यालयाकडे याबाबत विचारणा केली असता गटविकास अधिकाऱ्यां कडून लाभार्थी यादी आली नसल्याचे सांगत आहे. त्यामुळे घरकुल लाभार्थ्यांचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी गटविकास अधिकारी यांनी वाळू मागणी प्रस्ताव न पाठवणाऱ्या ग्रामपंचायत अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.



गटविकास अधिकारी मनोज राऊत यांनी कामचुकार व हलगर्जीपणा करणार्या ग्रामसेवकांवर कारवाई करून घरकुलसाठी मोफत वाळू उपलब्ध करून देण्यासाठी पाठपुरावा करणे गरजेचे आहे. शासनाकडे मोठ्या प्रमाणात घरकुल मंजुर असूनही लाभार्थ्यांचे अधिक रक्कम खर्च होत आहे. त्यामुळे मोफत वाळू मिळाल्यास घरकुल बांधकाम पूर्ण होण्यास हातभार लागणार आहे.

शुक्रवारी घरकुल लाभार्थ्यांसाठी मोफत वाळू प्रस्तावासंदर्भात मिटींग बोलावली आहे. यामध्ये लाभार्थ्यांची नावे निश्चित करून अंतिम यादी तहसील कार्यालयाकडे पाठविण्यात येणार आहे. मिटींगमध्ये ग्रामपंचायत अधिकार्यांकडून मागणी प्रस्ताव घेणार आहे.
**- मनोज राऊत, गटविकास अधिकारी , पंचायत समिती दक्षिण सोलापूर**



सोलापूर : महापालिकेच्या पहिल्याच सभेत नगरसेविका श्रध्दा पवार आपल्या बाळासह सभागृहात हजर होत्या.

# दहावी परीक्षा : ६० हजार ७१६ विद्यार्थ्यांनी दिला मराठीचा पेपर

## कॉपीमुक्त अभियानाला मंगळवेढ्यात गालबोट; १० डमी विद्यार्थी ताब्यात



ह.दे.प्रशाला येथे परिक्षार्थी मुलींचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करताना प्राचार्या दीपा पाठक, उपप्राचार्य शांतप्पा कुंभार, केंद्र संचालक रविंद्र पानसरे, पर्यवेक्षक भानुदास बनसोडे.



बँन्डच्या गजरात विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.



अंध विद्यार्थ्यांस केंद्रावर घेऊन जाताना सहलेखनिक.



लेखन साहित्य व्यतिरिक्त परिक्षा हॉलमध्ये अन्य वस्तू नेण्यास मनाई असल्याने आपापल्या स्कूल बॅगा जमा करताना विद्यार्थी.



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या इयत्ता दहावीच्या फेब्रुवारी/मार्च २०२६ परीक्षेला गुरुवारी सुरुवात झाली. परीक्षेच्या पहिल्याच दिवशी प्रथम भाषा मराठीचा पेपर पार पडला. जिल्ह्यातील विविध परीक्षा केंद्रांवर परीक्षा शांततेत व नियोजनबद्ध पद्धतीने पार पडल्याचे चित्र दिसून आले मात्र मंगळवेढा तालुक्यातील एका गावात मात्र १० डमी परीक्षार्थी विद्यार्थी सापडले असल्याने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

जिल्ह्यातील एकूण १५ परीक्षा केंद्रांवर ६१ हजार ९६५ विद्यार्थ्यांची नोंदणी होती. यापैकी ६० हजार ७१६ विद्यार्थी परीक्षेला उपस्थित राहिले, तर १ हजार २४९ विद्यार्थी गैरहजर राहिल्याची माहिती शिक्षण मंडळाच्या उपस्थिती तक्त्यातून समोर आली आहे. सोलापूर शहरातील स. हि. ने कन्या प्रशाला, सोलापूर येथे २५४१ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. तर हरिभाई देवकरण, सोलापूर-३५०१, महात्मा गांधी विद्यालय करमाळा-२९६२, सुलाखे हायस्कुल, बार्शी ५५७४, नूतन विद्यालय, कुर्डुवाडी ५४५९, सदाशिवराव माने विद्यालय, अकलूज ५९१६, द. ह. कवठेकर प्रशाला, पंढरपूर ४३७८, नागनाथ विद्यालय, मोहोळ ४१४१, सांगोला विद्यामंदिर, सांगोला ५२०७, न्यु इंग्लिश स्कुल मंगळवेढा ३३६७, शहाजी हायस्कुल अक्कलकोट ३९१६, स. हि. ने कन्या प्रशाला, सोलापूर ३४२९, छत्रपती शिवाजी प्रशाला, सोलापूर-३१६४, भारती विद्यापीठ, सोलापूर-४१८०, इंग्लिश मिडियम स्कुल, पंढरपूर-२९८१ अशा केंद्रांवर जिल्ह्यातून ६० हजार ७१६ दहावी विद्यार्थ्यांनी आज पहिला मराठी पेपर दिला आहे. तर जिल्ह्यात १२४९ विद्यार्थी गैरहजर राहिले.

परीक्षेच्या पार्श्वभूमीवर विविध परीक्षा केंद्रांवर पोलीस बंदोबस्त, भरारी पथके, तसेच कॉपीमुक्त अभियान राबविण्यात आले. मंगळवेढा तालुक्यातील एक शाळा वगळता कुठेही अनुचित प्रकार घडल्याची नोंद नाही. मराठी विषयाची प्रश्नपत्रिका स्तर विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमानुसार व अपेक्षित स्वरूपाची असल्याची प्रतिक्रिया अनेक विद्यार्थ्यांनी दिली. दरम्यान, पुढील विषयांच्या परीक्षा ठरलेल्या वेळापत्रकानुसार पार पडणार असून, शिक्षण मंडळाकडून विद्यार्थ्यांना वेळेवर परीक्षा केंद्रावर उपस्थित राहण्याचे आवाहन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सचिन जगताप यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या निर्देशानुसार जिल्हास्तरीय सात भरारी पथके तयार करण्यात आलेली आहेत. यामध्ये शिक्षण विभागातील महिलां अधिकाऱ्यांचे विशेष पथक तयार करण्यात आले आहे. विभाग स्तरावर तीन भरारी पथके कार्यरत आहेत. इतकी दक्षता घेवूनही मंगळवेढा तालुक्यात मात्र कॉपिमुक्त अभियानाला गालबोट लागले असून, १० डमी विद्यार्थ्यांवर कारवाई करण्यात आल्याची माहिती मिळाली.



परीक्षा हॉलमध्ये प्रवेश करताना.



एकमेकांना शुभेच्छा देताना विद्यार्थीनी.



उशीर झाल्यानंतर परीक्षा केंद्रात पळत जाताना विद्यार्थी.



**सोलापूर** : पद्मशाली शिक्षण संस्था संचलित कुचन प्रशालेत १०वीच्या परीक्षार्थी विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने व भयमुक्त वातावरणात परीक्षेला सामोरे जाण्यासाठी परीक्षार्थी विद्यार्थ्यांचे संस्थेचे विश्वस्त हरीश कोंडी व श्रीनिवास गड्डम यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देवून स्वागत करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य युवराज मेटे, उपप्राचार्य अनिल निंबाळकर, उपमुख्याध्यापक मधुकर धर्मसाळे, पर्यवेक्षक दत्तात्रय मेरगू, प्रणिता सामल, मल्लिकार्जुन जोकारे आदी शिक्षक उपस्थित होते

## महत्वाचे...

### राहत्या घरी गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला एक व्यक्ती

**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

राहत्या घरी अज्ञात कारणावरून पत्र्याच्या अँगलला, सिलिंग फॅनला, ओढणीच्या साह्याने एक व्यक्ती गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला.यात हकीकत अशी की, विशाल शिवलिंग कोल्हे वय २० रा. सत्तर फूट रोड भारतरत्न इंदिरानगर सोलापूर हा राहत्या घरी अज्ञात कारणावरून पत्र्याच्या अँगलला, सिलिंग फॅनला, ओढणीच्या साह्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. नातेवाईकांनी व शेजारच्या लोकांच्या साह्याने गळफासातून खाली उतरवून बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी सदर बाजार पोलीस ठाण्याचे चव्हाण यांनी शासकीय रुग्णालय येथे दाखल केले असता उपचारापूर्वी त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

### अनोळखी इसम पाण्यात तरंगताना आढळला

**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

तलावामध्ये पाण्यात तरंगताना अनोळखी इसम आढळून आला, त्यांना बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी शासकीय रुग्णालय येथे दाखल केले असता उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. यात हकीकत अशी की, अनोळखी पुरुष वय ५० वर्षे, हे सिद्धेश्वर मंदिर तलावामध्ये पाण्यात तरंगताना मिळून आले, त्यांना बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे मुलानी यांनी शासकीय रुग्णालय येथे दाखल केले असता उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

### घराजवळील पार्किंगमध्ये आढळलेल्या व्यक्तीचा मृत्यू

**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

राहत्या घरा जवळील पार्किंग जवळ बेशुद्ध अवस्थेत आढळून आलेल्या एका व्यक्तीचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या हकीकत अशी की, शशिकांत चंद्रशेखर आहेरवाडी, वय ६० रा. ६६६ उत्तर कसबा, गवंडी गल्ली हे राहत्या घरा जवळील पार्किंग जवळ अशक्तपणा व बेशुद्ध अवस्थेत मिळून आल्याने त्यांना उपचारासाठी फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे गोंडणवरू यांनी शासकीय रुग्णालय येथे दाखल केले असता त्यांचा उपचारापूर्वी मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

### हॉटेल बंद झाले, जेवण नाही असे म्हणाल्याने कोयत्याने मारहाण

**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

हॉटेल बंद झाले, जेवण नाही असे म्हणाल्याने दोघांनी मिळून कोयत्याने मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार सोलापूर जिल्ह्यात घडला आहे. यात हकीकत अशी की, राजकुमार सूर्यकांत बिराजदार वय ४० राहणार हॉटेल दगडी चाळ सोरेगाव, आदम मन्सूर मुल्ला वय ४० हे दोघे हॉटेल बंद झाले, जेवण नाही असे म्हणाल्याने राठोड व इतर एक जणांनी मिळून कोयत्याने मारल्याने त्यामध्ये राजकुमार यांना उजव्या पायास म ार लागला तर आदम मुल्ला यांना डाव्या हातास जखम झाल्याने त्यांना उपचारासाठी मालक सचिन पवार यांनी शासकीय रुग्णालय येथे दाखल केले अशी नोंद सिविल पोलीस चौकीत झाली आहे.

तहसीलदारांकडून त्रास;

## दिव्यांग शेतकऱ्याचा उपोषणाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

रानमसले येथील माझ्या शेतातून रस्ता करण्यात येऊ नये यासंदर्भात माझ्या बाजूने प्रांत व न्यायालयाने निकाल दिला असतानादेखील तहसीलदारांकडून मला वारंवार नोटीस देऊन त्रास देण्याचा प्रयत्न होत आहे. हा प्रकार न थांबल्यास येत्या १० दिवसानंतर उपोषण करणार आहे, असा इशारा दिव्यांग शेतकरी भारत गोरे यांनी पत्रकार परिषदेत दिला.

माझ्या शेतालगत असलेल्या काही शेतकऱ्यांनी १९९० साली म ाझ्या शेतातून १२ फुटाचा रस्त्यासाठी मला मागणी केली. मी त्यास तयार नसताना अनेकांनी माझ्यावर दबाव येईल, असे वर्तणूक करीत मला ट्रॅक्टर अंगावर घालून चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला. याबाबत मी तक्रार करूनही पोलीसांनी ते गांभीर्याने घेतली नाही.

याबाबत मी प्रांत यांच्याकडे दाद मागत असताना तब्बल २५ लोकांनीही अपील दाखल केले होते. परंतु सन १९९३ मध्ये प्रांत यांनी माझ्या बाजूने निर्णय दिला. याचा राग मनात धरुन पुन्हा काही लोकांनी मला दमदाटी व मानसिक गाव देण्यास सुरुवात केली. त्यामुळे कुटुंबास नाहक त्रास होत आहे. या त्रासाला कंटाळून म ाझी पत्नी सध्या माहेरी राहत आहे. याप्रकरणी माजी आमदार बच्चू कडू यांनी फोन करुन तहसीलदारास सूचना दिल्या होत्या. असे असताना सध्याचे तहसीलदार हे वारंवार नोटीस काढून हजर राहण्यासाठी त्रास देत आहेत. सर्व पुरावे आणि निकाल असताना तहसीलदार कोणाच्या दबावाखाली मला नोटीस देत आहेत, असेही त्यांनी सांगितले.

# डुप्लिकेट बियाण्यांचा फटका; शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० फेब्रुवारी-**

मोहोळ तालुक्यातील वडदेगाव, अनगर आणि बेगम पूर येथील शेतकऱ्यांनी हिवाळी व उन्हाळी हंगामासाठी 'बॉबी' या नामांकित व्हरायटीचे बियाणे खरेदी करून लागवड केली; मात्र संबंधित बियाणे डुप्लिकेट निघाल्याचा गंभीर आरोप पुढे आला आहे. याबाबत पांडुरंग एकनाथ दळवी (रा. वडदेगाव, ता. मोहोळ) यांनी जिल्हा कृषी अधीक्षक, सोलापूर यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीनुसार, नर्सरीमध्ये टोकन करून संबंधित बियाण्यांची लागवड करण्यात आली होती. पीक वाढीच्या सुरुवातीच्या टप्प्यात सर्व काही सुरळीत असले तरी काढणीच्या वेळी अपेक्षित दर्जा न दिसल्याने उत्पादनाचा दर्जा खालावल्याचे स्पष्ट झाले. परिणामी व्यापाऱ्यांनी या मालाला नकार दिला असून लाखो रुपयांचा खर्च करून तयार केलेले उत्पादन शेतातच पडून आहे.

या वाणाला वाशी मार्केट तसेच दिल्ली मार्केट येथे मोठी मागणी असते. मात्र स्थानिक तसेच बाहेरील बाजारपेठेत म ागणी नसल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. संबंधित नॉन युसिड प्रायव्हेट लिमिटेड कंपनीशी संपर्क साधला असता, वाढत्या तापमानामुळे



किंवा हवामान बदलामुळे फळांचा रंग बदलल्याचे स्पष्टीकरण देण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे.

मात्र तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, संपूर्ण महाराष्ट्रात अशी समस्या नसून कंपनीने वितरित केलेल्या सुमारे १२०० किलो बियाण्यांच्या विशिष्ट लॉटम ध्येच हा दोष आढळून आला आहे. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित कंपनीवर कठोर कारवाई करावी व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना योग्य ती नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या घटनेमुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली असून प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी पुढे येत आहे.

# जि.प. अध्यक्षपदासाठी मराठा समाजाला न्याय मिळण्याची शक्यता?

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

सोलापूर जिल्हा परिषद अध्यक्षपदासाठी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या धर्मपत्नी तथा चपळगाव जिल्हा परिषद गटाच्या नूतन सदस्या शांभवी कल्याणशेट्टी नावाची जिल्ह्यात चर्चा सुरु आहे. मात्र या पदासाठी आपण इच्छुक नाही. आपले प्रथम प्राधान्यक्रम चपळगाव गट व या गटातंर्गत येणाऱ्या गणांच्या विकासाला असणार असल्याचे स्पष्टीकरण शांभवी कल्याणशेट्टी यांनी माध्यमांकडे दिले. दरम्यान, सोलापूर महानगरपालिकेची सर्वसाधारण पदासाठीची खुली जागा ओबीसीला दिल्याने जिल्हा परिषद अध्यक्षपदासाठी मराठा समाजाला न्याय मिळण्याची शक्यता वर्तविली जात आहे. दरम्यान, पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी याबाबत मनावर घेवून मराठा समाजाला न्याय मिळवून द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



सोलापूर जिल्हा परिषद अध्यक्ष पद ओबीसी सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव आहे. सोलापूर जिल्हा परिषद निवडणुकीत ओबीसी प्रवर्गातील १८ जागांपैकी ९ जागा ओबीसी म हिलांसाठी तर ९ जागा ओबीसी पुरुषासाठी राखीव होत्या. यापैकी भारतीय जनता पक्षाकडून ३ ओबीसी पुरुष तर ५ ओबीसी महिला सदस्य असे एकूण ८ जण निवडून आले आहेत. अध्यक्षपदाच्या निवडीसाठी अजून शासनाकडून पत्र आले नसून हे पत्र आल्यावर जिल्हा परिषदेच्या गटनेतेपदाची निवड होणार आहे. यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या म ार्गदर्शनाखाली अध्यक्षपदाची निवड प्रक्रिया पार पडणार आहे. यामुळे सध्यातरी फक्त चर्चाच सुरु आहे.

आ.सचिन कल्याणशेट्टी यांची अक्कलकोट तालुका सोबतच भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून संपूर्ण जिल्ह्यात असणारी राजकीय व्याप्ती, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याबरोबरच राज्यातील भारतीय जनता पक्षाच्या नेत्यासोबत त्यांचे असणारे जिव्हाळ्याचे संबंध, जिल्ह्यातील तालुका पातळीवरील बॉण्डिंग यामुळे जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद आ. कल्याणशेट्टी यांच्या पत्नी शांभवी कल्याणशेट्टी यांचेकडे जाईल. अशी राजकीय शक्यता वर्तविण्यात येत होती. जिल्हा परिषद अध्यक्षपद नागरिकांच्या मागासवर्गासाठी अर्थात ओबीसीसाठी राखीव आहे. सौ. कल्याणशेट्टी चपळगाव जिल्हा परिषद गटातून सर्वसाधारण जागेवरून निवडून आल्या असल्या तरी त्यांच्याकडे व्हॅलेडीटीसह ओबीसी प्रमाणपत्र असल्याने त्याच जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष होतील. अशी शक्यता वर्तवली जात होती. मात्र अध्यक्ष पदासाठी इच्छुक नसल्याचे शांभवी कल्याणशेट्टी यांनी स्पष्ट केल्याने या चर्चेला तुर्तास पूर्णविराम मिळाला. महापौरपदाच्या निवडीपोटी जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद रिप्लेस होणार की काय? याची उत्सुकता राजकीय नेत्यांसह जिल्ह्यातील नागरिकांना लागली आहे.

### तालुक्याच्या प्रश्नांवर काम करायचे : कल्याणशेट्टी

चपळगाव जिल्हा परिषद गटातील मतदारांनी सर्वांगीण विकासासाठी आपल्याला निवडून दिले आहे. या गटाबरोबरच या गटात समाविष्ट असणाऱ्या गणांच्या पर्यायाने अक्कलकोट तालुक्याच्या विकास याला आपली प्राथमिकता असणार आहे. खूप साऱ्या प्रशासकीय बाबी आपणास शिकायच्या आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद अध्यक्ष पदाच्या खुर्चीला आपण सध्या न्याय देऊ शकत नाही. त्यामुळे अध्यक्षपदासाठी आपण इच्छुक नाही. यासंदर्भात पक्षांच्या वरिष्ठांनाही आपण सांगितले असल्याचे शांभवी कल्याणशेट्टी यांनी सांगितले आहे.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## मराठवाडा स्तरीय वादविवाद स्पर्धेचे बक्षीस वितरण



**उमरगा, दि.२० फेब्रुवारी -**
उदगीर येथे २७ व २८ जानेवारी रोजी झालेल्या मराठवाडा स्तरीय वादविवाद स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न झाले. या स्पर्धेत उमरगा येथील श्री महात्मा बसवेश्वर विद्यालय चा विद्यार्थी श्रीतेज संतोषकुमार कुलकर्णी याने शहरी विभागातून तृतीय क्रमांक पटकावला.

त्याला अडीच हजार रुपये रोख रक्कम, ट्रॉफी व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यानिमित्त मार्गदर्शक शिक्षक रामदास कुलकर्णी व ज्योत्स्ना पाटील यांचा मुख्याध्यापक नेताजी गायकवाड यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

या यशाबद्दल संस्थेचे ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ. चंद्रकांत महाजन, कार्यवाह डॉ. कपिल महाजन, अध्यक्ष दंडगे गुरुजी व कोषाध्यक्ष प्रमोद कुलकर्णी यांनी विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले.

## संक्षिप्त वृत्त...



### बाळशास्त्री जांभेकर जयंतीनिमित्त जिल्हा माहिती कार्यालयात अभिवादन

**धाराशिव, दि.२० फेब्रुवारी -**
मराठी पत्रकारितेचे जनक म्हणून ओळखले जाणारे आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण' हे मराठीतील पहिले वृत्तपत्र सुरू करून पत्रकारितेची भक्कम पायाभरणी केली. दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हा माहिती कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस वरिष्ठ लिपिक नंदू पवार यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी वरिष्ठ लिपिक आशा बंडगर, कनिष्ठ लिपिक चित्रा घोडके, वाहनचालक मोहन कोळी तसेच दप्तरी अनिल वाघमारे उपस्थित होते.




### छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३९६ वा जन्मोत्सव केशेगावात उत्साहात

**इटकळ, दि.२० फेब्रुवारी -**
केशेगाव (ता. तुळजापूर) येथे हिंदवी स्वराज्याचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३९६ वा जन्मोत्सव दिमाखात साजरा करण्यात आला. शिवभक्त मुरलीधर शिनगारे यांच्या निवासस्थानी उभारलेल्या अश्वारूढ पुतळ्याचे विधीवत पूजन करून जयंती सोहळ्याची सुरुवात झाली. पाच वर्षांपूर्वी उभारलेल्या या भव्य पुतळ्यापुढे पुष्पहार अर्पण, पाळणा गीत व जयघोषाने परिसर शिवमय झाला. यानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरात सुमारे ३० युवकांनी स्वेच्छेने रक्तदान केले. सिद्धेश्वर ब्लड सेंटर यांच्या वतीने रक्तसंकलन करण्यात आले. तसेच पाटील हॉस्पिटल यांच्या सहकार्याने आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा सुमारे ३०० ग्रामस्थांनी लाभ घेतला. कार्यक्रमानंतर सर्व शिवप्रेमींना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

### शाळेच्या व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी संतोष पुदाले

**नळदुर्ग, दि.२० फेब्रुवारी -**
येथील जि.प. केंद्रीय प्राथमिक शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी शहर शिवसेना प्रमुख



संतोष पुदाले यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. नुकत्याच आयोजित पालक मेळाव्यात ही निवड जाहीर करण्यात आली. निवडीनंतर माजी अध्यक्ष संजय डुकरे व मुख्याध्यापक मस्के यांच्या हस्ते पुदाले यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना पुदाले यांनी विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे, उपस्थिती सुधारणा करणे तसेच शाळेत मूलभूत व भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्याचा मानस व्यक्त केला. कार्यक्रमास मुख्याध्यापक मस्के, माजी अध्यक्ष संजय डुकरे, गौस बागवान, प्रमोद कुलकर्णी, नेताजी महाबोले यांच्यासह शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त येरमाळ्यात भव्य रक्तदान शिबिर

**येरमाळा, दि.२० फेब्रुवारी -**
येरमाळा (ता. कळंब) येथे मध्यवर्ती शिवजयंती सोहळा समितीच्या वतीने १९ फेब्रुवारी रोजी ग्रामपंचायत प्रांगणात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरास शिवप्रेमी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त आयोजित या उपक्रमात तब्बल ६३ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. रक्तदान हेच श्रेष्ठ दान हा संदेश देत तरुणांसह विविध वयोगटातील नागरिकांनी सहभाग नोंदवला. वैद्यकीय पथकाच्या उपस्थितीत सुरक्षिततेची सर्व काळजी घेत शिबिराचे सुयोग्य नियोजन करण्यात आले. रक्तदात्यांना प्रमाणपत्र व अल्पोपहार देऊन सन्मानित करण्यात आले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शिवजयंती सोहळा समितीचे अध्यक्ष शुभम बारकुल, उपाध्यक्ष संकेत बारकुल, सचिव भाऊसाहेब पवार यांच्यासह प्रविण बारकुल, गणेश बारकुल, गणेश पवार, विनोद यादव आणि सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

### लिट्ल फ्लॉवर्समध्ये शिवजयंती साजरी

**तुळजापूर, दि.२० फेब्रुवारी -**
अखंड हिंदुस्तानचे आराध्य दैवत स्वराज्य निर्माते महान युगपुरुष श्री छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती लिट्ल फ्लॉवर्स मराठी प्राथमिक शाळा येथे साजरी करण्यात आली. शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन शाळेचे मुख्याध्यापक संजय पवार, अविनाश गव्हाणे व उमा पोतदार यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.

# एसएससीच्या पहिल्याच पेपरला ४५२ विद्यार्थ्यांची दांडी!

## धाराशिव जिल्ह्यातील ९० परीक्षा केंद्रांवर दहावीची परीक्षा सुरळीत...



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० फेब्रुवारी -**
जिल्ह्यात फेब्रुवारी/मार्च सत्रातील माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (दहावी) परीक्षेला आज शांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात सुरुवात झाली. जिल्हाभरातील एकूण ९० परीक्षा केंद्रांवर परीक्षा सुरळीत पार पडली असून प्रशासनाने काटेकोर नियोजन केल्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.

यंदा जिल्ह्यातून एकूण २१ हजार ५६६ विद्यार्थी परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत. त्यामध्ये मराठी माध्यमाचे २० हजार ८१२ तर उर्दू माध्यमाचे ७५४ विद्यार्थी सहभागी झाले आहेत. पहिल्याच दिवशी झालेल्या पेपरसाठी एकूण २१ हजार ११४ विद्यार्थी उपस्थित राहिले.

धाराशिव, तुळजापूर, उमरगा, लोहारा, कळंब, वाशी, भूम आणि परंडा या तालुक्यांतील सर्व परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांची ओळखपत्र तपासणी, सीसीटीव्ही निरीक्षण, तसेच पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. संवेदनशील केंद्रांवर विशेष पथके नियुक्त करण्यात आली होती.

पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. परीक्षा केंद्राबाहेर पालकांचीही मोठी गर्दी होती. अनेक ठिकाणी स्वयंसेवी संस्थांकडून पिण्याच्या पाण्याची व इतर सोयींची व्यवस्था करण्यात आली होती. जिल्ह्यातील परीक्षा केंद्रांवर शांततेत सुरू असून प्रशासनाकडून काटेकोर देखरेख ठेवण्यात येत आहे. परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता आणि शिस्त राखण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मौनिक घोष यांच्या निर्देशानुसार जिल्हास्तरीय भरारी पथके तयार करण्यात आली आहेत. शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचे विशेष पथकही कार्यरत करण्यात आले आहे. सर्व विभाग स्तरावर ही पथके सक्रिय असून सर्व परीक्षा केंद्रांवर अचानक तपासण्या केल्या जात आहेत.

माध्यमिक शिक्षण विभागाने दिलेल्या माहितीनुसार, सर्व केंद्र संचालकांना आपल्या परीक्षा केंद्रावर कोणताही गैरप्रकार घडू नये यासाठी आवश्यक ती दक्षता घेण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. कॉपीप्रकरणांना आळा घालण्यासाठी उड्डाण पथकांकडून सतत निरीक्षण सुरू आहे.

जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्रांवर परीक्षेशी संबंधित प्रत्येक खोलीत सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच या चित्रीकरणाची व्यवस्थित साठवणूक (रेकॉर्डिंग स्टोरेज) करण्याबाबतही स्पष्ट निर्देश दिले गेले आहेत, जेणेकरून आवश्यकतेनुसार तपासणी करता येईल.

जिल्ह्यातील अतिसंवेदनशील व संवेदनशील केंद्रांची माहिती संकलित करून त्या ठिकाणी पोलीस प्रशासनाच्या मदतीने कडक उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

### ४५२ विद्यार्थी गैरहजर...

पहिल्याच पेपरला एकूण ४५२ विद्यार्थी अनुपस्थित राहिल्याची नोंद झाली आहे. मराठी माध्यमाचे ४२६, विद्यार्थी उर्दू माध्यमाचे २६, विद्यार्थी अनुपस्थितीचे प्रमाण अत्यल्प असल्याचे शिक्षण विभागाने सांगितले.

### प्रशासनाचा कडक इशारा...

कॉपी रोखण्यासाठी उड्डाण पथके कार्यरत असून नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाणार असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. जिल्ह्यात दहावीची परीक्षा शांततेत व शिस्तबद्ध वातावरणात सुरू झाली असून पुढील पेपरही याच पद्धतीने पार पडतील, असा विश्वास शिक्षण विभागाने व्यक्त केला आहे.

## खरीप २०२० पिकविमा प्रकरण : १३४ कोटींच्या निधीवरून पुन्हा प्रश्नचिन्ह?



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० फेब्रुवारी -**
खरीप २०२० च्या पिकविमा प्रकरणात २४ नोव्हेंबर रोजी मुंबई उच्च न्यायालय (छत्रपती संभाजीनगर खंडपीठ) यांनी ऐतिहासिक निकाल देत धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सुमारे २३४ कोटी रुपये देण्याचे आदेश दिले होते. या रकमेच्या वितरणासाठी दोन महिन्यांची म्हणजेच २४ जानेवारीपर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र शासनाने वेळेत निधी वितरित केला नाही.

दरम्यान, उच्च न्यायालयात जमा असलेले ७५ कोटी रुपये व त्यावरील व्याज मिळून जवळपास ९४ कोटी रुपये जिल्हा प्रशासनाकडे प्राप्त झाले. मात्र योग्य बँक खाते उपलब्ध नसल्याचे कारण देत या रकमेचेही वितरण करण्यात आले नाही. त्याच कालावधीत पिक विमा कंपनीने सर्वोच्च न्यायालय मध्ये धाव घेतली आणि ९४ कोटी रुपयांवर स्थगिती आदेश मिळविला.

पिक विमा कंपनीकडे राज्य शासनाचा १३४ कोटी रुपयांचा हप्ता देय असल्याचे सांगितले जाते. हा निधी तरी जिल्हा प्रशासनाकडे वर्ग व्हावा, यासाठी अधिकाऱ्यांनी प्रयत्न केले. अखेर ११ फेब्रुवारी रोजी यासंदर्भातील शासन निर्णय काढण्यात आला. मात्र अद्याप हा निधी जिल्हा प्रशासनाकडे प्राप्त झालेला नाही.

२३ फेब्रुवारी रोजी सर्वोच्च न्यायालयात पुढील सुनावणी होणार असून, त्या पार्श्वभूमीवर निधी वर्ग करण्यात विलंब केला जात आहे का, असा प्रश्न अनिल जगताप यांनी उपस्थित केला आहे. कारण १३४ कोटी रुपयांवर सध्या सर्वोच्च न्यायालयाचा कोणताही तोंडी किंवा लेखी स्थगिती आदेश नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

२०२० चा विमा मिळण्यासाठी २०२६ साल उजाडले. अजून किती प्रतीक्षा करायची? शेतकऱ्यांची आणखी किती चेष्टा करणार? असा जळजळीत सवालही त्यांनी उपस्थित केला.

दरम्यान, अनिल जगताप यांनी देवेंद्र फडणवीस यांना ई-मेल पाठवून १३४ कोटी रुपयांचा निधी तातडीने जिल्हा प्रशासनाकडे वर्ग करून धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना वितरित करावा, अशी मागणी केली आहे.

मुख्यमंत्री कार्यालयाकडून अर्ज संबंधित खात्याकडे पाठवण्यात येत असल्याचा प्रतिसाद मिळाल्याची माहितीही त्यांनी दिली.

### शेतकऱ्यांऐवजी विमा कंपनीचे हित? : अनिल जगताप

राज्य शासन शेतकऱ्यांचे हित जपण्याऐवजी पिक विमा कंपनीचे हित जपत असल्याचे एकूण घटनाक्रमावरून दिसून येत असल्याचा आरोप अनिल जगताप यांनी केला. उच्च न्यायालयाचा निकाल लागून दोन महिन्यांहून अधिक कालावधी उलटून गेला, तरीही प्रत्यक्ष निधी वितरित झालेला नाही, याबाबत त्यांनी नाराजी व्यक्त केली. जर २३ फेब्रुवारीच्या सुनावणीनंतर पुन्हा स्थगिती मिळाली, तर आधीचे ९४ कोटी आणि सध्याचे १३४ कोटी असे एकूण २२८ कोटी रुपये न्यायालयीन प्रक्रियेत अडकून पडण्याची भीती त्यांनी व्यक्त केली.

## मंगरुळ येथे श्रीकंचेश्वर यात्रेची सांगता

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.२० फेब्रुवारी -**
मंगरुळ येथील ग्रामदैवत श्रीकंचेश्वर यात्रेची सांगता १७ फेब्रुवारी रोजी शाळकरी विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाने उत्साहात झाली.

स्पर्धा मोठा व लहान गट अशा दोन विभागांत घेण्यात आली. मोठ्या गटात जिल्हा परिषद प्रशाला मंगरूळ प्रथम, इंदिरा कन्या प्रशाला द्वितीय तर संत गाडगे बाबा आश्रम शाळा तृतीय ठरली.

लहान गटात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मंगरुळ प्रथम, जि.प. प्राथमिक शाळा खंडाळकरवाडी द्वितीय तर जि.प. कन्या शाळा मंगरुळ तृतीय ठरली.

मॉडर्न हायस्कूल कसई, विद्या भारती प्री-प्रायमरी स्कूल व सर्व अंगणवाडींना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.

## कळंबमध्ये 'फुलचंद' पानाच्या विळख्यात तरुणाई; आरोग्य धोक्यात!



### पालकांचे नियंत्रण असणे महत्वाचे...

मुले शाळेत किंवा क्लासला गेल्यावर नेमके काय करतात, यावर पालकांचे नियंत्रण असणे आवश्यक आहे. मुलांच्या कृत्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे त्यांच्या भविष्याशी खेळण्यासारखे आहे. कडक पान खाण्याच्या नादात आरोग्यास धोक्यात घालत आहेत. पालक आणि शिक्षकांनी वेळीच सावध होण्याची वेळ आली आहे.

**परवेज मुल्ला**
**कळंब, दि.२० फेब्रुवारी-**
कळंब शहरातील तरुणाई शरीर सुदृढ बनवण्याऐवजी 'फुलचंद' पानाच्या नशेत अडकत चालल्याचे चिंताजनक चित्र समोर येत आहे. सातवी-आठवीतील शाळकरी मुलांपासून ते महाविद्यालयीन युवकांपर्यंत या पानाचे वेड वाढत असून, सुरुवातीला 'मस्त वाटते' म्हणून सुरू झालेले सेवन आता व्यसनात परिवर्तित होत आहे.

तरुणांमध्ये 'जास्त कडक पान' बनवून देण्याची स्पर्धा सुरू असून, मित्रांची टिंगल-टवाळी करत सक्तीने पान खायला देण्याचे प्रकार वाढले आहेत. तंबाखू व रासायनिक घटकांमुळे मेंदूवर परिणाम होऊन निर्णयक्षमता कमी होणे, स्मरणशक्तीवर परिणाम, पचनसंस्थेचे विकार, रोगप्रतिकारक शक्ती घटणे आणि तोंड-घशाच्या कर्करोगाचा धोका वाढणे अशी गंभीर लक्षणे दिसून येत आहेत.

विशेषतः शाळा व महाविद्यालयांच्या परिसरात या पानाचा खप मोठ्या प्रमाणात वाढला असल्याचे दिसते.

अनेक पालक मुलांच्या वागणुकीतील बदल आणि वाढता खर्च याकडे दुर्लक्ष करत असल्याने ही समस्या अधिक गंभीर बनत आहे. या व्यसनामुळे तरुणांचे शैक्षणिक व वैयक्तिक आयुष्य धोक्यात येत असून, शासन व समाजाने याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.

## रातोरात पाडले तुळजापूर बस स्थानकाचे वॉल कंपाऊंड

### ठेकेदार आणि इंजिनियर कडून नुकसान भरपाई वसूल करण्याची महाविकास आघाडीची मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२० फेब्रुवारी -**
तुळजापूर येथील बस स्थानकाचे निकृष्ट दर्जाचे काम झाले म्हणून महाविकास आघाडीने ५ जून २०२५ रोजी आंदोलन केले होते. निकृष्ट कामाबद्दल संबंधित ठेकेदारावर कारवाई करून त्याची माहिती देऊ, असे आश्वासन दिल्यानंतर महाविकास आघाडीने आंदोलन मागे घेतले होते. पण आजतागायत एसटी महामंडळाकडून उत्तर मिळाले नाही म्हणून त्याचे स्मरणपत्र आगार प्रमुखांना दि.२० फेब्रुवारी रोजी देण्यात आले. तसेच १८ फेब्रुवारी रोजी नुकतच नवीन बांधकाम झालेल्या बस स्थानकाची वॉल कंपाऊंडची भिंत वरिष्ठांच्या तोंडी सांगण्यावरून पाडण्यात आल्याचे समजते.

जनतेच्या टॅक्सचा पैसा वाया घालवण्याचा अधिकार महामंडळाला कोणी दिला असा सवाल सदरील स्मरण पत्रात महाविकास आघाडीच्या वतीने करण्यात आला आहे.

बस स्थानकाच्या वॉल कंपाऊंडची बांधलेली भिंत पाडल्याप्रकरणी त्याची वसुली संबंधित इंजिनिअर व गुत्तेदाराकडून वसूल करण्यात यावी नाहीतर महाविकास आघाडीच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देखील यावेळी देण्यात आला आहे.

बस स्थानकाचे निकृष्ट दर्जाचे केलेल्या कामाबद्दल संबंधित ठेकेदारावर केलेल्या कारवाईची कागदपत्रे माहिती मिळण्याची मागणी यावेळी महाविकास आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे.

सदरील स्मरण पत्रावर नगरसेवक अमोल कुतवळ, रणजीत इंगळे, आनंद जगताप, चिन्मय मगर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## सर्व्हिस रस्ता तात्काळ तयार करा; नळदुर्गकरांची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२० फेब्रुवारी -**
भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (राष्ट्रीय महामार्ग विभाग) यांनी सोलापूर-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावरून नळदुर्ग शहरात येण्यासाठी व जाण्यासाठी श्री खंडोबा पणन सहकारी संस्थेसमोर सर्व्हिस रस्ता तयार करावा, अशी मागणी नळदुर्ग शहरवासीयांनी केली आहे.

सर्व्हिस रस्ता नसल्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

सोलापूर-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण जवळपास पूर्ण झाले असून हा महामार्ग नळदुर्ग शहराबाहेरून श्रीक्षेत्र मैलारपूर मार्गे बायपासने पुढे गेला आहे. मात्र, बायपास तयार करताना जुन्या महामार्गाच्या ठिकाणी, श्री खंडोबा पणन सहकारी संस्थेसमोरून शहरात ये-जा करण्यासाठी सर्व्हिस रस्ता देणे अपेक्षित होते.

परंतु तो न देता रस्ता उपजिल्हा रुग्णालयाजवळून नळदुर्ग-तुळजापूर मार्गावरील अत्यंत अरुंद पुलावरून वळविण्यात आला आहे. नळदुर्ग-तुळजापूर रस्त्यावरील पुल अरुंद असल्याने चारचाकी वाहनांना शहरात प्रवेश करताना मोठी कसरत करावी लागत आहे.

हा वळण रस्ता वाहनचालकांच्या लक्षात येत नसल्याने अनेकजण शहरात येण्याऐवजी पुढे निघून जातात. परिणामी प्रवासी व वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत आहे. नवीन बायपासमुळे रात्रीच्या वेळी सोलापूरहून हैद्राबादकडे जाणाऱ्या बसगाड्या व ट्रॅव्हल्स नळदुर्ग बसस्थानकात न येता थेट बायपासने पुढे जात आहेत.

प्रवाशांना नळदुर्ग-तुळजापूर रस्त्यावरील पुलावर किंवा खंडोबा मंदिरासमोरील रस्त्यावर उतरवले जाते.

तेथून बसस्थानक सुमारे दोन किलोमीटर अंतरावर असल्याने रात्रीच्या वेळी प्रवाशांना पायी जावे लागते. रिक्षा किंवा इतर वाहनांची सोय नसल्याने विशेषतः महिला व लहान मुलांना अडचणी व सुरक्षेचा धोका निर्माण होत आहे.

नागरिकांच्या मते, पूर्वीचा जो जुना नळदुर्गकडे येणारा महामार्ग आहे, त्याठिकाणी श्री खंडोबा पणन सहकारी संस्थेसमोर सर्व्हिस रस्ता तयार केल्यास शहर व परिसरातील नागरिक तसेच प्रवाशांची मोठी सोय होईल.

राष्ट्रीय महामार्ग विभागाने या मागणीची तात्काळ दखल घेऊन सर्व्हिस रस्ता तयार करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नळदुर्गकरांनी दिला आहे.

## जेवळी येथे घरकुल लाभार्थ्यांची अधिकाऱ्यांकडून पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२० फेब्रुवारी -**
लोहारा तालुक्यातील जेवळी येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय अर्थसहाय्य योजनेअंतर्गत चार घरकुल लाभार्थ्यांना मंजुरी मिळाल्यानंतर संबंधित कामांची पाहणी करण्यात आली.

मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष व प्रकल्प संचालक श्री शेंगुलवार यांनी ग्रामपंचायत जेवळी येथे भेट देऊन घरकुलांच्या कामाची स्थिती, मंजुरीनुसार कार्यवाही व योजनेची अंमलबजावणी याची सविस्तर माहिती घेतली.

यावेळी गटविकास अधिकारी वग्गे, विस्तार अधिकारी पंचायत शटगार एस.एम., सरपंच महानंदा पणुरे, ग्रामपंचायत अधिकारी गौतम बी.जे. तसेच लाभार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते. या भेटीमुळे लाभार्थ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले होते.

## संक्षिप्त...

### दैठणा येथे शिवजयंती उत्साहात साजरी



**शिरूर अनंतपाळ :** दैठणा येथील चावडी या गावच्या मध्यवर्ती ठिकाणी शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमासाठी ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

याप्रसंगी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक व्यंकटराव बिरादार यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच दैठणा ग्रामपंचायतीचे विद्यमान उपसरपंच आशिष गोविंदराव बिरादार, बालाजी तोटे, माधवराव पाटील, नितीन पाटील, निळकंठ बिरादार आदी मान्यवर उपस्थित होते.दैठणा गावचे समाजसेवक म्हणून ओळखले जाणारे सुखदेव किशनराव पाटील आणि सचिन पाटील यांनीही कार्यक्रमास आवर्जून उपस्थिती लावली.

कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी शिवाजी महाराजांच्या कार्याचा व विचारांचा गौरव करून त्यांच्या आदर्शांचे पालन करण्याचे आवाहन केले. संपूर्ण वातावरण शिवमय झाले होते.

### दैठणा येथील बौद्ध वाड्यात शिवजयंती उत्साहात साजरी



**शिरूर अनंतपाळ :**दैठणा येथील बौद्ध वाड्यात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

याप्रसंगी दैठणा येथील विद्यमान सरपंच शेषराव कांबळे यांच्यासह विलास कांबळे, रमेश कांबळे, बाबुराव टिपराळे, व्यंकट कदम, जीवन कांबळे, भागवत कांबळे, पंढरी कांबळे, भीमराव कांबळे, श्रीपती कांबळे आदींनी उपस्थिती लावली.

कार्यक्रमात शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि आदर्शांचा गौरव करण्यात आला. युवकांनी देशभक्तीपर घोषणांनी परिसर दणाणून सोडला. तसेच बालकांनी व महिलांनीही मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. कार्यक्रमाचे आयोजन बौद्ध वाड्यातील युवक मंडळाच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी विलास कांबळे यांच्याकडून सर्व उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### शास्त्री विद्यालयात शिवजयंती साजरी



**उदगीर:** येथील लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात शिवजयंती संपन्न झाली. याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्ष कृष्णा मारावार प्रमुख पाहुण्या आशा मोरे पर्यवेक्षक किरण नेमट माधव मठवाले कार्यक्रम प्रमुख विश्र्वजीत श्रीखंडे उपस्थित होते.

यावेळी कल्याणी महामुनी हीने शिवरायांवर भाषण केले तर प्रमुख पाहुण्या आशा मोरे यांनी आदर्श राज्यकर्ता मुत्सद्दी व कर्तुत्ववान राजा हे शिवरायांचे गुणवैशिष्ट्ये आपल्या भाषणात विशद केले. अध्यक्ष समारोपात कृष्णा मारावार यांनी शिवरायांच्या विलक्षण व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अक्षय शिवशट्टे प्रास्ताविक विश्र्वजीत श्रीखंडे स्वागत व परिचय मनीषा आचार्य तर आभार मच्छिंद्र सोनकांबळे यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता प्रीती शेंडे यांच्या कल्याणमंत्रानी झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अभ्यासपूरक मंडळ प्रमुख अनिता येलमटे सहप्रमुख निलेश मांडवकर यांसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### माध्यमिक आश्रम शाळेत दहावी परीक्षा शांततेत

**रेणापूर :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांच्यावतीने २० फेब्रुवारी पासून दहावीची परीक्षांना सुरुवात झाली. त्या अनुषंगाने माध्यमिक आश्रम शाळा रूपचंद नगर येथील परीक्षा केंद्रावर शांततेत सुरळीत सुरुवात झाली. या परीक्षा केंद्रावर एकूण २९६ विद्यार्थी परीक्षेला बसले विद्यार्थ्यांनी वेळेआधीच उपस्थिती नोंदवली. परीक्षा केंद्रावर आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या

परीक्षेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी परीक्षा केंद्र परिसरात चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला.त्यामुळे संपूर्ण परीक्षा कालावधीत शांततेत सुरुवात झाली. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसह शिस्तबद्ध वातावरण राखण्यासाठी परीक्षा केंद्र परिसरात योग्य नियोजन करण्यात आले.

परीक्षार्थी व पालकांनी शाळा प्रशासनाच्या व्यवस्थेबाबत समाधान व्यक्त केले.

एकूणच माध्यमिक आश्रम शाळा, रूपचंद नगर येथील परीक्षा केंद्रावर दहावी व बारावीच्या परीक्षा यशस्वीरीत्या व शांततेत सुरु असल्याची माहिती प्राचार्य प्रदीप राठोड तसेच परीक्षा केंद्र प्रमुख वडवले यांनी दिली.

# 'डीजे'च्या आवाजापेक्षा 'पाण्याचा' आवाज महत्त्वाचा

## शिऊर येथील शिवप्रतिष्ठानचा स्तुत्य उपक्रम!, शिवजयंतीनिमित्त मिरवणुकीला फाटा; मंडळाने गावाला दिली विंधन विहिरीची भेट..

**तभा वृत्तसेवा/रियाज मोमीन**
**वलांडी, दि. २० फेब्रुवारी :** दरवर्षी शिवजयंती म्हटली की गुलालाची उधळण, कानठळ्या बसवणारा डीजेचा आवाज आणि भव्य मिरवणूक हे समीकरण ठरलेले असते. मात्र, या परंपरेला फाटा देत येथील 'देवणी तालुक्याचे शेवटचे टोक असलेल्या निलंगा तालुक्यातील शिऊर येथील शिवप्रतिष्ठान नव तरुण मंडळाने' यंदा एक वेगळाच आदर्श समाजासमोर ठेवला आहे. मिरवणुकीवर होणारा लाखो रुपयांचा खर्च टाळून मंडळाने गावात पिण्याच्या पाण्यासाठी विंधन विहीर (बोअरवेल) खोदून गावाची तहान भागवण्याचा संकल्प पूर्ण केला आहे.



शिवजयंतीच्या या अनोख्या उपक्रमाचे संपूर्ण परिसरातून कौतुक होत असून, अशीच साजरी व्हावी शिवजयंती अशा प्रतिक्रिया उमटत आहेत.

**बडेजाव टाळून समाजहिताला प्राधान्य**

वाढत्या उन्हाळ्यामुळे गावात पाणीटंचाईची समस्या निर्माण होऊ लागली होती. दरवर्षी मंडळाच्या वतीने मिरवणुकीवर मोठा खर्च केला जायचा. मात्र, यंदा मंडळाच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येत 'डीजे'च्या तालावर नाचण्यापेक्षा ग्रामस्थांच्या डोळ्यांतील पाणी पुसण्याचा निर्णय घेतला. शिवजयंती उत्सवाचा निधी गोळा करून गावात एका मोक्याच्या ठिकाणी विंधन विहीर खोदण्यात आली. या विंधन विहीरीचे भूमिपूजन सैन्य दलातील सेवानिवृत्त कर्नल सचिन रंडाळे यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. विशेष म्हणजे, या विहिरीला भरपूर पाणी लागल्याने ग्रामस्थांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे हित जपले, तोच वारसा पुढे नेण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. केवळ घोषणा देण्यापेक्षा महाराजांच्या विचारांप्रमाणे कृती करणे जास्त महत्त्वाचे वाटले.

**– अध्यक्ष, शिवप्रतिष्ठान नव तरुण मंडळ**

**ठळक वैशिष्ट्ये**

- खर्चाला फाटा: मिरवणूक आणि अवाजवी सजावटीचा खर्च वाचवला.
- कायमस्वरूपी सुविधा: केवळ एक दिवसाचा उत्सव न करता गावाला कायमस्वरूपी पाण्याची सोय करून दिली.
- प्रदूषणमुक्त साजरीकरण: ध्वनी आणि वायू प्रदूषणाला पूर्णपणे फाटा दिला.
- युवाशक्तीचा आदर्श: तरुणांनी एकत्र येत सामाजिक बांधिलकी जपली.

# म.फुले विद्यालयाची शिवजयंती निमित्त ऐतिहासिक मिरवणूक

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि. २० फेब्रुवारी :** अहमदपूर येथील महात्मा फुले प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वतीने शिवजयंती महोत्सव २०२६ अभूतपूर्व उत्साहात आणि दिमाखात साजरा करण्यात आला. किसान शिक्षण प्रसारक मंडळ संचलित या विद्यालयाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यविचारांचा जागर घालत संपूर्ण शहरात देशभक्तीचे वातावरण निर्माण केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष मा. माधवराव पाटील उपस्थित होते, तर उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री मा. बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी सहाय्यक पोलीस अधीक्षक, उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे, तहसीलदार उज्वला पांगरकर, नगराध्यक्ष स्वप्नील व्हत्ते, माजी सभापती आयोध्या ताई केंद्रे, माजी नगराध्यक्ष ड. भारत चामे, शिवानंद हेंगणे, माजी आमदार बब्रुवान खंदारे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर काढण्यात आलेली भव्य मिरवणूक अहमदपूरच्या रस्त्यांवरून दिमाखात फिरली. ढोल-ताशांच्या गजरात, लेझीम आणि झांज पथकांच्या तालावर विद्यार्थी जोशात नाचत होते. वारकरी पथकाचा पारंपरिक पोवाडा वातावरण भारावून टाकणारा ठरला.



शिवरायांच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी साकारलेले प्रसंग, जिजामाता रथ, तसेच घोड्यावर विराजमान शिवाजी महाराजांची प्रतिकृती हे मिरवणुकीचे विशेष आकर्षण ठरले. छत्रपती शिवाजी महाराज की जयच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला.

शिवजयंतीनिमित्त आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. आले मराठे, ललाटी भंडार आणि माय भवानी या देशभक्तीपर गीतांवरील विद्यार्थ्यांचे नृत्य सादरीकरण टाळ्यांच्या कडकडाटात दाद मिळवून गेले. शिवरायांच्या पराक्रमावर आधारित नाटिका, प्रभावी वक्तृत्व आणि समूहगीतांनी कार्यक्रमाला वैचारिक उंची दिली.

डी.जे. सादरीकरणांमध्ये आपली संस्कृती: आपला अभिमान, हास्य कल्लोळ - कॉमेडी डान्स, रणरागिणी: शिवशाही ते आजची नारी, बाबूराव स्टाईल: फिर हेरा फेरी, ढोल-नगाडा व दांडिया फ्यूजन, भीमशक्ती: क्रांतीचा हुंकार आणि लय-ताल: सुरांचा साज या विविध थीम्स सादर करण्यात आल्या. पारंपरिक आणि आधुनिक कलांचा संगम पाहून उपस्थित प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले.

## लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल मध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. २० फेब्रुवारी :** लातूर परिसरातील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचालित लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुल मध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन श्रीकृष्ण लाटे, शाळेच्या प्राचार्या रुपाली कुलकर्णी, शाळेचे समन्वयक रौफ शेख, समन्वयिका रुपाली कोकेटे, नम्रता झांबरे, प्रियांका नागलबोने, विद्या पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.याप्रसंगी शाळेचा विद्यार्थी सिद्धांत आलमले याने शिवाजी महाराज यांच्याविषयी माहिती सांगितली. भारतातील सर्वात शूर राजांपैकी एक म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होय. 'शिवजयंती' अर्थात छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव महाराष्ट्रात एखाद्या मोठ्या सणाप्रमाणे साजरा केला जातो. महाराजांची स्वराज्य स्थापना, सामान्य जनते विषयी असलेले प्रेम, सर्व धर्मांचा आदर या विषयी माहिती दिली. शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्तानें शाळेचे विद्यार्थी रियांश कदम, रियांश कांबळे, सिद्धांत पाटील, स्मयन कुलकर्णी, वरद रेकुलवाड, शिवांश स्वामी, निरंजन बस्तापुरे, कृष्णा माळी, अभय फड, प्रतिक मोरे, ऋषिकेश निले, ओम वाघमारे यांनी शिवाजी महाराज यांची वेशभूषा साकारून त्यांच्या विषयी आपले मनोगत व्यक्त केले.

# युवकानी स्वत:ची क्षमता ओळखायला शिकले पाहिजे : डॉ. भागवत केंद्रे

## वीरशैव तेली समाजाच्यावतीने श्री सिद्धेश्वरास गंगाजल अभिषेक




**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि. २० फेब्रुवारी :** स्नेहस्मेलनाच्या व्यसपीठावरून तरुण युवा पिढीनी आपल्या कला अविष्कार घडवून करिअर करावेत आशा संधी पुन्हा कुठेच मिळत नाही.ज्याच्याकडे स्किल आहे. तोच विद्यार्थी मार्केटमध्ये टिकणार आहे. प्रत्येक गोष्टीची माहिती महाविद्यलयातून मिळत असते. युवकामध्ये आत्मनिर्भर आणि क्षमता निर्मान करण्याचे काम महाविद्यालयीन स्तरावरून होत असते . म्हणून प्रत्येक विद्यार्थीनी पुढे येऊन सहभाग नोंदविला पाहिजे. मित्रानो प्रयत्न करायला शिका, प्रयत्नवादी व्हा प्रयत्ना अंती यश मिळविता येते. या युवारंग २०२६ स्नेहस्मेलनात ज्यांनी सहभाग नोंदविला आणि यश संपादन केले आहे आशा सर्व युवक युवतीचे अभिनंदन आणि ज्यांनी शेवटपर्यंत झुंझ दिली प्रयत्न केले . आशा सर्व विद्यार्थी मित्रानाही सुभेच्छा देत त्याच्या प्रयत्नाचे भरभरून कौतूक केले ते संभाजीराव केंद्रे महाविदयालय जळकोट येथे युवारंग २०२६ स्नेहस्मेलनाच्या समारोप प्रसंगी अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते.

या प्रसंगी व्यासपीठावर कार्यकमाचे अध्यक्ष डॉ भागवत केंद्रे कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी संस्थेच्या कोषाध्यक्ष प्रा डॉ शितल गुट्टे ताई महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.टी .लहाने , विद्यार्थी विकास विभागाचे प्रमुख डॉ विजयकुमार कल्लूरकर , संस्कृतिक विभागाचे प्रमुख डॉ प्रशांत कांबळे, डॉ नवनाथ मुसळे, डॉ कल्पना केंद्रे, विद्यार्थी संसद सचिव गणेश लिंगदळे आदी मान्यवर मंडळी उपस्थित होते.

या प्रसंगी पुढे बोलतान डॉ भागवत केंद्रे म्हणाले हार आणि जित जीवणाचे अविभाज्य भाग आहे. अपयश हि यथाची पहिली पायरी आहे. अपयशा नंतर यश निश्र्चित आहे. त्यांना सक्षमपणे सामोर्य गेले पाहिजे असे मत व्यक्त केले.

याप्रसंगी लावणी कला प्रकारात शिवानी मठपती प्रथमधनश्री गडकर व्दितीयविडंबन कला प्रकारात शेख मुस्कान, नामवाड पंकज प्रतिक्षा शिदे, सचिन कंठाळे शिल्पा चमरगौर संजीवनी मठपती कोळी नृत्य प्रकारात प्रणाली तोरमवाड प्रथम आनंदनगरी समिक्षा इबिददार प्रथम वेदांत माने व्दितीय क्रमांक पटकावले आहे. यावेळी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते .या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मनिषा देशपांडे व प्रा आरती सुरपाम यांनी केले तर आभार प्रा सोनाबाई पाटील मॅडम यांनी मानले .

# राज्यस्तरीय स्पर्धेत डी.बी. फार्मसीची दमदार झेप; 'स्टराईल प्रॉडक्ट्स' मॉडेलला प्रथम क्रमांकाचा मान

## एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठात १० हजारांच्या रोख बक्षिसासह विद्यार्थ्यांचा दैदिप्यमान विजय

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि. २० फेब्रुवारी :** चाकूर तालुक्यातील महाळंग्रा येथील डि.बी.फॉर्मसीला स्टराईल प्रॉडक्ट्स' मॉडेलला प्रथम क्रमांकाचा मान मिळाला आहे.सोलापूर येथील एमआयटी विश्र्वप्रयाग विद्यापीठाच्या स्कूल ऑफ फार्मसीत आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय 'मॉडेल मेकिंग' स्पर्धेत डी.बी. कॉलेज ऑफ फार्मसी अँड रिसर्चच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला आहे. या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक वाटचालीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.




स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांनी 'लेआऊट ऑफ स्टराईल प्रॉडक्ट्स' हा विषय निवडून मॉडेल सादर केले. औषधनिर्मिती क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाच्या या विषयावर प्रभावी मांडणी करत त्यांनी परीक्षकांची दाद मिळवली. प्रत्येक टीममध्ये दोन विद्यार्थ्यांचा समावेश होता. प्रथम वर्षातील डी.फार्मसीचे विद्यार्थी डोंगरे शीतल, जाधव प्रतीक यांनी सादर केलेल्या मॉडेलला प्रथम क्रमांक मिळाला असून त्यांना रुपये १०,०००/- चे रोख बक्षीस प्रदान करण्यात आले.

याशिवाय 'बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेंट' या विषयावर रियान शेख व आकाश पोळकर यांनी मॉडेल सादर केले. 'मटेरिओव्हिजीलन्स' या विषयावर माया चाडेबोणे व अनुश्री नागरगोजे यांनी पोस्टर सादर केले. तसेच 'डिझास्टर मॅनेजमेंटमध्ये फार्मासिस्टची भूमिका' या विषयावर कृष्णा कदम व गणेश राजमाने यांनी पोस्टर सादर करत सहभाग नोंदवला. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. या यशासाठी प्रा. वैष्णवी ताथोडे, प्रा. आशा केदार, प्रा.मोनिका इंगळे, प्रा. मानसी देशमुख, प्रा. दिपाली भुरे, प्रा. रोहित पांचाळ, प्रा. सुप्रिया काटगाव, प्रा.योगिता राठोड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल राधेय चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष दिनेश बेंबडे, सचिव सौ. प्रणिता बेंबडे, कार्याध्यक्ष विवेक बेंबडे, विश्र्वस्त स्नेहा बेंबडे, संचालक डॉ. श्रीकांत ढगे, प्राचार्य डॉ. जयदीप यादव, प्राचार्य शशिकांत चिल्लरगे, प्रशासकीय अधिकारी श्रीहरी वेदपाठक तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.

# मराठवाडास्तरीय आंतरशालेय वादविवाद स्पर्धेत ढाल विजेता गोदावरी देवी लाहोटी कन्या विद्यालयाचा संघ तर उपविजेता ज्ञानप्रकाश बालविकास केंद्र विद्यालयाचा संघ

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि. २० फेब्रुवारी :** मराठवाड्यातील सुप्रसिद्ध व ऐतिहासिक स्वर्गीय लाल बहादूर शास्त्री यांच्या स्मरणार्थ आयोजित केलेल्या मराठवाडास्तरीय आंतरशालेय वादविवाद स्पर्धेचे ४६ वे वर्ष आहे. एकूण ४५ संघातील ९० स्पर्धकांनी सहभाग घेतला दोन दिवस चालणाऱ्या स्पर्धेचा समारोप बक्षीस वितरणांनी झाला.

याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ सुरेंद्रजी अलुरकर उपस्थित होते. प्रमुख पाहुणे गजानन भातलवंडे, नरेंद्र मेडेवार राजकुमार मस्के ,मधुकरराव वट्टमवार, शंकरराव लासुणे,शिवाजी बिराजदार, मुख्याध्यापक संजय कुलकर्णी, उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर अंकुश मिरगुडे हे उपस्थित होते.

परीक्षक नयन राजमाने व बालाजी भंडारे यांनी परीक्षक मनोगतातून वक्तृत्व कसे असावे नवीन नवीन गोष्टी आत्मसात करून जबाबदारी पार पाडत जाणे, अनुभव घेणे अशा गोष्टी अशा स्पर्धेतून प्राप्त होत असतात. अपयश पचवण्याची तयारी असावी. स्पर्धा जरूर असावी, पण त्यात संवेदना असावी. विचार मांडले.

प्रमुख पाहुणे गजानन भातलवंडे यांनी अशा स्पर्धेतून नवीन अनुभव मिळतात संगत चांगली करा चांगल्या लोकांच्या सहवासात रहा नेहमी प्रयत्न करा यश नक्कीच मिळेल.

नरेंद्र मेडेवार यांनी वक्तृत्व ही कला आहे मोठी माणसे वक्तृत्वामुळे अधिक मोठी होतात असे विचार मांडले .राजकुमार मस्के यांनी वादाला विवादाची विवादाला वादाची जोड मिळाली की आयुष्य सुंदर होते यशवंत विद्यार्थ्यांचे कौतुक होते. अपयशही पचवता आलं पाहिजे विद्यार्थ्यांनी सतत प्रयत्नशील असावं असं वक्तव्य केलं.

अध्यक्षीय समारोपात डॉ. सुरेंद्र आलूरकर यांनी जिंकण्याच्या ईर्षेनेच स्पर्धेत सहभागी व्हावे आपले मत आपले विचार आपल्याला ठामपणे मांडता आले पाहिजे तुमचं भवितव्य तुम्हीच ठरवणार आहात म्हणून चांगली संगत,प्रामाणिकपणा सतत कष्ट करण्याची तयारी ठेवा असे विचार मांडले.

या मराठवाडास्तरीय आंतरशालेय वादविवाद स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे बक्षीस ढाल आणि १०हजार रुपये पारितोषिकाचे मानकरी ठरला आहे गोदावरी देवी लाहोटी कन्या विद्यालय लातूरचा संघ तर द्वितीय क्रमांकाचे बक्षीस ७००० रुपये पारितोषकाचे मानकरी ठरले आहे लातूर येथील ज्ञानप्रकाश बालविकास केंद्र विद्यालयाचा संघ उपविजेता ठरला आहे.तृतीय शाहू विद्यालय शेळगाव, सर्व चतुर्थ संघ लालबहादूर शास्त्री विद्यालय उदगीर सर्वपंचम संघ संभाजीराव बडगीर माध्यमिक विद्यालय ममदापूर हे मानकरी ठरले आहेत.

ग्रामीण मुलीत प्रथम गायत्री अदनाक द्वितीय आरती मोकळे, तृतीय सायली पाडोळे , चौथी अक्षरा इप्पर पाचवी प्रज्ञा घोडके ग्रामीण मुलात प्रथम अभिलाष निरगुडे द्वितीय शुभम




देवनाळे तृतीय शिवशंकर कदम चौथा निशांत तांबे पाचवा संकेत कदम शहरी मुलीत प्रथम वैदेही पाटील द्वितीय रजनी कलमुरे तृतीय प्रियंका मुंढे चौथी श्रेयणी चिद्रेवार व स्नेहल हंचाटे पाचवी श्रुति माचपल्ले शहरी मुलात प्रथम खुजाओद्दीन नाजमोद्दीन द्वितीय संकेत शेरीकर तृतीय पुष्कर जाधव व श्रीतेज कुलकर्णी चौथा हर्षल चव्हाण पाचवा विश्र्वजीत जाधव या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे पारितोषिक देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजया गोविंदवाड व करुणा गायकवाड यांनी केले अहवाल वाचन वादविवाद प्रमुख अनिता मुळखेडे यांनी केले स्वागत व परिचय लक्ष्मी चव्हाण निकाल वाचन अनिता येलमटे व अंबिका पारसेवार, वैयक्तिक गीत प्रीती शेंडे आभार संजयराव कुलकर्णी यांनी व्यक्त केले. कल्याणमंत्र रूपाली थोरात यांनी घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पर्यवेक्षक कृष्णा मारावार किरण नेमट माधव मठवाले वादविवाद सहप्रमुख राहुल नेटके, निलेश मांडवकर व्यवस्थेतील सर्वच शिक्षकांचे कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य लाभले.

धाराशिव
# जिल्हा
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## नळदुर्ग महाविद्यालयात कौशल्य विकासावर कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२० फेब्रुवारी -** येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अ‍ॅण्ड प्लेसमेंट सेल आणि संभव फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने १८ फेब्रुवारी रोजी तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी 'कौशल्य विकास आणि रोजगार व नोकरीच्या संधी' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुभाष राठोड होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून संभव फाऊंडेशनच्या मास्टर ट्रेनर दिपाली चव्हाण व संगदीप हरणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दिपाली चव्हाण यांनी सॉफ्ट स्किल्स, व्यक्तिमत्त्व विकास, प्रभावी संवाद कौशल्ये, डिजिटल साक्षरता, कृत्रिम बुद्धिमत्ता (ख) यांची मूलतत्त्वे, मुलाखत तयारी व आत्मविश्वास वाढविण्याच्या तंत्रांवर सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमास रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ.ए.टी. कदम यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रस्तावना डॉ.टी.एल. दबडे यांनी केली, सूत्रसंचालन प्रा. महेंद्र भालेराव यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. एस. बी. पाटील यांनी केले. विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.


https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...



### मल्लिकार्जुन सोनवणे पवनराजे स्मृती गौरव पुरस्काराने सन्मानित

**धाराशिव, दि.२० फेब्रुवारी**
विविध क्षेत्रांमध्ये भरीव कामगिरी व योगदान देणाऱ्या उद्योजकांना देण्यात येणाऱ्या पवनराजे स्मृती गुणगौरव पुरस्कार २०२६ ने दैनिक यशवंतचे जिल्हा प्रतिनिधी तथा व्हॉईस ऑफ मीडियाचे महानगराध्यक्ष मल्लिकार्जुन दशरथ सोनवणे यांना माजी नगराध्यक्ष मकरंद राजेनिंबाळकर, पुरस्कार समितीचे समन्वयक गणेश शिंदे यांच्या हस्ते पुरस्काराने दि.१९ फेब्रुवारी रोजी सन्मानित करण्यात आले. या पुरस्काराचे स्वरुप स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ असे आहे. या सोहळ्यास नितीन गरड, जगदीश शिंदे, संपादक राजेंद्र बहिरे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या पुरस्काराबद्दल खा ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आ कैलास पाटील यांच्यासह इतरांनी शुभेच्छा दिल्या आहेत. याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



### छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त आष्टा येथे अभिवादन

**उमरगा, दि.२० फेब्रुवारी**
तालुक्यातील आष्टा (जहागीर) येथे १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त गावातील अश्वारूढ पुतळ्यास उपसरपंच बापुराव गायकवाड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर सामुदायिक शिवआरती घेण्यात आली. यावेळी सरपंच सतीश जमादार, ग्रामपंचायत सदस्य पंढरीनाथ कांबळे, तंटामुक्ती अध्यक्ष जीवन जाधव, पोलिस पाटील महेश जाधव, अ‍ॅड. सुशीलकुमार शिंदे, माजी तंटामुक्ती अध्यक्ष बालाजी (संजय) मोरे, तुकाराम गायकवाड, माजी सैनिक ऋषिकेत मोरे, अंगणवाडी कार्यकर्ती अल्का जाधव, मदतनीस ज्योती कुलकर्णी यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. तत्पूर्वी १८ फेब्रुवारी रोजी तुळजापूर येथून पदयात्रा काढून तुळजाभवानी शिवज्योत आणण्यात आली. या पदयात्रेत विष्णू पाटील, अभिमन्यू गायकवाड, ज्ञानेश्वर गायकवाड, विशाल जमादार आदी युवक बहुसंख्येने सहभागी झाले होते.



### जयंतीनिमित्त बलसूर येथे मिरवणूक

**उमरगा, दि.२० फेब्रुवारी**
उमरगा तालुक्यातील बलसूर येथे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. ग्रामस्थ, युवक आणि विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे संपूर्ण गाव शिवमय झाले होते. जयंतीनिमित्त बुधवारी मान्यवरांच्या हस्ते शिवरायांच्या मूर्तीची विधिवत स्थापना करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. गुरुवारी सकाळी गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकांनी सादर केलेले तालबद्ध खेळ, शिवरायांचा पाळणा आणि देशभक्तीपर गीतांवरील नृत्ये ही मिरवणुकीची आकर्षणे ठरली. छत्रपती शिवाजी महाराज की जयच्या घोषणांनी परिसर दुमदुमला. मार्गावर नागरिकांनी पुष्पवृष्टी करून मिरवणुकीचे स्वागत केले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष अनिकेत चिवरे, उपाध्यक्ष निलेश जाधव, सचिव संदीपबापू बिराजदार यांच्यासह युवकांनी परिश्रम घेतले.



### शिवजयंतीनिमित्त अणदूरमध्ये सामाजिक उपक्रम

**अणदूर, दि.२० फेब्रुवारी**
छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त पौर्णिमा महिला बहुद्देशीय सामाजिक संस्था यांच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबवून जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या उपक्रमांतर्गत पाच स्तनदाधारक माता व पाच बालिकांना बेबी किटचे वाटप करण्यात आले. बेबी किटमध्ये गादी, लोड, अंगड, टोपडे, मोजे, जाळी नेट आदी आवश्यक साहित्याचा समावेश होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाबई चव्हाण तर प्रमुख पाहुण्या म्हणून कस्तुरा कारभारी उपस्थित होत्या. राधिका रोकडे, विनयशाली डावरे, भक्ती बोंगरगे, सगुणा गायकवाड, अल्का जाधव या मातांसह त्यांच्या बालिकांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी नागेश चव्हाण व विद्या चव्हाण यांनी परिश्रम घेतले.

## धाराशिवमध्ये शिवजयंतीनिमित्त दोन दिवसीय सांस्कृतिक सोहळ्याची सांगता







**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० फेब्रुवारी -** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने येथील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात विशेष दोन दिवसीय सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. देशभक्ती, स्वराज्याची प्रेरणा आणि राष्ट्राभिमानाने ओतप्रोत भरलेल्या या सोहळ्याची सांगता 'वंदे मातरम' या गीताने उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात विजया कडवकर यांनी सादर केलेल्या इतनी शक्ती हमें देना दाता या भावगीताने झाली. त्यानंतर जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. दीपप्रज्वलनानंतर उपस्थितांनी एकत्रितपणे जय जय महाराष्ट्र माझा हे महाराष्ट्र गीत गायले आणि सभागृह देशभक्तीच्या स्वरांनी दुमदुमून गेले.

यानंतर विजया कडवकर व वैभवी कडवकर या भगिनींनी जिजाऊ वंदना सादर केली. प्रसिद्ध शिवशाहीर सुभाष गोरे व त्यांच्या संघाने मानाचा मुजरा हा पोवाडा सादर केला, तर शिवशाहीर बंडू खराटे व त्यांच्या संघाने पुत्र जो झाला जिजाऊला, झाला आनंद शिवनेरीला या पोवाड्याद्वारे शाहीरी जलसा रंगविला. या सादरीकरणातून शिवचरित्रातील पराक्रम, स्वराज्य संकल्पना आणि जाज्वल्य राष्ट्राभिमान यांचे प्रभावी चित्रण करण्यात आले. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, धाराशिवच्या वतीने विशाल शिंगाडे व सहकलाकारांनी विविध लोकगीते सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.

कडवकर भगिनींनी भरतनाट्यम नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच अवघ्या पाच वर्षांच्या शिवश्री श्रीकांत गवळी या चिमुकल्याने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित भाषण सादर करून सभागृह भारावून टाकले. गोधळ मांडला ग माय हे गीत नृत्यासह सादर करण्यात आले आणि कार्यक्रमाला रंगत आली.

या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश काळे, निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर, उपजिल्हाधिकारी स्वाती शेंडे, उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख, धाराशिव नगर परिषदेच्या मुख्याधिकारी निता अंधारे, लोहारा नगर परिषदेच्या नगराध्यक्षा वैशाली खराडे, नगरसेविका कमला लोडगे, तहसीलदार मृणाल जाधव व प्रकाश व्हटकर तसेच विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी, पत्रकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपजिल्हाधिकारी स्वाती शेंडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. राष्ट्रप्रेम आणि स्वराज्यभावनेचा संदेश देत 'वंदे मातरम' या गीताने दोन दिवसीय सांस्कृतिक कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. उपस्थित मान्यवर, अधिकारी-कर्मचारी, विद्यार्थी व युवक-युवती यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हा सांस्कृतिक सोहळा अविस्मरणीय ठरला.

## वाशी हद्दीत गोवंशीय जनावरांची वाहतूक उघड



### ८.८० लाखांचा मुद्देमाल जप्त...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० फेब्रुवारी -** स्थानिक गुन्हे शाखा धाराशिवचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार हे पथकासह पोलीस ठाणे वाशी हद्दीत पेट्रोलिंग करत होते. पारा येथून फकराबादकडे जाणाऱ्या वाहनात गोवंशीय जनावरांची कत्तलीसाठी वाहतूक होत असल्याचा संशय आल्याने पोलिसांनी वाहन चालकास थांबण्याचा इशारा दिला.

चालकाने वाहन रस्त्याच्या कडेला उभे केले. वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये अत्यंत दाटीवाटीने गोवंशीय जनावरे भरलेली असल्याचे निदर्शनास आले. जनावरे कोठून आणली व कशासाठी वाहतूक केली जात आहे, याबाबत विचारणा केली असता चालकाने समाधानकारक उत्तर दिले नाही. यानंतर सदर वाहन पोलीस ठाणे वाशी येथे आणण्यात आले. दोन पंचांच्या समक्ष तपासणी केली असता वाहनासह चार गोवंशीय जनावरे असा एकूण ८ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल आढळून आला. जनावरांना हालचालीसाठी पुरेशी जागा नसून अत्यंत त्रासदायक पद्धतीने वाहतूक केल्याचे आढळले. याप्रकरणी पोलीस ठाणे वाशी येथे गुन्हा क्रमांक ५४/२०२६ नोंद करण्यात आला असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस ठाणे वाशीचे पोलीस हवालदार बळीराम यादव करत आहेत.

सदर कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार, पोलीस हवालदार दयानंद गादेकर, बळीराम शिंदे, पोलीस अंमलदार पुष्कर मुगळे, सुभाष चौरे तसेच पोलीस ठाणे वाशीचे बळीराम यादव यांनी केली.

## तुळजाई नगरीत शिवजन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२० फेब्रुवारी -** पुजारी नगर सोसायटीतर्फे स्वराज्य निर्माते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवजन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात, भक्तीभावात आणि पारंपरिक जल्लोषात साजरा करण्यात आला. या अनोख्या उपक्रमामुळे संपूर्ण परिसर शिवमय झाला होता.

कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे १०१ महिलांनी एकत्रितरित्या पारंपरिक नऊवारी साड्या, व दागिने परिधान करून 'बाल शिवाजींचा पाळणा' गात शिवजन्मोत्सव साजरा केला. बाल शिवबा आणि माँसाहेब जीजाऊ यांची वेशभूषा धारण करून सहभाग उत्साहवर्धक ठरला. पाळणा गीतांच्या सुरेल स्वरांनी आणि जयजयकारांनी वातावरण भारावून गेले.

महिलांनी शिवरायांच्या बालचरित्राचे स्मरण करत अत्यंत भावपूर्ण वातावरण निर्माण केले. या सामूहिक पाळणा गायनामुळे उपस्थितांमध्ये देशभक्तीची भावना अधिक दृढ झाली. महिलांच्या शिस्तबद्ध आणि एकसंध सादरीकरणाने कार्यक्रमाची शोभा वाढवली. हा विशेष उपक्रम पुजारी नगर फाऊंडेशनच्या महिला प्रमुख शुभांगी गणेश पुजारी यांच्या पुढाकारातून प्रथमच राबविण्यात आला. त्यांच्या संकल्पनेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. समाजात इतिहासाबद्दल अभिमान, संस्कार आणि एकात्मता रुजविण्याचा हेतू या कार्यक्रमामागे होता.

शुभांगी पुजारी यांनी यावेळी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आणि कार्य पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे ही आपली जबाबदारी आहे.

महिलांनी एकत्र येऊन अशा उपक्रमांद्वारे समाजात सकारात्मक संदेश द्यावा, हीच आमची भावना आहे. या शिव पाळणा कार्यक्रमासाठी शेकडो महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमादरम्यान शिवचरित्रावरील माहितीपर भाषण, घोषवाक्ये आणि जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी संपूर्ण वातावरण प्रेरणादायी झाले.

कार्यक्रमाचे नियोजन, शिस्तबद्ध आयोजन आणि महिलांचा उत्साह पाहून उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. समाजात सांस्कृतिक जाणीव जागृत करणारा आणि महिला सहभागातून इतिहासाला अभिवादन करणारा हा उपक्रम सर्वांच्या मनात ठसा उमटवून गेला.

## १४ व्या वित्त आयोग निधी अपहार प्रकरणी गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० फेब्रुवारी -** ढोकी पोलीस ठाणे येथे ग्राम पंचायत कसबे तडवळे येथील सिमेंट रस्ता व नाली बांधकामाच्या कामात अनियमितता केल्याप्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

याप्रकरणी आरोपी म्हणून मन्मथ सुभाष आवटे (रा. कसबे तडवळे, ता. जि. धाराशिव), डी. के. पाटील (कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, धाराशिव, रा. काकडे प्लॉट, धाराशिव) तसेच के.एन. साठे (उपअभियंता, जि.प. बांधकाम विभाग, धाराशिव - मयत) यांची नावे नमूद करण्यात आली आहेत.

दि.१४ जानेवारी २०२० ते ५ ऑक्टोबर २०२० या कालावधीत ग्रामपंचायत कसबे तडवळे येथे मधुकर प्लॉटींग, रेल्वे स्टेशन परिसर व हावळे प्लॉटींग येथे सिमेंट रस्ता व नाली बांधकामासाठी १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून एकूण ६ लाख ९५ हजार ३६५ रुपये मंजूर करून घेतले. मात्र प्रत्यक्षात काम न करता शासनाची फसवणूक केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. याबाबत फिर्यादी संजय संतराम ढाकणे (वय ५५ वर्षे), व्यवसाय विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव यांनी १८ फेब्रुवारी २०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरीवरून ढोकी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## कळंबमध्ये शिवजयंती उत्साहात; महिलांचा सहभाग लक्षणिय

### डॉल्बीमुक्त शिवजयंतीचे नागरिकांकडून स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२० फेब्रुवारी -** छत्रपती शिवाजी महाराज यांची शिवजयंती कळंब शहरात मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरी करण्यात आली. १९ फेब्रुवारी रोजी संपूर्ण शहर 'शिवमय' झालेले पाहायला मिळाले.



पहाटेपासूनच शहरातील महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून दुग्धाभिषेक करण्यात आला. त्यानंतर प्रमुख रस्ते व चौकातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

यंदाच्या शिवजयंतीत महिलांचा सहभाग लक्षणीय ठरला. आयोजित महिला रॅलीमध्ये शहरातील महिला व युवतींनी पारंपरिक नऊवारी साड्या, फेटे आणि ऐतिहासिक वेशभूषा परिधान करून मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

पारंपरिक वेशातील मावळे, लेझीम पथके आणि ढोल-ताशांचा गजर हे प्रमुख आकर्षण ठरले.

शहरातील विविध मंडळांतर्फे पोवाडे, व्याख्याने, नाटिका तसेच शिवकालीन खेळांची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. यासोबतच विविध भागांतून आलेल्या पथकांनी उत्सवात रंगत आणली.

देवदेवतांच्या वेशभूषेतील उज्जैन येथील पथक, केरळ येथील झेंडू पथक तसेच सातारा येथील शिवकालीन कसरतींची सादरीकरणे विशेष आकर्षण ठरली.

संपूर्ण शहर भगवे ध्वज, पताका आणि विद्युत रोषणाईने सजले होते. वातावरणात देशभक्ती आणि ऐतिहासिक अभिमानाची भावना जाणवत होती.

## छत्रपती शिवाजी म्हणजे प्रेरणेचे व आधाद शक्तीचे उगमस्थान : मालखरे

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२० फेब्रुवारी -** छत्रपती शिवाजी या नावातच मोठा गर्भितार्थ दडलेला आहे. त्यांचा इतिहास संपूर्ण आयुष्य अभ्यासला तरी अपूर्णच राहील. ज्ञात इतिहासापेक्षाही त्यांचे कर्तृत्व अधिक व्यापक आहे, असे प्रतिपादन रत्नदीप मलखरे यांनी केले.



येथील स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी रत्नदीप मलखरे हे 'छत्रपतींचा अप्रकाशित इतिहास' या विषयावर मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका सविता लोहार होत्या. याप्रसंगी महात्मा बसवेश्वर माध्यमिक विद्यालय चे मुख्याध्यापक नेताजी गायकवाड, गोपाळ आष्टे, संजय कोथळीकर तसेच दोन्ही शाळांतील शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रत्नदीप मलखरे पुढे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे युगपुरुष होते. त्यांची प्रत्येक कृती आजच्या राज्यकर्त्यांसाठी मार्गदर्शक आहे. रयतेसाठी चालवलेले लोककल्याणकारी राज्य ही त्यांची खासियत होती.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थी शिवकालीन पोशाखात सहभागी झाले होते. कोणी मावळे, कोणी राजमाता जिजाऊ, कोणी शहाजीराजे तर कोणी तानाजी मालुसरे यांच्या वेशात शाळेपासून छत्रपती शिवाजी चौकापर्यंत पायी फेरी काढण्यात आली. या आकर्षक वेशभूषेमुळे उमरगा-वासीयांची मने जिंकली.

अनेक विद्यार्थ्यांनी छत्रपतींच्या जीवनावर ओजस्वी भाषणे सादर करून उपस्थितांना प्रेरित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख समीर देशपांडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन व्यंकट वचने यांनी केले.

## कनगरा येथे घरफोडी; २.८६ लाखांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० फेब्रुवारी -** बेंबळी पोलीस ठाणे हद्दीतील कनगरा येथे घरफोडीची घटना उघडकीस आली असून अज्ञात चोरट्याने सुमारे २ लाख ८६ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला आहे.

याबाबत फिर्यादी मोहम्मदरफी आमीन शेख (वय ४५ वर्षे, रा. कनगरा ता. जि. धाराशिव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दि.१७ फेब्रुवारी रोजी अज्ञात व्यक्तीने त्यांच्या राहत्या घराच्या दरवाजाचा कडी-कोंडा तोडून घरात प्रवेश केला. घरातील कपाट फोडून त्यामधील २३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने तसेच १ लाख ७० हजार रुपये रोख रक्कम असा एकूण २ लाख ८६ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या प्रकरणी बेंबळी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चरित्रातून ऊर्जा मिळते – आबूज

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० फेब्रुवारी :** १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त जनकल्याण निवासी विद्यालयात उत्साहपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी शिवशंभू विचार मंचाचे प्रांत संयोजक श्री. गोरक्षनाथ आबूज यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

शिवाजी महाराज की जय या घोषणेची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट करताना त्यांनी सुरतेची स्वारी, प्रतिकूल परिस्थितीत संघर्ष करण्याची जिद्द, शून्यातून स्वराज्याची उभारणी, किल्ल्यांचे सामरिक महत्त्व, संदर्भासह इतिहास वाचनाची गरज, हिंदुत्व रक्षण आणि महाराजांची प्रभावी युद्धनीती यांचा ऊहापोह केला. शिवचरित्रातून विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास, राष्ट्रनिष्ठा आणि कर्तृत्वाची प्रेरणा घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.कार्यक्रमास वसतिगृह समितीचे अध्यक्ष श्री. प्रशांतजी मेतकुटे, प्रकल्प संपर्क प्रमुख श्री. धनंजय माटेफळकर, मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वरजी सोनटक्के, अधीक्षक श्री. दत्ता माने व सहअधीक्षक श्री. बाबासाहेब मते यांची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यालयातील विद्यार्थिनींनी शिवकालीन पाळण्यावर आधारित नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. अंकुश साखरे यांनी केले. सूत्रसंचालन इयत्ता नववीतील चि. अर्जुन जानकार यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री. गुणवंत राठोड यांनी केले. कार्यक्रमाची सांगता शिवगर्जनेने केले झाली.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी राजकुमार चेंडकापुरे, मयुरीताई स्वामी यांनी विशेष प्रयत्न केले.



# सहा लाख रुपयांच्या अपहार प्रकरणी एक आरोपी अटकेत

## संगनमताने बनावट चोरीचा बनाव उघड; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० फेब्रुवारी :** ६,००,०००/- रुपयांच्या अपहार प्रकरणी एक आरोपी अटकेत; संगनमताने बनावट चोरीचा बनाव उघड. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई करण्यात आली.

याबाबत अधिक माहिती अशी की, पोलीस स्टेशन शिवाजीनगर, लातूर येथे गु.र.नं. ५३/२०२६ कलम ३०३ (२) भा.न्या.सं. अन्वये दाखल असलेल्या चोरीच्या गुन्ह्याचा स्थानिक गुन्हे शाखेने (डउइ) अत्यंत कौशल्यपूर्ण तपास करून चोरीच्या गुन्ह्याचा छडा लावला असून ५,५०,०००/- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.




याबाबत अधिक माहिती अशी की, पोलीस ठाणे शिवाजीनगर येथे दाखल नमूद गुन्ह्याचा उलगडा करून आरोपींना अटक करण्यासंदर्भात पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांनी स्थानिक गुन्हे शाखेला निर्देशित केले होते. त्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकाने लातूर जिल्ह्यात मालमत्तेविषयक गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांची माहिती संकलित करून सदरचा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी गुन्ह्यातील संशयितांचा शोध घेत होते.

दरम्यान दि. ०८/०२/२०२६ रोजी सायंकाळी पथकाने पो.स्टे. शिवाजीनगर, लातूर येथे दाखल गुन्ह्यातील संशयित आरोपी नामे १) जावेद जलील शेख (वय २७ वर्षे, रा. बिलाल मजीद जवळ, इस्लामपुरा, लातूर) यास खोरी गल्ली परिसरातून त्यास ताब्यात घेतले व पुढील तपासासाठी विश्वासात घेऊन सखोल चौकशी केली असता आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली. तो गेल्या अकरा वर्षांपासून टिळक नगर, लातूर येथील एका डायग्नोस्टिक सेंटर मध्ये एक्स-रे तंत्रज्ञ म्हणून कार्यरत आहे. सदर ठिकाणी ग्राहकांकडून जमा झालेली रक्कम बँकेत जमा करण्यात येत होती. ही रक्कम काही वेळा आरोपी जावेद शेख व त्याचा सहकारी अर्शद शेख यांच्या ताब्यात दिली जात असे. ही बाब जावेद शेख ने त्याचा मित्र आकाश ढगे यास सांगितली. दोघांनी संगनमताने अर्शद शेख यांच्या अक्सेस स्कूटरची बनावट चावी तयार करून स्कूटरच्या डिक्कीत ठेवलेली रक्कम चोरी करण्याचा कट रचला.

सुमारे महिनाभरापूर्वी बनावट चावी तयार करून ती जावेद शेख ने आकाश ढगे याच्याकडे दिली. दि. ०५/०२/२०२६ रोजी संबंधित डायग्नोस्टिक सेंटर ने जावेद शेख कडे ९०,०००/- रुपये व अर्शद शेख याच्याकडे ६,००,०००/- रुपये बँकेत भरण्यासाठी देण्यात आले होते. दोघांनीही संबंधित रक्कम आपल्या-आपल्या स्कूटरच्या डिक्कीत ठेवली. त्यानंतर एका चहाच्या स्टॉलसमोर गाड्या उभ्या करून चहा पिण्यासाठी थांबले असता जावेद शेखने आकाश ढगे फोनवर माहिती दिली. काही वेळाने अर्शद शेख यांची स्कूटर तेथून गायब झाली. नंतर ती स्कूटर हायटेक सेंटर समोरील बोळात आढळून आली; मात्र डिक्कीतील ६,००,०००/- रुपये रोख रक्कम गायब असल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणी दि. ०८/०२/२०२६ रोजी पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथे तक्रार दाखल करण्यात आली होती. तपासादरम्यान आरोपी जावेद जलील शेख व त्याचा साथीदार आकाश ढगे यांनी संगनमताने बनावट चावी तयार करून चोरीचा बनाव रचून सदर ६,००,०००/- रुपये अपहार केल्याचे निष्पन्न झाले. निष्पन्न आरोपी जावेद जलील शेख यास पुढील तपास कमी पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथे हजर करण्यात आले होते परंतु चोरीची रक्कम फरार आरोपी आकाश ढगे यांच्या ताब्यात असल्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शोध मोहीम राबवून मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार मौजे जोडजवळा, ता. जि. लातूर येथे सापळा रचून आरोपी आकाश प्रकाश ढगे (वय ३० वर्षे, रा. जोडजवळा, ता. जि. लातूर, सध्या रा. लेबर कॉलनी, लातूर) यास ताब्यात घेतले. सखोल चौकशीत आरोपीने त्याचा साथीदार जावेद जलील शेख (वय २७ वर्षे, रा. बिलाल मशीद जवळ, इस्लामपुरा, लातूर) याच्यासह मिळून चोरी केल्याची कबुली दिली. चोरीतील ६ लाख रुपयांपैकी ५० हजार रुपये खर्च केल्याचे सांगितले असून उर्वरित ५,५०,०००/- रुपये आरोपीने जोडजवळा येथील भावाच्या घरात लपवून ठेवल्याचे निष्पन्न झाले. यावरून ५,५०,०००/- रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. जावेद शेख यास दिनांक ०८/०२/२०२६ रोजी खोरी गल्ली येथून तर आकाश ढगे याला दिनांक १७/०२/२०२६ रोजी जोडजवळा येथून स्थानिक गुन्हे शाखेकडून ताब्यात घेण्यात आले आहे. असून पुढील तपास पोलीस स्टेशन शिवाजीनगर, लातूर येथे सुरू आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ, पोलीस उपनिरीक्षक अमर केंद्रे, राजेश घाडगे, सफौ सर्जेराव जगताप, पोलीस अंमलदार युवराज गिरी, राजेश कंचे, मोहन सुरवसे, अर्जुन राजपूत, प्रदीप स्वामी, जमीर शेख, सुरेखा मदने, श्रीनिवास जांभळे, राहुल कांबळे यांनी केली आहे.

## विविध वृत्त...

### जनकल्याण निवासी विद्यालयास राज्यस्तरीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक

**लातूर :** ज्ञान प्रबोधिनी छात्र प्रबोधन व मातृमंदिर विश्वस्त संस्था, निगडी (पुणे) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय सांघिक हस्तलिखित व अभिवाचन स्पर्धा २०२६ चा निकाल नुकताच जाहीर झाला. या स्पर्धेतील अभिवाचन प्रकारात जनकल्याण निवासी विद्यालय येथील ''सौंदर्य'' गटाने उत्कृष्ट सादरीकरण करत द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले.

या गटात वैष्णवी बालाजी बिरादार, समृद्धी उत्तम पाटील, प्रणाली प्रकाश थोरबोले, सृष्टी नवनाथ खोडसे, अनुष्का अमोल ठोंबरे, समृद्धी दत्ता चौधरी, गायत्री सुनील रोडगे, अस्मिता अविनाश कुकडे व नेहा अशोक धायगुडे या विद्यार्थिनी सहभागी होत्या. या विद्यार्थिनींना श्री. सागर कद्रे व सौ. संगीता भदाडे यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल प्रकल्प अध्यक्ष श्री. प्रकाशजी लातूरे, प्रकल्प कार्यवाह श्री. राजेशजी सुगरे, शालेय समिती अध्यक्ष श्री. सतीशजी कुलकर्णी, वसतिगृह समिती अध्यक्ष श्री. प्रशांतजी मेतकुटे, मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर सोनटक्के, अधीक्षक श्री. दत्ता माने व सहअधीक्षक श्री. बाबासाहेब मते यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### साने गुरुजी शैक्षणिक संकुलात छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी

**लातूर :** अवंती नगर येथील साने गुरुजी शैक्षणिक संकुलात महाराष्ट्राचे आराध्ये दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती विविध उपक्रमाने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. संस्था सचिव कालिदास माने यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमा पूजनाने या सोहळ्यात सुरुवात झाली. छत्रपती शिवाजी महाराज हे धर्मनिरपेक्ष राजे होते, त्यांच्याकडे विविध जाती धर्मांचे लोक पदावर होते आणि त्यांनी तयार केलेल्या अष्टप्रधान मंडळात याची प्रचिती येते. जात धर्म विरहित रयतेचे स्वराज्य निर्माण केले असे गौरौदगार संस्था सचिव कालिदास माने यांनी काढले. ते कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून व्यासपीठावर प्रशासकीय अधिकारी उषा आडे, नागोराव कांबळे आदी उपस्थीत होते. याप्रसंगी अक्षर नंदन प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर सुंदर असे नृत्य सादर केले. या कार्यक्रमाचे संचलन गणेश परळे यांनी केले तर आभार मुख्याध्यापक पांडुरंग केंद्रे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी प्राचार्य, मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात शिवरायांना अभिवादन

**लातूर :** रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते शिवरायांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, वैशाली केंद्रे, पर्यवेक्षक संजय गुरमे, समन्वयक राजीव मुंढे, मदन धुमाळ, प्रा. बी. बी. खटके, प्रा. बदने, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते, शिवकांत वाडीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.शिवजयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेतील प्रथम विजेती वेदांती राजू मलवाडे हिला ट्रॉफी व प्रमाणपत्र, द्वितीय विजेती रुपाली गोविंद निरगुडे हिला परीक्षा पॅड व प्रमाणपत्र तर तृतीय विजेत्या अनुष्का खंडेराव भोंगे हिला कंपास आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.यावेळी रुपाली निरगुडे हिने उत्कृष्ट पोवाडा सादर करून उपस्थितांच्या टाळ्या मिळविल्या.

## इयत्ता दहावीच्या परीक्षांना सुरुवात; कॉपीमुक्त परीक्षेसाठी प्रशासनाकडून उपाययोजना

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० फेब्रुवारी :** जिल्ह्यात आजपासून इयत्ता दहावीच्या परीक्षेस प्रारंभ होत असून कॉपीमुक्त परीक्षेसाठी जिल्हा प्रशासनाने आवश्यक उपाययोजना केल्या आहेत. परीक्षा केंद्रावर अचानकपणे भेट देण्यासाठी भरारी पथकाची व कायमस्वरूपी बैठे पथकाची व्यवस्था करण्यात आली असून, कॉपी मुक्त वातावरणात परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी प्रशासनाने आवश्यक दक्षता घेतली आहे.



जिल्ह्यातील १५२ परीक्षा केंद्रावर २० फेब्रुवारी २०२६ ते १८ मार्च २०२६ या काळात इयत्ता दहावीची परीक्षा होणार आहे. लातूर जिल्ह्यातून ३९ हजार २४२ विद्यार्थी ही परीक्षा देणार आहेत. प्रत्येक विषयाच्या पेपरसाठी १५२ केंद्रासाठी महसूल विभाग, ग्रामविकास विभाग आणि इतर विभागांच्या समन्वयातून १५२ त्रिसदस्यीय बैठी पथके गठीत करण्यात आली आहेत, ती रोटेशन पद्धतीने कार्यान्वित ठेवण्यात येणार आहेत. ही पथके पूर्ण वेळ कार्यरत राहणार आहेत.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेली महसूल अधिकारी, जिल्ह्यातील सर्व खातेप्रमुख यांची ७० भरारी पथके परीक्षा कालावधीत विविध परीक्षा केंद्रांना अचानक भेट देवून पाहणी करतील. परीक्षा कालावधीत सर्व परीक्षा केंद्रावर प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आलेले आहेत.

## 'केशवराज' मध्ये छत्रपती शिवरायांच्या स्फूर्ती गीतांनी शिवजयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० फेब्रुवारी :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दि.१९ फेब्रुवारी २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन कार्यावर आधारित असलेल्या स्फूर्ती गीताचे गायन करून व प्रतीकात्मक शिवरायांचे औक्षण करून छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा माध्यमिक शालेय समिती अध्यक्ष गंगाधर खेडकर, प्रमुख पाहुणे शिवशंभो विचारमंच देवगिरी प्रांताचे संयोजक गोरक्षजी आबुज, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य संजय गुरव, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर, शालेय समिती सदस्य नरेंद्र पाठक, विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, जनकल्याण निवासी विद्यालयाचे सहशिक्षक शंकरराव देशमुख, शिवरायांच्या वेशभूषेत विद्यार्थी विघ्नेश जोशी यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे गोरक्षजी आबुज यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, जीवनात सोळावे वर्ष हे संकल्प करण्याचे, निश्चय करण्याचे, ध्येय ठरवण्याचे वर्ष असते हे शिवचरित्रातून शिकले पाहिजे. 'ज्या मुलांच्या ओठावर छत्रपतींचं गाणं असतं, त्यांना माहीत असतं की जगायचं कसं असतं.' असे सांगून त्यांनी शिवरायांच्या जीवनातील विविध प्रसंग सांगितले. आपण स्वतःचे कर्तृत्व कसे उभे करावे, संयम कसा ठेवावा, स्वाभिमान कसा जागवावा हे सांगितले. शिवरायांना स्वभाषेविषयी असणारा अभिमान त्यांनी सांगितला. शिवरायांनी अनेक फारसी शब्द बदलून स्वभाषेत शब्दकोश तयार केला हे उदाहरणाद्वारे स्पष्ट केले. याप्रसंगी त्यांनी महाराष्ट्र धर्म समजून घ्या, एकत्र कसे राहायचे हे समजून घ्या, असे आवाहन करून शिवजयंतीच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या.

अध्यक्षीय समारोप करताना गंगाधर खेडकर यांनी वीररसातील पोवाडा सादरीकरणाचे व वेशभूषेतील विद्यार्थ्यांचे कौतुक केले. जगाच्या इतिहासातील राजे हे वंशपरंपरागत होऊन गेले, परंतु शिवाजी महाराजांनी स्वतःच्या हिंमतीवर राज्य उभे केले. नीतीवंत,पुण्यवंत, कीर्तिवंत असणारा एकमेव आदर्श राजा व रयतेवर पुत्रवत प्रेम करणारे शिवराय होय. यावेळी त्यांनी सर्वांना शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

## चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेजचा विशाल सोनूने राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत द्वितीय

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० फेब्रुवारी :** चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज (डिग्री), लातूर येथील फार्म डी. चतुर्थ वर्षातील विद्यार्थी विशाल रमेश सोनूने याने राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत द्वितीय पारितोषिक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

ही राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा शिवरत्न नॉलेज सिटी, अकलूज, ता. माळशिरस, जिल्हा. सोलापूर यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत राज्यभरातून मोठ्या संख्येने स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

'किर्तन काल, आज, उद्या...' या विषयावर विशाल सोनूने याने प्रभावी आणि समाजप्रबोधनपर भाषण सादर केले. अभ्यासपूर्ण मांडणी, आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण आणि प्रभावी वक्तृत्वशैलीच्या जोरावर त्याने परीक्षक व उपस्थितांची मने जिंकली.



या यशामुळे महाविद्यालयाचा नावलौकिक वाढला असून सर्वत्र त्याचे कौतुक होत आहे. विद्यार्थ्याच्या या शानदार यशाबद्दल संस्थेचे सचिव श्री. भीमाशंकर देवनीकर, विश्वस्त श्री. विजयकुमार मठपती,श्री. अरुणप्पा हालकुडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयेंद्र स्वामी, डॉ. ओमप्रकाश भुसनुरे, डॉ. अनंत देशपांडे, डॉ. विवेक पंचभाई, डॉ. पद्मजा गिराम, डॉ. राम साखरे, डॉ. सुनील हिंडोळे, डॉ. शिवकुमार लड्डे, डॉ. नसीर शेख, प्रा. रिशा वाले, प्रा. महेश मानके, प्रा. रचिता मलशेट्टे, प्रा. अश्विनी भारती, शिवहार विभुते, सिद्धेश्वर स्वामी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्याचे मनपूर्वक अभिनंदन केले.

# लातूर जिल्हयातील वृध्द कलावंतांसाठी भारतीय दलित पँथरचे जिल्हा परिषदेसमोर कला सादरीकरण, धरणे व ठिय्या आंदोलन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० फेब्रुवारी :** गेल्या १४-१५ महिन्यांपासून सन २०२१-२४ या तीन वर्षाच्या मानधनास पात्र निवड केलेल्या कलावंतांचे आधार पडताळणी न केल्याने २५ फेब्रुवारी २०२६ रोजी भारतीय दलित पँथरचे जिल्हा परिषदेसमोर वयोवृध्द कलावंत व साहित्यकांसह कला सादरीकरण, धरणे व ठिय्या आदोंलन करण्यात येणार असल्याची माहिती संजयभाऊ कांबळे यांनी दिली.

वाढत्या वयामुळे कलावंत अनेक अजारांनी ग्रस्त असल्यामुळे त्यांना वेळोवेळी वैद्यकीय उपचार व औषधोपचारासाठी पैशांची सतत आवश्यकता भासते. या कलावंतांना उपजिवीकेसाठी महाराष्ट्र शासनाचे वतीने जेष्ठ कलावंत, साहित्यीकांना आधार प्रणाली व्दारे महाडीबीटीने मानधन देण्यात येते. जेष्ठ कलावंतांचे या मानधनावर वृध्दापकाळी जीवन चरित्र अवलंबून असते. या कलावंतांची निवड समितीमध्ये अध्यक्ष जिल्हाधिकारी, सचिव जिल्हा परिषदेच्या पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी व पालकमंत्री नियुक्त जिल्ह्यातील १० जेष्ठ कलावंत साहित्यीक सदस्य असतात.

लातुर जिल्ह्यातील सन २०२१ ते २०२४ या तीन वर्षातील २८ जानेवारी २०२५ च्या बैठकीमध्ये व समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार सादरीकरणातून मंजुर करण्यात आलेल्या जिल्ह्यातील ज्येष्ठ कलावंतांची पंचायत विभागा मार्फत आधार पडताळणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे सन २०२१ ते आज पर्यंत या कलावंतांना त्यांच्या हक्काचे शासनाचे मानधन मिळत नाही व शासनाचा योजना राबविण्याचा उद्देश सफल होत नाही.



जिल्हा वृध्द कलावंत समितीचे सचिव जिल्हा परिषदेच्या पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या तीन वर्षाच्या मानधनास पात्र कलावंतांचे त्यांचे आधार पडताळणी करण्यात यावे अन्यथा दिनांक २५ फेब्रुवारी २०२६ रोजी जि.प. लातुर कार्यालयासमोर जिल्ह्यातील वयोवृध्द कलावंतांचे कला सादरीकरण धरणे व ठिय्या आंदोलन करण्यात येईल अशा आशयाचे निवेदन भारतीय दलित पँथरच्या वतीने प्रदेशाध्यक्ष ॲड. रमेशभाई खंडागळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदेश कार्याध्यक्ष संजयभाऊ कांबळे, लातुर जिल्हा सांस्कृतिक प्रमुख धम्मपाल सावंत यांनी दिला आहे. या निवेदनाच्या प्रति महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, बांधकाममंत्री तथा लातुर पालकमंत्री, सांस्कृतिक मंत्री, विभागीय आयुक्त, लातुरच्या जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, जि. प. चे मुख्यकार्यकारी अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत. या निवेदनावर शाहीर राजरत्न सोनवणे, शाहीर सत्यवान जागदंड, शाहीर नितिन कांबळे, शाहीर दिलीप ढगे, शाहीर कैलास क्षिरसागर, शाहीर वामन हजारे, शाहीर सुभाष साबळे, गायिका छायाताई सपकाळ, गायिका सुमनबाई जोगदंड आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.